श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ११ अंक २-३-४]अ. वैशाख, वै. ज्येष्ठ[श. १८५६

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः— रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| श्री. मोने यांचें त्रोटक चरित्र ... ... ... | १-७२ |
| अनुभव ... ... ... ... | ७३-८० |
| श्री शिर्डी संस्थान नोकर व इतर मंडळीबद्दल माहिती ... ... | ८१-९० |
| मे व जून महिन्याचें शिर्डीवृत्त ... ... ... | ९१-९४ |
| शिर्डी संस्थान समाचार ... ... ... | ९५ |
| श्रीगुरुपौर्णिमेच्या उत्सवाचा कार्यक्रम... ... ... | ९६ |


## विनंति.

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V. P करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापी पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

रा. आ. तर्खड,
व्यवस्थापक---श्रीसाईलीला

५१ E, पार्ला रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,
**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत केकावलि या भक्तिरसप्रेमाद्भुतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २

रा. आ. तर्खड,
व्यवस्थापक --श्रीसाईलीला कचेरी.

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,
--- प्रकाशक.



१. चरित्रनायक गुप्त संतरत्न श्रीसमर्थ सद्गुरु मोरभट्ट अन्या ऊर्फ बुवासाहेब मोने शिरवळकर, संस्थान भोर.



२. भगवान श्री एकमुखी द्विभुज कालाग्निशमन शिरवळ दत्त, संस्थान भोर.



३. श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा महाराज श्री क्षेत्र शैलधी ऊर्फ शिरडी, ता. कोपरगांव. जिल्हा अहमदनगर.

# श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

श्रीसाईलीला संपादकमहाशय यांस सप्रेम कृतानंत साष्टांग नमस्कार विज्ञप्ती विशेष.

सोबत भोर संस्थानातील प्रसिद्ध शिरोवलय (शिरवळ) ग्रामनिवासी गुप्त संत महात्मे श्रीसमर्थ सद्गुरु मोरभट्ट अन्या ऊर्फ बुवासाहेब मोने यांचें त्रोटक चरित्र व त्याच गांवीं बांधलेल्या नूतन श्रीदत्तमंदिराची संक्षिप्त हकीकत आपल्याकडे प्रसिद्धीकरितां पाठवीत आहें. तरी कृपेनें ती आपल्या विबुधमान्य श्रीसाईलीलेच्या जोड अंकांत एकचवेळीं सचित्र प्रसिद्ध करावी अशी, शिरसा प्रार्थना आहे.

२. खऱ्या संतांना आपली प्रसिद्धि व्हावी असें कधींच वाटत नाहीं. ते आपलें दिव्य ज्ञान फारच क्वचित प्रसंगीं प्रकट करतात. त्यामुळें त्यांना

ओळखणारीं माणसें बोटावर मोजण्याइतकींही नसतात, म्हणून त्यांचीं चरित्रें लिहिण्यास त्यांची विश्वसनीय, सविस्तर व भरपूर सामुग्री उपलब्ध होत नाहीं. विखुरलेल्या ज्ञानकणाप्रमाणें मोठ्या कष्टानें व महत्प्रायासानें ती संकलित करावी लागते. प्रस्तुतच्या चरित्रनायकाच्या चरित्राची स्थितीही तशीच आहे, व त्याच दत्तावतार साईप्रभूंच्या प्रेरणेनें नूतन लहानसें दत्त-मंदिर बांधलें आहे.

३. संतांचीं चरित्रें दुःखमय भासणाऱ्या संसारांत व शुष्क व नीरस भासणाऱ्या परमार्थांत त्यांचा दृढतम श्रद्धेनें व शुद्धांतःकरणानें अभ्यास केल्यास मार्गदर्शक व श्रेयस्कर होतात, व संसार सुखमय करतात. बुवासाहेबांचें चरित्र तसेंच आहे. संत हे येथूनतेथून एकच. तथापि ज्याअर्थी करील गोड व श्रेयस्कर स्वल्प सेवारूप कामगिरी श्रीबाबांच्या प्रेरणेनें मला लाधली, त्याअर्थी बुवासाहेबांचा व बाबांचा कांहीं तरी निकट संबंध आहे, यांत शंका नाहीं.

४. बुवासाहेबांना निवर्तल्यास ६२-६३ वर्षें झालीं. त्या वेळीं फोटो घेण्याच्या कलेचा कदाचित् जन्म झाला असला, तरी तिचा प्रसार व परिचय हल्लीं इतका आबालवृद्धांत झपाट्यानें झाला नव्हता. त्यामुळें बुवासाहेबांचा पूर्व फोटो उपलब्ध नाहीं; परंतु त्यांना पाहिलेली कांहीं वृद्ध मंडळी शिरख-ळास व माझ्या घरींही अद्याप हयात आहेत. त्यांच्या माहितीवरून त्यांचें सादृश्य जरी सर्वस्वी नाहीं तरी बव्हंशीं ज्या विभूतींत दिसतें, अशा श्री-भास्करानंदस्वामींच्या फोटोंत कांहीं फेरफार करून तो बुवासाहेबांचा फोटो म्हणून दिला आहे.

५. भगवान् श्रीकृष्णादि विश्ववंद्य देवता, भगवान् श्रीमदाद्यशंकराचार्यादि जगन्मान्य आचार्य, व भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजादि सृष्टिसेव्य संत यांचे आद्य फोटो कोणी घेतले असतील असें वाटत नाहीं. तथापि हल्लीं सर्वत्र ठिकाणीं पूजनार्चनोत्सवादि सेवा करण्याकरितां ज्या त्यांच्या पत्रप्रतिमा दृष्टीस

पडतात त्या पोथ्यापुराणातून किंवा त्यांच्या चरित्रांतून त्यांच्या मुखादि शरीर-भागाचें जें वर्णन केलेलें असतें, त्यावरून बुद्धिमान व कुशल चित्रकारांनीं तयार केलेल्या असतात व तीच ती पूज्य विभूति आहे, अशी तिच्या ठिकाणीं पूर्ण भावना ठेवून आपण तिची सेवा करितो. असाच प्रकार बुवासाहेबांच्या फोटोचा आहे.

६. श्रीभास्करानंदांचा फोटो दाखवून त्यांत मीं सुचविल्याप्रमाणें फेरफार करून त्याचा ब्लॉक तयार करवून घेऊन या संतसेवेंत आपण जी मेहनत घेऊन मदत केलीत त्याबद्दल आपला मी अत्यंत आभारी आहें.

ठाणे,
गुरुवार वैशाख, शु. ५
शके १८५६ भावनाम
संवत्सरे. ता. ३-५-३४

आपला नम्र सेवक
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

# श्रीशिरवळ येथील गुप्त संत श्रीसमर्थ सद्गुरु मोरभट अन्या मोने यांचें त्रोटक चरित्र व नूतन बांधलेल्या श्रीदत्तमंदिराची संक्षिप्त हकीकत

## श्रीशिरोवलय (ऊर्फ शिरवळ) नूतन— मंदिरस्थ पुराण श्रीकालाग्नि-— शमनावतार दत्तमूर्ति वर्णन

## नमन दशकम्

### मंदाक्रान्ता वृत्तम्.

### श्लोक

विद्वद्वर्यद्रविडयतिना केनचिद्दत्तमूर्तिम् ।
सृष्टां धातोः कुशलकृतिना शिल्पिना द्राविडेन ।
एकां बालां कुटिल जटिलां भव्यविस्तीर्ण भालाम् ।
चिंतामग्नां निमिषितदृशं कुंडलैः कांतकर्णाम् ॥ १ ॥

**अर्थः**—द्रविडदेशच्या कोणा एका विद्वच्छ्रेष्ठ संन्याशांनीं द्रविड देशच्या शिल्पकारानें कुशलतेने धातूची बनावलेली एक बाल दत्तमूर्ति, जिच्या कुरळ्या केसांचा जटाभार मस्तकावर बांधला आहे, जिचें कपाळ भव्य व विशाल आहे, जी चिंतनांत मग्न झालेली आहे, जिचे नेत्र झांकलेले आहेत, व जिचे कान कुंडलामुळें रमणीय दिसत आहेत;

### श्लोक

रम्यैकास्यांमकुटिलनसामिंदुभास्वत्कपोलाम् ।
मंदस्नेहस्मितविलसितामोष्ठसंछिन्नदंताम् ।
निम्नस्निग्धप्रतनु चिबुकप्रांतमध्यप्रदेशाम् ।
पूर्णानंदां त्रिवलिभिरपिच्छादितोत्तुंग कंठाम् ॥ २ ॥

**अर्थः**—जी प्रेक्षणीय असून एकमुखी आहे, जिचें नाक सरळ आहे, जिचे गाल चंद्राप्रमाणें उज्वल आहेत, जिचें प्रेमपूर्वक गालातल्या गालांत हंसणे

असल्यामुळें जिचा चेहरा प्रफुल्लित दिसत आहे, जिचे दांत ओंठांनीं झांकलेले आहेत, जिच्या हनुवटीभागांतील मध्यप्रदेश खोलगट, तुळतुळीत व नाजुक आहे, जी पूर्णानंदांत आहे, व जिचा उठावदार कंठप्रदेश तीन कंठकटपांनीं आच्छादित आहे;

## श्लोक

फंबुग्रीवां द्विकरकमलां पीवरोत्तुंगवक्षाम् ।
संध्यारागां धृतशुचितमस्वर्णयज्ञोपवीताम् ।
शश्वतृप्तां सदयहृदयां कोटिविश्वैकगर्भाम् ।
शातामाद्यां मृगपतिकटिं निर्मलां निम्ननाभिम् ॥ ३ ॥

**अर्थ:**—शंखशुक्तीप्रमाणें जिची मान वक्र आहे, जिचे दोन्हीं हात कमलःप्रमाणें आहेत; जिची छाती मांसल असून उठावदार आहे, जिचा वर्ण अस्तमानच्या सूर्याप्रमाणें आहे, जिनें अतिशय पवित्र असें सुवर्ण यज्ञोपवीत धारण केलें आहे, जी निरंतर तृप्त आहे, जिचें अंतःकरण दयार्द्र आहे, कोटयवधि ब्रह्मांडें समाविष्ट झालीं आहेत, असें जिचें अद्वितीय उदर आहे, जी शांत व पूर्वींची आहे, जिची कमर सिंहाप्रमाणें बारीक आहे, जी निर्दोष असून जिची नाभि खोल आहे;

## श्लोक

बद्धश्रोणीं वसनवलयैः कांचिसूत्रोपवीतैः ।
यस्याः कट्या रुचिर वसनस्यांतिमौ पल्लवौ द्वौ ।
नम्रीभूतौ असिपुटसमौ भूषितौ तंतुगुच्छैः ।
कांचिग्रंथित्रयमपिकृतं नाभि देशे तथाच ॥ ४ ॥

**अर्थ:**—जिच्या गांड्याच्या वरचा व नाभीच्या खालचा प्रदेश वस्त्राच्या पट्टयांनीं, मेखला, सूत्र व यज्ञोपवीतांनीं वेष्टित केलेला आहे, जिच्या सुंदर कटिवस्त्राच्या दोन बाजूच्या टोकांचे सोगे लटकलेल्या तलवारीच्या मॅना-प्रमाणें खालीं आलेले असून ते गोंडयांनीं सुशोभित झालेले आहेत, आणि जिच्या नाभिभागावर मेखलेच्या तीन गांठीं मारलेल्या आहेत;

### श्लोक

तेजोरूपां त्रिगुणनिलयां स्तोककौपीनवस्त्राम् ।
दिव्योत्संगां मृदुलजघनां पूतजंघांघ्रिकंजाम् ।
वामादीषन्निहितमनयाग्रे पदं दक्षिणं च ।
कारुण्यार्द्रां मदनमथनां वक्रपृष्ठप्रदेशाम् ॥ ५ ॥

**अर्थः**—जी प्रकाशरूप आहे, जी तीन गुणांचें घर आहे, जिनें ल्हानशी लंगोटी परिधान केली आहे, जिच्या मांड्या स्वर्गीय आहेत, जिच्या टिर्‍या मऊ गुलगुलीत आहेत, जिच्या पोटर्‍या व चरणकमल पवित्र आहेत, जिचा उजवा पाय डाव्या पायाच्या किंचित् पुढें आलेला आहे, जी दयेनें ओथंबलेली आहे, जिनें मदनाचा नाश केला आहे, व जिच्या पाठीचा भाग वाकडा झालेला आहे;

### श्लोक

पुण्यश्लोकामनतिपृथुल ह्रस्वदीर्घांगयष्टिम् ।
मुक्ताचामीकरमणिमयै र्मंडनैर्मंडितांगाम् ।
नेयां चेतस्तत इव सुखं चाब्जपृष्ठासनस्थाम् ।
भक्ताराध्यां भजकवशगां भक्तकार्यावतीर्णाम् ॥ ६ ॥

**अर्थः**—जिची कीर्ति उत्तम आहे, जिच्या शरीराची काठी अती जाड किंवा अति ठेंगणी किंवा अति उंच नाहीं, तिचें सर्व शरीर, मोतीं सोनें व हिरे यांच्या दागिन्यांनीं अलंकृत केलेलें आहे, जी इकडून तिकडे सहज नेतां येण्यासारखी आहे, जी उलट्या कमलासनावर उभी राहिलेली आहे, जी भक्तांना पूजा करण्याला योग्य आहे, जी भक्तांना वश होणारी आहे, व भक्तकार्याकरितांच जिचा अवतार आहे;

### श्लोक

सौख्यागारं भवभयहरां सत्वसारामुदाराम् ।
श्रीभांडारं विजितभुवनां तीव्रवैराग्ययुक्ताम् ।
सिद्धैश्वर्यां करणदमनां ज्ञानभक्त्येकसाध्याम् ।
आत्मछंदां सुमतिगतिदां योगिभिर्ध्यानगम्याम् ॥ ७ ॥

**अर्थः**—जी सुखसदन आहे, जी संसारभीति हरण करणारी आहे, जी महासामर्थ्यवती आहे, जी उदार आहे, जी शोभा व सौंदर्य यांचें भांडार आहे, जिनें सर्व भुवनें जिंकलेलीं आहेत, जिचें वैराग्य कडकडीत आहे, जिचें ऐश्वर्य परिपूर्ण आहे, जिचीं इंद्रियें जिच्या स्वाधीन आहेत, जी केवळ ज्ञानभक्ती ( चतुर्थ भक्ति ) च्याच योगानें साध्य होणारी आहे, जिला परमात्म्याचाच नाद आहे, जी उत्तमबुद्धि व मोक्ष देणारी आहे व जी योग्यांच्याच ध्यानांत येण्यास योग्य आहे;

श्लोक

भिक्षावृत्तिं स्वसुखनिरतां चानसूयात्रिमोदाम् ।
पुण्यर्ष्यत्रेः कठिणतपसो मूर्तिमत्सत्फलं वा ।
दत्तां योग्य प्रयत मुनये मोरभट्टाय पूर्वम् ।
नित्यं सम्यङ् निगमविधिना पूजनार्थं स्वगेहे ॥ ८

**अर्थः**—भिक्षा मागणें हेंच जिचें वतन आहे, आत्मसुखांत जी रममाण झाली आहे, जी अनसूया व अत्रि यांचा आनंद आहे, किंवा पुण्यवान अत्रिऋर्षीच्या खडतर तपश्चर्येचें जी मूर्तिमंत उत्तम फल आहे, अशी जी ( दत्तमूर्ति ) ( द्रविड देशांतील एका विद्वश्रेष्ठ संन्याशांनीं पूर्वी ) सत्पात्र व निग्रही अशा मोरभट्ट मुनींना ( मोरभट्ट अन्यांना ) निरंतर बरोबर शास्त्रोक्त विधीनें स्वतःच्या घरीं पूजाकरण्याकरितां दिली,

श्लोक

आमृत्यर्यां विनतऋषिणा राधितां तेन भावैः ।
धन्यां कालाग्निशमन समाख्यां चतुर्थावतारम् ।
तां श्रीमूर्तिं नयन सुभगां श्रद्धयानन्य भक्त्या।
वंदे वामां विमलवपुषं विश्ववंद्यां विशोकाम् ॥९॥

**अर्थः**—व ज्या धन्य व " कालाग्निशमन " नांवाच्या दत्ताच्या चौथ्या अवतारमूर्तीची पूजा मरणपर्यंत विनयशील अशा त्या ऋषींनीं ( मोरभट्ट अन्यांनीं) प्रेमानें केली,त्या सुंदर दिसणाऱ्या रमणीय, निर्दोष शरीराच्या, जगद्वंद्य, आनंदपूर्ण अशा श्रीमूर्तीला मी श्रद्धेनें व अनन्य भक्तीनें वंदन करतों.

श्लोक

तद्धस्तेनैवच भगधरा पुण्यकालं महान्तम् ।
दत्तात्रेयोपलपदयुगं सभ्मनः पृष्ट भागे ।
नित्यं चौदुंबरतरुतले सादरं सेवितं यत् ।
वंदे तत्सच्चरणयुगलं बालदासोऽहमज्ञः ॥१०॥

**अर्थः**—त्याचप्रमाणें त्याच मुनिपुंगवांनीं आपल्या घराच्या मागील भागीं औदुंबर वृक्षाच्या खालीं असलेल्या या श्रीदत्ताच्या प्रस्तर पादुकांची नित्यनेमानें व आदरानें (वरील धातुमूर्ति मिळण्यापूर्वी) फार पुण्य व दीर्घकाल सेवा केली त्या श्रीदत्तपादुकांना मी अज्ञानी बाल दास वंदन करतों.

## श्रीसमर्थसद्गुरु " मोरभट्टअन्याभोने " वर्णन नमन प्रार्थना दशकम्

### पृथ्वीवृत्तम्

श्लोक

शिरोवलयवासिनं विनयवीर्यवैराग्यधिम् ।
प्रशांतमतिमानसं विमलमोरभट्टं मुनिम् ।
" अन्या " इतिसुसंज्ञितं किलतथा " बुवासाहिबः " ।
नमामि सततं च तं मम गुरोः प्रियं सद्गुरुम् ॥ १ ॥

**अर्थः**—शिरवळ गांवीं राहणारे, नम्रता, तेज व विरक्तता यांचे निधि ज्यांची बुद्धि व मन अति शांत, असे जे निष्पाप श्रीमोरभट्ट ऋषि, ज्यांना अन्या व त्याचप्रमाणें बुवासाहेब असें म्हणत असत, त्या माझ्या वडिलांच्या आवडत्या सद्गुरूंना मी निरंतर वंदन करतों.

श्लोक

वरेऽन्चशुचिविग्रहं स्थविरभव्यकृष्णाकृतिम् ।
निरामयमनालसं मधुगिरं प्रसन्नाननम् ।
सदैव रहसिस्थितं परमयोगिनं ज्ञानिनम् ।
नमामि सततं च तं मम गुरोः प्रियं सद्गुरुम् ॥ २ ॥

**अर्थः**—ज्यांचें शरीर सर्वोत्कृष्ट उंच व पवित्र, जे दिसण्यांत धृढ, धिप्पाड, व काळे, जे निरोगी व आलसहीन, ज्यांची वाणी रसाळ, ज्यांचें मुख प्रसन्न, नेहमीं एकांतात असणारे, जे महायोगी व ज्ञानी, त्या माझ्या वडिलांच्या प्रियकर सद्गुरूंना मी नित्य नमस्कार करतों.

श्लोक

श्रुतिस्मृतिपरायणं परमधार्मिकं वैदिकम् ।
स्वधर्मचरणव्रतं सततमात्मचर्चारतम् ।
निरंजनमकल्पषं सकलसज्जनानां मतम् ।
नमामि सततं च तं मम गुरोः प्रियं सद्गुरुम् ॥ ३ ॥

**अर्थः**—वेदशास्त्रपुराणांचे अत्यंत भक्त, अति धर्म करणारे, वेदाध्ययन करणारे, स्वधर्मचण हेंच ज्यांचें व्रत, निरंतर परमात्म विषयचर्चेत रममाण झालेले, निर्दोष, निष्पाप, सर्व संतांनीं मान दिलेले अशा त्या माझ्या वडिलांच्या प्रिय सद्गुरूंना मी चिरकाल प्रणिपात करतों.

श्लोक

मुनिप्रवरमंडनं परम दत्तभक्तं कविम् ।
स्वभक्तवन माधवं स्वजनकामकल्पद्रुमम् ।
विकार रिपुसूदनं विगलिताभिमानं प्रभुम् ।
नमामि सततं च तं मम गुरोःप्रियं सद्गुरुम् ॥ ४ ॥

**अर्थः**—मोन्यांच्या कुलाचें भूषण, परम दत्तभक्त, बुद्धिमान, ज्ञाते व विवेकी, निजभक्तरूपि अरण्याचे वसंतऋतु, आपल्या प्रियजनांची इच्छा पुरविणारे कल्पतरू, विकाररूपि शत्रूचा नाश करणारे, निराभिमानी सर्वसत्ताधीश, अशा त्या माझ्या वडिलांच्या प्रेमास्पद सद्गुरूंना मी सदैव प्रणाम करतों;

श्लोक

त्रितापकरिणो हरिं भवसमुद्रकुंभोद्भवम् ।
विकल्प तमसोरविं प्रचुरधैर्यतेजोगिरिम् ।
प्रियं रुचिरदर्शनं विबुधवंदनीयं विभुम् ।
नमामि सततं च तं मम गुरोः प्रियं सद्गुरुम् ॥५॥

**अर्थ:**—कायिक, वाचिक, मानसिक तापरूपि हत्तीला मारणारे सिंह; संसाररूपि समुद्रास प्राशन करणारे अगस्ति, कुकल्पनारूपि अंधःकाराचा नाश करणारे सूर्य, अत्यंत धैर्याचे व तेजाचे पर्वत, आवडते, मोदक चेहऱ्याचे, शहाणे लोकांनीं वंदन करण्यास योग्य, सर्वशक्तिमान, अशा त्या माझ्या वडिलांच्या प्रेमपात्र सद्गुरूंना मी अखंड नमन करतों;

श्लोक

मया सदय सद्गुरो, गुरुजनाननाद्विश्रुतम् ।
भवच्चरणपांसुभिर्मम पुराण पौंडाळयम्।
सदैव समलंकृतं दुरितशैशवाद्धाङ् मम ।
विनीय परिवत्सरे शुभनभादिमासत्रयम् ॥ ६ ॥

**अर्थ:**—हे सदय सद्गुरो, मी आपल्या वडील मंडळीच्या मुखांतून असें ऐकिलें आहे कीं, आपल्या चरणाच्या धुळीनें माझ्या सदोष बालपणापूर्वी आमच्या पौंड गांवच्या जुन्या घरीं प्रत्येक वर्षी श्रावणादि तीन शुभ महिने घालवून तें घर आपण नेहमीं सुशोभित करीत असा;

श्लोक

मदीय 'गुरुणांयया प्रियतमाग्रजा बंधुभिः ।
भवच्चरणमर्चितं प्रतिदिनं समा विंशतिम् ।
तदेव परिसेवितुं समयमालभे नो विभो ।
अतः खलु विभाति मे परम भाग्यहीनोऽस्म्यहम् ॥ ७ ॥

**अर्थ:**—माझ्या वडिलांनीं, मातुःश्रींनीं, वडिल बहिणींनीं, वडील बंधूंनीं आपल्या पायाची वीस वर्षे प्रत्यही सेवा केली. हे प्रभो, त्याच आपल्या पायाची सेवा करण्यास मला संधि मिळाली नाहीं. म्हणून मला असें वाटतें कीं, मी अत्यंत भाग्यहीन आहें;

श्लोक

तथापि हितकाम्यया भगवतः प्रसादेन च ।
द्विजामरकुलोद्भवप्रणतविश्वनाथस्य वै ।
मयाल्पमतिसूनुना विनतबालकृष्णेन तु ।
सुहृद्स्वसृसुबांधव प्रियजनानुकुल्पेन त्र ॥ ८ ॥

**अर्थः**—तथापि आपल्या हितबुद्धीनें व कृपेनें अमरकुलोत्पन्न ब्राह्मण (आपले अनुगृहीत) विनयशील श्री. विश्वनाथपंत (ऊर्फ नाना) यांचा मंदबुद्धी विनम्र सुत बाळकृष्ण यानें आपले मित्र, भगिनी बंधु प्रिय आप्त जन इत्यादिकांच्या साहाय्यानें

श्लोक

विरच्य नवमंदिरं लघुपुराण पूर्वस्थले ।
कृतेयमिह या भवत्पदयुगाल्पसेवाऽपिसा ।
मुनींद्र परिगृह्यतां सकरुणं सुखेनेतिच ।
भवंतमजसाइ दत्तगुरुदेवमभ्यर्थये ॥ ९ ॥

**अर्थः**—जुन्या ल्हानशा पूर्वीच्याच ठिकाणीं नवीन देवालय बांधून आपल्या चरणयुगलांची ही जी अत्यल्पसेवा केली आहे, तिचा हे मुनि-(मोने) कुलश्रेष्ठ, आपण कृपेनें व आनंदानें स्वीकार करावा, अशी आपल्याजवळ व ज्यांना जन्म नाहीं अशा श्रीसाईदत्तगुरु देवाजवळ प्रार्थना आहे;

श्लोक

सतां मुकुटसन्मणेः शिरडीवासिनः श्रीगुरोः ।
शिरोवलय वासिनोभगवतश्च मध्ये खलु ।
न कश्चिदपि भाति मे मुनिगणेश भेद स्त्वतः
प्रदाय पददर्शनं प्रकुरुतांकृतार्थं च माम् ॥ १० ॥

**अर्थः**—सत्पुरुषमुकुटमणी, शैलधीं (शिरडींत) त वास करणारे श्रीसाईसद्गुरु व शिरोवलयांत (शिरवळात) वास करणारे आपण (श्रीसद्गुरु बुवासाहेब) या आपण दोघांमध्यें, हे मोनेकुलकुटुंबमुख्य, कोणत्याही प्रकारचा भेद आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. म्हणून आपण मला आपल्या चरणाचें दर्शन देऊन कृतकृत्य करावें.

श्रीसाईनाथसद्गुरुभ्योनमः

# भोर संस्थान

श्रीशिवाजीमहाराजांनीं पूर्वी जे अष्टप्रधान निर्माण केले, त्यांपैकीं पंत सचीव हे एक होत. त्यांच्या संस्थानचें मुख्य ठिकाण भोर हें असून तें पुणें शहरच्या पूर्वेस ३२ मैलांवर आहे. या संस्थानांत पांच तालुके आहेत ते खालीं लिहिल्याप्रमाणेः--

| तालुक्याचें नांव. | तालुक्याचें मुख्य ठिकाण. | तालुक्याची १९३१ प्रमाणें लोक संख्या. |
|---|---|---|
| १ विचित्र गड ऊर्फ रोहिडा | शिरवळ | ४२३४४ |
| २ राजगड | नसरापूर | २६६५४ |
| ३ सुधागड | पाली | २६५१८ |
| ४ पवनमावळ ऊर्फ तुंगतिकोना | कोळवण | २५३८६ |
| ५ प्रचंडगड | वेल्हें | २०६६८ |

या पांच तालुक्यांत विचित्रगड ऊर्फ शिरवळ हा तालुका मुख्य आहे. श्रीमंत सरकार पंत सचीव यांची राजधानी भोरही याच तालुक्यांत आहे.

शिरवळ हा तालुका, क्षेत्रफळ, लोकसंख्या व वसूल या सर्व बाजूंनीं इतर चारी तालुक्यांपेक्षां श्रेष्ठ आहे.

या पांच तालुक्यांपैकीं चार तालुक्यांत प्रत्येकीं एकेक किल्ला असून पवनमावळ तालुक्यांत दोन किल्ले आहेत.

## शिरवळ गांवची लोकसंख्या व लोकवस्ती

शिरवळ गांवची लोकसंख्या २१७३ आहे. या गांवीं सर्व जातींची वस्ती असून ब्राह्मणवस्ती बरीच आहे.

येथील बरेच लोक नोकरीनिमित्त बाहेरगांवीं गेले आहेत. व जे येथें आहेत, त्यांचें उपजीवन शेतीवर व भिक्षुकीवर चालतें. या गांवीं पूर्वी बरेच वैदिक ब्राह्मण असत. परंतु हल्लीं एकही वैदिक नाहीं. याज्ञिक ब्राह्मण मात्र बरेच आहेत. मोने, देशपांडे, वाळिंबे, माणके व जोशी याच उपनांवांचे ब्राह्मण आहेत. त्यांच्या सोयरिकी बहुतेक आपापसांत होतात. बाहेरगांवच्या सोयरिकी थोडया होतात.

## नदी व घाट

हा गांव पुण्यसरित् श्री निराबाईच्या कांठीं आहे. निराबाईच्याच कांठचे खडक खोदून निराबाईस कोठें कोठें त्यांचे घाट बनविले आहेत. पण ते इतके जुनाट झाले आहेत कीं, त्यांच्या कांहीं ठिकाणीं हल्लीं फक्त खुणाच दिसतात. नदीचे कांठीं श्री निराबाईचें एक लहानसें मोडकें मंदिर आहे, व पुढें चिमुकलें पटांगण आहे,

## सती स्त्रियांच्या समाधि

या तटिनीतीरावर ठिकठिकाणीं लहान लहान दगडी देवाळयें असून सती गेलेल्या साध्वी व अति पूज्य स्त्रियांच्या अनेक लहान लहान दगडी समाधि आहेत.

## म्युनिसिपालिटी

या गांवांत म्युनिसिपालिटी आहे. पण ती फार लहान आहे. तिचें वार्षिक उत्पन्न १८०० पासून २००० रुपयांपर्यंत आहे.

गांवच्या मानानें रस्ते बरे आहेत. तसेंच गांवच्या साफसफाईची व दिवाबत्तीची व्यवस्थाही बरी दिसते. गांवांत शौचकूप नाहीत. क्वचित् ठिकाणीं अपवादात्मक म्हणून दोनचार सांपडतील.

## पाणीपुरवठा

गांवांत पाण्याचा पुरवठा विपुल आहे. घरोवर विहीर आहे. विहिरी

अरुंद पण फार खोल आहेत. कांहीं विहिरींचें पाणी गोड आहे व कांहींचें पाणी मचुळ आहे. निरावाईचें पाणी जड आहे.

## जुनीं देवालयें व विहिरी

गांवांत जुनी व नवीं देवालयें बरींच आहेत. त्यांपैकीं कांहीं श्रीमंत सरकार पेशवे यांच्या वेळचीं सुंदर दगडी बांधणीची असून फार भव्य व विस्तीर्ण आहेत. तशाच दगडी चिऱ्यांनीं बांधलेल्या जुनाट मोठमोठ्या पायऱ्यांच्या विहिरी आहेत. पण हीं देवालयें व ह्या विहिरी आतां मोडकळीस आल्या आहेत. श्रीकेदारेश्वराचें भव्य दगडी मंदीर व त्यापुढील विशाल दगडी विहीर शिरवळचे श्री. गणेश गोपाळ देशपांडे यांच्या पूर्वजांनीं बांधिली आहे.

## वेदशाळा

या गांवांत एक लहानशी वेदशाळा आहे. ती वे. मू. रा. रा. भिकाजी विष्णु ऊर्फ भिकंभट्ट काका मोने यांनीं चालविली आहे. पूर्वीपासून वेदाध्यापनाचा अधिकार मोने घराण्याकडेच आहे व ती परंपरा भिकंभट्ट काकांनीं चालू ठेवून ते निस्पृहतेनें अद्यापही विद्यादान करीत आहेत, हें त्यांना खरोखरीच भूषणावह आहे. त्यांचें वय ६७-६८ वर्षांचें आहे.

## किल्ला

गांवांत श्रीनिरामाई सरित्तीरावर दक्षिण बाजूस एक भुइकोट किल्ला आहे. तो चारपांचशें वर्षांपूर्वी मुसलमानी अमदानींत बांधला असावा असें दिसतें. त्याचें नांव "सुभानमंगल" असें येथील रहिवासी सांगतात. हें नांव यवनी सरदाराचें असावें असें म्हणतात. पण हा निवळ तर्क आहे. हें नांव हिंदुही असूं शकेल. किल्ला सर्व बाजूंनीं पडलेला आहे.

## दुर्गामाता

या किल्ल्यांत एक लहानसें श्रीजगदंबामातेचें मंदिर आहे तिला श्री "दुर्गामाता" असें म्हणतात. यावरून किल्ला हिंदूंनीं बांधला असून त्याचें

नांवही हिंदूच असावें असें वाटतें. "सुभानुमंगल" चा थोडा अपभ्रंश "सुभानमंगल" दिसतो. "सुभानु" व "मंगल" हे दोन्हीं शब्द पूर्ण संस्कृत आहेत. व अद्याप आपल्यांत भानु, सुभाना, सुभानराव हीं नांवें प्रचलित आहेत. सुभानु हें नांव साठ संवत्सरांपैकीं एका संवत्सराचें आहे हें सुप्रसिद्धच आहे.

## उत्सव

या गांवांत निरनिराळ्या देवांचे निरनिराळ्या वेळी चारपांच उत्सव होतात.

## सरकारी इमारती

गांवांत मामलतदार कचेरी, फौजदार कचेरी, म्युनिसिपालिटीचें ऑफिस, पब्लिकवर्कस् स्टोअर, दवाखाना, मराठी सातव्या इयत्तेपर्यंतची शाळा, तिच्यांतच एक इंग्रजी तिसरे इयत्तेपर्यंतचा वर्ग, धर्मशाळा गौशाळा आदिकरून इमारती आहेत. पोस्ट आफिस व त्यांतच तार ऑफिस आहे.

## मोटार अड्डा

या गांवीं पुण्याहून सातारा, वाई, महाबळेश्वर, कोल्हापूर, भोर, नसरापूरकडे जाणाऱ्या व तिकडून परत येणाऱ्या मोटरींचा मोठा अड्डा आहे.

## व्यापार व बाजार

हा गांव बागाइती आहे. पण व्यापार शून्य आहे. येथें अठवडयाचा बाजार दर शुक्रवारीं भरतो.

## गांवचें हवामान

या गांवची हवा फार उत्तम आहे. बाहेरगांवचे बरेच लोक येथें हवा खाण्याकरितां येतात; हा गांव थोडासा उतारावर वसला असल्या कारणानें गांवांत नैसर्गिक गटारें आहेत. त्यामुळें गांवांत केव्हांही व

कोठेंही पाण्याचा थेंब राहत नाहीं. म्हणून दुर्यात (मलेरिया)सारख्या रोगांना येथें थारा मिळत नाहीं.

## पाऊस

येथें पाऊस १५–२० इंचापेक्षां जास्त पडत नाहीं.

## जमिन व पिकें

या गांवची जमीन सुपीक आहे. गहूं, बाजरी, जोंधळा, हरभरा, मुइमूग, गाजरें, केळीं, रताळीं, ऊंस, करडई, तीळ, खुरासणी, व इतर बागाईत जिन्नस येथें पिकतात.

## शिरवळ गांवची व्युत्पत्ति

या गांवची व्युत्पत्ति खाली लिहिल्याप्रमाणें असावी असें वाटतें.

"शिरवळ" हा शब्द मूळ "शिरोवलय" या संस्कृत शब्दा पासून झाला असावा.

"शिरोवलय" यातील शेवटचा "य" कालांतरानें लुप्त झाला. जसे गंगालय=गंगाळ, देवालय=देऊळ, या शब्दांतील शेवटच्या "य"चा लोप झाला आहे. त्याप्रमाणें "शिरोवलय यातील" "य"चा लोप होऊन नंतर "शिरोवल" हें पद शिल्लक राहिलें. नंतर कालांतरानें या पदातील "ल"चा "ळ" झाला; जसें नारीकेल=नारळ, फल=फळ, तंदुल=तांदुळ. त्याप्रमाणें "शिरोवल" यातील "ल"चा "ळ" होऊन नंतर "शिरोवळ" असें रूप झालें. नंतर "मनोभंग" तेजोभंग" "शिरोभंग" या संस्कृत शब्दांतील "ओ"चा मराठींत अ होतो, त्याप्रमाणें "शिरोवळ" यांतील "ओ"चा "अ" होऊन हल्लीचें रूप "**शिरवळ**" असें झालें.

## शिरवळ शब्दाचा अर्थ

आतां "शिरोवलय" या संस्कृत शब्दाचें पृथक्करण केलें म्हणजे त्यांत दोन शब्द आढळतात. शिर+वलय. शिर म्हणजे मस्तक, मुख्य, श्रेष्ठ

उच्च व वलय म्हणजे वळें, वेढें, कडें, भूषण, अलंकार. म्हणून शिरोवळय याचा अर्थ पांची तालुक्यांत मुख्य किंवा पांची तालुक्यांचें भूषण असा गांव.

## पूर्व वैभव

या गांवचा व्युत्पत्तिवरून व अर्थावरून असें दिसतें कीं, हा गांव पूर्वी एका काळीं वैभवशाली, सर्वांगसुंदर, अप्रमान्य, भरभराटीचा, गुणी विद्वज्जनांनीं गजबजलेला व्यापारी पेठेचा. संत व सती स्त्रिया यांच्या जन्मभूमीचा व पुणें सातारा, वाईकडून महाबळेश्वर महाड आदि करून शहरांकडे जाणाऱ्या व तिकडून येणाऱ्या लोकांच्या मुक्कामाचा असावा. पूर्वी येथें मोठमोठया इमारती असाव्या असें हल्लीं त्यांचीं पडकीं, विशाल, मजबूत दुमजली भव्य भिंताडें व मोठमोठ्या दगडांची माठी व जोती, शिल्लक राहिलीं आहेत त्यावरून दिसतें.

## व्यापार

हा गांव फार प्राचीन कालचा आहे. असें सांगतात कीं, सदर्न मराठा रेल्वे निघण्याच्या पूर्वी म्हणजे सन १८८५ सालापूर्वी हा गांव व्यापाराचें केंद्र होतें. विशेषेंकरून किराणे मालाचा व्यापार येथें फार मोठा चालत असे.

येथील चर्मी जोडे पूर्वी फार प्रसिद्ध असत व हल्लींही आहेत. ते मजबूत, टिकाऊ व पुढें जरा निमुळते असतात.

## शिरवळ गांवचें ऐतिहासिक महत्त्व

हा गांव इतिहासप्रसिद्ध आहे. श्रीशिवाजी महाराजांच्या समकालीन

कवि परमानंद गोविंद नेवासकर, ज्यांना कवींद्र ही पदवी होती, त्यांनीं श्रीशिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून त्यांच्या राज्यारोहणापूर्वी म्हणजे शके १५८३-८४ च्या सुमारास लिहिलेल्या शिवभारत नामक संस्कृत काव्य-ग्रंथाच्या १३ व्या अध्यायांत या गांवीं शिवाजीमहाराजांचा सेनापति कावुक ऊर्फ कावजी व विजापुरचे बादशहा अदिलशहा ऊर्फ महमुद याचा सरदार बल्लाळ हैबत राजे यांच्यामध्यें शके १५८० च्या सुमारास शिरवळचा भुइकोट किल्ला हस्तगत करून घेऊन शिरवळ प्रांतातील लोकांस मुसल-मानांच्या जुलमापासून सोडविण्याकरितां घनघोर युद्ध झालें, अशी हकीकत दिली आहे. या लढाईच्या वर्णनांत परमानंद कवींनीं या किल्ल्यास वप्र, दुर्ग, अशा नांवांनीं व शिरवळास "शिरोबल" अशा नांवानें संबोधिलें आहे. शिरवळास त्यांनीं "शिरोवलय" असें म्हटलें नाहीं, व किल्ल्यास "सुभानमंगल" असेंही म्हटलें नाहीं. "शिरवळकर देशपांडे" यांचे शके १५३४ पासून शके १५७२ पर्यंत जे कागदपत्र छापून प्रसिद्ध झाले आहेत, त्यांतील शके १५५२ भाद्रपद कृष्ण सप्तमीच्या पत्रांत किल्ले "सुभानमंगल" असा उल्लेख आहे. मग तो परमानंदांच्या वरील काव्यांच्या १३ व्या अध्यायांत कां आढळूं नये, हें एक कोडेंच आहे. असो. तूर्त आप-ल्यास या चर्चेशीं कांहीं कर्तव्य नाहीं.

## संतजन्मभूमि

हा गांव साधुसंतांची, योगीजनांची व साध्वी-सती स्त्रियांची जन्मभूमि आहे. या गांवीं पूर्वी गांवांतील लोकांच्या माहितीप्रमाणे बरीच प्रसिद्ध व अप्रसिद्ध संतरत्नें होऊन गेलीं.

# समर्थ श्रीनारायणस्वामी

श्रीसमर्थ रामदासस्वामी
|
शिष्य श्रीवासुदेवस्वामी
|
शिष्य श्रीमहादेवस्वामी
|
शिष्य श्रीपुरुषोत्तमदास
|
शिष्य श्रीभिमाजी स्वामी — शिष्य **श्रीनारायणस्वामी**
- शिष्य श्रीभिमाजी स्वामी
  - शिष्य जयरामस्वामी
    - शिष्य हरि ऊर्फ भाऊ गोसावी
      - रामचंद्र गोसावी
      - लक्ष्मण गोसावी
        - सीतारामबोवा गोसावी
          - दत्तात्रयबोवा गोसावी हल्लीं हयात
- शिष्य **श्रीनारायणस्वामी**
  - शिष्य बाजीबोवा

या गांवीं एक जुनें राममंदिर आहे, त्यास मठ म्हणतात. त्यांत श्रीनारायणस्वामी नामाभिधानाच्या संतांची समाधि आहे. हे रामदासपंथी यजुःशाखेचे ब्राह्मण असून महासिद्ध व महायोगी होते. यांची गुरुपरंपरा एकान्यांत दिल्याप्रमाणें आहे. ही समाधि ३००-४०० वर्षांची जुनी आहे. नारायणस्वामींची पुण्यतिथि अद्याप दरसाल पौष शु॥ १४ रोजीं याच मंदिरांत होत असते. हें मंदिर नारायणस्वामींनींच स्थापन केलें आहे. एके वर्षीं पुण्यतिथीच्या उत्सवदिवशीं तुपाचें बुधलें वेळेवर न आल्यामुळें नारायणस्वामींच्या अधिकारी शिष्यवर्गांनीं उत्सवाची अब्रू राखण्याकरितां स्वामींची प्रार्थना करून समाधीच्या उजव्या बाजूस पाण्याची विहीर आहे, त्या विहिरींत स्वामींच्या समाधीचें तीर्थ शिंपडलें व घागर विहिरींत सोडली. ती तुपानें भरून आली. त्यामुळें उत्सवकार्य झालें, व थोडेंसें तूप शिल्लक राहिलें, तें शिष्यमंडळींनीं पुन्हा विहिरींत ओतून दिलें. ही आख्यायिका शिरवळास सर्वांना माहित आहे. तेव्हांपासून या समाधीस पुष्कळ लोक उत्सवांत तूप वाढण्याचा नवस करतात. चालू सालीं या उत्सवांत मी भोजनास गेलों होतों. शेंकडो लोकांनीं आपापल्या भांडयांत तूप आणून स्वतः पानांत वाढल्याचें मी प्रत्यक्ष पाहिलें व सर्वांनीं मनमुराद खाल्लें. देखावा फारच अपूर्व

व प्रेक्षणीय वाटला. या समाधीस शिरवळ येथें जमीन इनाम आहे. अज-मासें खंडीभर दाणें येतात. हें इनाम श्रीछत्रपतिमहाराजांपासून आहे. श्रीसचीव सरकार, भोर, यांजकडूनही या समाधीस दरसाल नक्त नेमणूक रु. ३४ मिळते. शिरवळपासून ४ कोसांवर कन्हेरी गांवीं वासुदेवस्वामींचा मठ आहे; हें इनाम वासुदेवस्वामींनीं संपादन केलें. ही सर्व माहिती श्रीदत्तात्रयबोवा गोसावी यांच्या कागदपत्रांवरून मला मिळाली.

## श्रीसमर्थ बाजीबुवा

वरील श्रीराममंदिराच्या डाव्या बाजूस पण राममंदिराबाहेर बाजी-बोवांचा मठ असून त्यांत बाजीबोवांची समाधि आहे. हे बोवा क्षत्रिय जातीचे असून महासिद्ध होते. हे वरील नारायणस्वामींचे शिष्य होते. यांच्या समाधिसंबंधानें अशी आख्यायिका आहे कीं, ही समाधि अधिकृत माणसानें शुद्धांतःकरणानें व सद्भावानें "बाजी डोल" अशी प्रार्थना केल्यावर डोलत असे. ही आख्यायिका श्रीमंत सरकार थोरले माधवरावसाहेब पेशवे यांच्या कानावर गेली. म्हणून ते स्वतः त्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं "बाजी डोल" अशी समाधिजवळ शुद्धांतःकरणानें व नम्रभावानें प्रार्थना केली. प्रार्थना केल्याबरोबर खरोखरच समाधि डोलूं लागली. हा चमत्कार पाहतांच माधव-रावसाहेबांनीं लागलीच या समाधि-खर्चाकरितां रामाजी गोसावी बीन बाजी गोसावी यांच्या नांवें इनाम करून दिलें. मीं ही सनद ता. २७-?-३३ रोजीं समक्ष पाहिली. त्यांत समाधि आपल्या समक्ष डोलली अशीं अक्षरें आहेत. ही सनद सन १७६३ सालीं करून दिलेली आहे. ही हकीकत श्रीमंत पंतसचीव यांना शंकराजी नारायण यांचे चिरंजीव श्रीमंत नारोशंकर पंडित सचीव यांना कळली. तेव्हां त्यांनीं ही पेशवे सरकारची सनद पाहून त्यांनीं दुसरी एक सनद रामाजी गोसावी यांच्या नांवें करून देऊन जमीन इनाम करून दिली आहे. ही त्याच सुमारास म्हणजे सन १७६४-६५ च्या सुमारास करून दिलेली आहे. ही सनद मीं वाचली. ह्या दोन्ही

सनदा मोडींत लिहिल्या आहेत. त्यावर अरबी तारखा व सन या आहेत. सनदा वरील तारखेस श्रीमंत पंतसचीव भोर युवराजसाहेबांचा मुक्काम शिरवळ-सरकारी वाड्यांत असतां मला श्री. आपासाहेब गांडेकर फडणीस यांनीं दाखविल्या. याबद्दल मी त्या उभयतांचा आभारी आहे. दोन्ही सनदांवर शिक्का-मोर्तब केलेलें आहे.

## श्री गंगूकाका क्षीरसागर

अजमासें ६०-६५ वर्षांपूर्वी या गांवीं श्रीसमर्थ गंगूकाका क्षीरसागर या नांवाचे साक्षात्कारी संत होऊन गेले. हे वारकरी पंथांपैकीं होते. पूर्वी श्रीक्षेत्र आळंदीहून गुरव लोक श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पादुका गळ्यांत घालून वारकऱ्यांसह आषाढी एकादशीच्या वेळीं श्रीक्षेत्र पंढरपूर येथें नेत असत. श्री गंगूकाकांनी ही वहिवाट बंद करून त्या पादुका पालखींत घालून नेण्याचा प्रघात सुरू केला.

श्री. गंगूकाकांनीं पंढरपुरीं श्रीपांडुरंगापुढें उपोषणें करून अनुष्ठान केलें. त्यांत पंढरपूरचे प्रसिद्ध साक्षात्कारी पंडित प्रल्हाद भाऊ बडवे यांच्या वंशजास श्रीपांडुरंगाचा दृष्टांत झाला कीं, श्री गंगूकाकास तुझ्याजवळ श्रीसमर्थ तुकारामबुवांच्या अभंगांची जी वही आहे ती प्रसाद म्हणून दे व त्यास जेऊं घाल. त्याप्रमाणें श्री. बडवे यांच्या वंशजांनीं केलें, असें शिरवळ-निवासी वृद्ध श्री. भिकाजी विष्णु ऊर्फ काका मोने आदिकरून मंडळी सांगतात. श्री गंगूकाकाचें त्रोटक चरित्र श्रीदासगणूकृत भक्तिलीलामृताच्या ३४ व्या अध्यायांत दिलें आहे. गंगूकाकांचा मठ पंढरपुरीं प्रसिद्ध आहे.

## श्री मोरभट्ट अन्या मोने

याच शिरवळ गांवीं अजमासें ६२ वर्षांपूर्वी मोने घराण्यांत श्रीसमर्थ सद्गुरु मोरभट्ट अन्या या नांवाचे परम साक्षात्कारी, पूर्ण ज्ञानी व

अधिकारी सत्पुरुष होऊन गेले, त्यांची राहणी अत्यंत साधी असून ते महा-योगी, विरागी वैदिक होते. ते नितांत दत्तभक्त असून गुप्त संत होते. त्यांचें साधुत्व आजूबाजूच्या पुष्कळ गांवच्या लोकांना माहित होतें. शिरवळ प्रांत खेरीज करून ते इतरत्र फारसे प्रसिद्धीस आले नाहींत किंवा त्यांना कोणी प्रसिद्धीस आणिलें नाहीं. हेच आपले चरित्रनायक होत.

अन्या हे अत्रि गोत्री देशस्थ ब्राह्मण. यांचा वर्ण कृष्ण; चेहरा शांत व गंभीर, प्रफुल्लित व आनंदी; काठी उंच, नाक सरळ, शरीर सशक्त व धिप्पाड, कांति तेजःपुंज, वयोवृद्ध, वाणी रसाळ व गोड असून सत्य असे ते आजानुबाहु होते. त्यांचा आहार सात्त्विक असून ते नियमबद्ध असत. ते संसारांत कधींच लक्ष घालीत नसत. जेह्मीं श्रीदत्तसेवा, योग, समाधि व आत्मचर्चा यांत निमग्न असत. ते फार करून एकांतांत बसत. शिरवळास त्यांच्या घरीं ( हल्लीं ज्या ठिकाणीं नूतन मंदिर बांधिलें आहे त्या ठिकाणीं ) त्यांच्या देवखोलींत ते दोनदोन तीनतीन दिवस समाधि लावून बसत. त्यांचे गुरु कोण, त्यांनीं आत्मज्ञान कोठून, कसें व केव्हां संपादन केलें, हें कळत नाहीं. तथापि त्यांच्यासंबंधानें एक आख्यायिका सांगतात. तो चमत्कार या सदरांत पुढें येईल.


## मोरभट्ट अन्यांचीं निरनिराळीं नांवें
## मोरभट्ट अन्यांच्या कुटुंबाचें नांव, माहिती व तर्क

मोरभट्ट अन्यास कोणी "अन्या" कोणी "बुवासाहेब" म्हणत. अन्या वारल्यास ६२ वर्षे झालीं. त्यांचें कुटुंब त्यांच्यापूर्वी २०-२५ वर्षे वारलें होतें, असें माझ्या घरच्या वृद्ध मंडळीच्या व शिरवळ येथील वृद्ध मंडळीच्या माहितीवरून दिसतें. त्यांचें नांव, जन्म व मृत्युशक कोठें मिळत नाहीं, ही फार दुःखाची गोष्ट आहे. विंगचे राहणारे श्री. गंगाधर वामन ऊर्फ बाबा आचार्य जोशी, वय वर्षें ७६-७७, हे हल्लीं हयात आहेत. त्यांच्या

घराण्यावर अन्यांचें फार प्रेम. अन्यां वारले तेव्हां गंगाधरपंत १४-१५ वर्षांचे होते. ते अन्यास " मोरूमामा " त्यांच्या कुटुंबास " रखुमामामी " अन्यांच्या बंधूस "रघुमामा" व त्यांच्या कुटुंबास " भागीरथीमामी " म्हणून हाक मारीत, असें सांगतात. श्रीदत्तात्रय पांडुरंग ऊर्फ बगोबा मोने यांच्या घरीं रद्दी कागदांच्या भाऱ्यांत श्रीकाशीक्षेत्राहून श्रीरघुनाथभट्टजी यांनीं १०० वर्षांपूर्वी श्री अन्यास स्वदस्तुरचें पाठविलेलें पत्र मला मिळालें. त्या पत्रावरून रघुनाथभट्टजींबरोबर त्यांचें कुटुंब सौ. भागीरथीबाई, महादेवभट्ट व रखुमाबाई व इतर दुसरी मंडळी होती, असें दिसतें. या पत्रांत "मातुःश्री रखुमाबाई व महादेव खुशाल आहेत " असें लिहिले आहे; यांवरून रखुमाबाई ह्या अन्यांचेंच कुटुंब असावें, असा तर्क होतो व गंगाधरपंतांच्या म्हणण्यास पुष्टि येते. परंतु अन्यांचें कुटुंब जर अन्यांच्या अगोदर २०-२५ वर्षे वारलें होतें, व अन्या वारले तेव्हां गंगाधरपंत जर १४-१५ वर्षांचे होते, तर ते अन्यांच्या कुटुंबास " रखुमामामी " कोठून म्हणतील ? तसेंच रखुमाबाई हेंच जर नांव अन्यांच्या कुटुंबाचें असतें, तर रघुनाथभट्टांनीं आपल्या पत्रांत " सौ. मातुःश्री रखुमाबाई " असें लिहिलें असतें. नुसतें " मातुःश्री रखुमाबाई" असें लिहिलें नसतें. तिसरी गोष्ट अशी कीं, महादेवभट्टांचे चिरंजीव रामचंद्रभट्ट ऊर्फ बाळंभट्ट, राहणार भोर, हे मला असें सांगतात ( वय वर्षे ७७-७८ ) कीं, रखुमाबाई हें नांव त्यांच्या आजीचें म्हणजे विठ्ठलभट्टांच्या कुटुंबाचें आहे व तें त्यांच्या मातृत्रयींत येतें, व ह्या रखुमाबाई रघुनाथभट्टाबरोबर काशीस गेल्या होत्या व यांच्याच मांडीवर अन्यांचे कनिष्ट चिरंजीव महादेवभट्ट ( बाळंभट्टांचे वडील ) दिले होते. मला ही माहिती गंगाधरपंतांपेक्षां जास्त विश्वसनीय व तर्कशुद्ध वाटते. विठ्ठलभट्टांच्या कुटुंबाचें नांव रखुमाबाई असणें जितकें

व्यवहारपद्धतीस अनुसरून आहे, तितकें मोरभट्टांच्या कुटुंबाचें नांव रखुमा-माई असणें व्यवहारास अनुसरून नाही.

## अन्यांच्या कुटुंबाचें माहेर




जास्त तपासावरून अन्यांच्या कुटुंबाचें माहेर सासवडनजीक नारायणपेठ येथील पुरंदरे यांच्या घरीं आहे असें कळलें, म्हणून ता. २७-१२-३३ रोजीं मी व बगंभट मोने तेथें गेलों व वृद्धांत वृद्ध दामूआण्णा पुरंदरे वय वर्षे ७६-७७ व चिमापा पुरंदरे वय वर्षे ८३ यांना भेटलों. त्या उभयतांच्या सांगण्यावरून अन्यांचें कुटुंब हें रामचंद्रपंत पुरंदरे यांची कन्या म्हणजे दामूआण्णा पुरंदरे यांची आत्या होत्या. त्यांचें नांव व जन्म-मृत्यु व शक त्या उभयतांसही माहित नाहीं. त्यांनीं रामचंद्रपंतांचा, अन्यांच्या कुटुंबाचा, दामूआण्णांचा, व चिमापांचा संबंध दाखविणारा वंशवेल रकान्यांत लिहिल्याप्रमाणें सांगितला आहे.

## मोन्यांचें मूळ ठिकाण

मोने हे मूळचे श्रीक्षेत्र काशीचे रहिवासी. तेथें अद्यापपावेतों त्यांचीं दुसरीं घराणीं आहेत व तीं तेथें "मौनी" या उपनांवानें प्रसिद्ध आहेत. मोने यांना त्यांचे परमस्नेही माणके यांनीं शिरवळास आणिलें. मोन्यांच्या कोणत्या पुरुषांना माणक्यांच्या कोणत्या पुरुषांनीं केव्हां व कसें शिरवळास आणलें याबद्दल नक्की माहिती कळत नाहीं. तथापि त्यांना इकडे आणिल्यास अजमासें २०० वर्षे तरी झालीं असावीं, असें वाटतें.

## मोने शब्दाची व्युत्पत्ति

मोने हा शब्द मुनि शब्दाचा अपभ्रंश दिसतो.

मुनिः—मननशीलः योगी, ब्रह्मनिष्ठ मौनस्यः

मौनी—मौनमास्यास्तीति मौनी.

मौने—मौन धारण करणारे.

मोने—मौने या शब्दाचें अपभ्रष्ट रूप

श्रीमच्छंकराचार्यांनी मुनि शब्दाची व्याख्या केली आहे ती खाली लिहिल्याप्रमाणें:—

मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः

आनंदलहरी

## अन्यांची वृत्ति व आचरण

अन्यांची वृत्ति व आचरण वर व खालीं लिहिल्याप्रमाणें असे, असें माझे परमपूज्य वडील, वडील बंधु व मातुःश्री मला नेहमीं सांगत.

मंदाक्रांता

मौने मौनी गुणिनि गुणवान् पंडिते पंडितश्च ।
दीने दीनः सुखिनि सुखवान् भोगिनि प्राप्तभोगः ।
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिनि प्रौढवाग्मी ।
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः ॥

आनंदलहरी

यावरून मोने यांच्या कुलांत पूर्वी कोणी तरी मुनिवृत्तीचे व आचरणाचे सत्पुरुष होऊन गेले असले पाहिजेत व त्यांचाच द्वितीयावतार प्रस्तुतचे चरित्रनायक श्रीमोरभट्ट अन्या हे होते, असें स्पष्ट दिसतें. अन्यांनीं

वडिलोपार्जित उपनांव व मुनि ही संज्ञा सार्थ करून दाखविली यांत तिल-प्राय संशय नाही.

## अन्यांचा जन्म व जन्मतिथि

अन्यांचा जन्म शिरवळ येथें झाला, पण त्यांची जन्मतिथि व शक मिळूं शकत नाही.

## अन्यांचें निधन व त्या वेळीं त्यांचें वय

अन्या दरसालप्रमाणें शके १७९३ सालीं अंबवडे येथें अनुष्ठाना-करितां गेले होते. वृद्धापकाळामुळें त्या वर्षी त्यांना तेथील हवा न मानवल्या-मुळें ते तेथें फार आजारी झाले. हें वर्तमान कळतांच त्यांचे चिरंजीव श्री. नारायणभट्ट व श्रीमहादेवभट्ट हे अंबवडयास गेले, व पालणा करून ते त्यांना नेऱ्यास घेऊन आले. परंतु त्या दुखण्यांतून ते बरे न होतां शेवटीं निर्घृण कालानें नेऱ्यासच त्यांच्यावर झडप घालून आश्विन कृ. ३ मंगळवार शके १७९३ रोजीं मोने घराण्यांतील कुलदीप मालवून संतरत्न लोढून नेलें. त्या वेळीं अन्यांचें वय अजमासें ७५-८० असावें, असें श्रीमती राधाबाई सुभेदार राहणार शिरवळ वय वर्षे ८०-८५, श्री. गंगाधर वामन जोशी विंगकर वय वर्षे ७६-७७, श्री.त्रिंबकभट्ट वामनभट्ट माणके शिरवळकर वय वर्षे ७६-७७ व श्री आपाजी गोविंद ऊर्फ आपासाहेब देशपांडे शिरवळकर वय वर्षे ७६-७७ ही मंडळी सांगतात. ही सर्व मंडळी अद्याप हयांत आहेत.

ता. २९-५-३२ रोजीं मी, माझें कुटुंब सौ. जानकीबाई व श्री. बगोबा मोने, भोर येंथें गेलों, व श्री. रामचंद्रभट्ट ऊर्फ बाळंभट्ट मोने ( महादेवभट्ट मोने यांचे चिरंजीव ) यांजकडून अन्यांची निधनतिथि व मोने घराण्याचा वंशवेल आणिला तो खालीं लिहिल्याप्रमाणें:—

## अन्यांच्या दत्तपादुका

हल्लींची दत्तमूर्ति मिळण्यापूर्वी अन्या हे दत्ताच्या दगडी पादुकांची पूजा करीत असत. ह्या पादुका त्यांच्या घरामागें विहिरीजवळ एक लहानसें औदुंबराचें झाड होतें, त्याच्याखालीं ठेविलेल्या असत. ह्या पादुका त्यांना कशा मिळाल्या, किंवा त्यांनीं कोठून आणिल्या, त्याबद्दलची माहिती उपलब्ध नाहीं. अन्या ह्या पादुकांचा दरसाल मार्गशीर्ष शु. १४ रोजीं उत्सव करीत असत. दत्तमूर्ति मिळाल्यानंतर अन्या दत्तमूर्तीचा व पादुकांचा उत्सव करूं लागले. हल्लीं हा उत्सव अन्यांच्या बंधूंचे नातू बगोबा मोने करतात.

## अन्यांस ही दत्तमूर्ति कशी मिळाली? याबद्दल माझ्या वडील बंधूनीं सांगितलेली विश्वसनीय माहिती

एकदा शिरवळ गांवांत एक पालखीपदस्थ वृद्ध सन्यासी आले. ते फार विद्वान असून कर्मठ असत. ते दत्तपूजा करीत. त्यांच्या पूजेचा मोठा थाट असे. चतुर्थाश्रम घेतल्यावर देवाची पूजा वर्ज असतांना हे स्वामी देवपूजा कशी करतात, अशी गांवांत चर्चा सुरू झाली; पण हे स्वामी विद्वत्ताप्रचुर असल्यामुळें त्यांना ही शंका विचारण्यास कोणी धजेना. सर्व मंडळींनीं ही गोष्ट अन्यांच्या कानावर घातली. अन्या म्हणाले, 'ठीक आहे.' नंतर स्वामी ज्या मंदिरांत उतरले होते, तेथें अन्या गेले. स्वामी पूजा करीत बसले होते, व सर्व शिष्यवृंद तेथें हजर होता. अन्या स्वामीस म्हणाले, 'मला एक स्वप्न पडलें आहे, त्याचा उलगडा होत नाहीं; तो आपण कराल, अशा इच्छेनें मी आपल्याकडे आलों आहें.' स्वामी म्हणाले, 'बरें आहे. तुमचें स्वप्न सांगा.'

अन्या म्हणाले, मी स्वप्नांत दोन मोठे हौद पाहिले. एक सोन्याचा व दुसरा लोखंडाचा. सोन्याचा हौद साखरेनें भरला होता, व लोखंडाचा विष्ठेनें भरला होता. साखरेनें भरलेल्या सुवर्णाच्या हौदांत आपण ( स्वामी )

उभे होतो, व विष्टेनें भरलेल्या लांबुंडाच्या हौदांत आम्ही उभे होतों. नंतर असा प्रकार पाहिला की, आपण आमचें अंग चाटूं लागलां व आम्ही आपलें अंग चाटूं लागलों. इतकें पाहून मी जागा झालों. तेव्हां हें स्वप्न काय आहे म्हणून आपल्यास विचारण्यास आलों.'

इतकें ऐकल्यावर या स्वप्नमिषानें अन्यांनीं आपल्या मूर्तीपूजेवर बिनतोड हल्ला चढविला आहे, असें स्वामी मनांत चटकन् समजले व लाग-लीच आपल्या शिष्यगणांस बोलावून "अरे, हें देवतार्चन व हा पूजासंभार येथून उचला, व आजपासून पूजा बंद" असें म्हणाले. शिष्यांनीं स्वामींच्या आज्ञेप्रमाणें तत्काल तसें केलें. शिष्यांना नंतर एका बाजूस जाण्यास सांगून स्वामींनीं अन्यांचे पाय धरले, व म्हणाले, 'कीं माझ्या डोळ्यांवरील अज्ञान-प्रटल आज आपण दूर केलेंत. मला आजपर्यंत आपल्यासारखा स्पष्टवक्ता कोणीं मिळाला नाहीं. आपण माझे गुरु आहां. ( ही गोष्ट आम्हाला नेहमी आमचे परमपूज्य वडील बंधु गोविंदरावदादा सांगत व त्यांना ती स्वतः बुवासाहेबांनीं (अन्यांनीं) सांगितली असें म्हणत. )

## याच मूर्तीबद्दल बगंभट्टांची आख्यायिका

श्री बगंभट्ट मोने यांनीं या मूर्तीबद्दल अशी आख्यायिका सांगितली कीं, सुमारें १०० वर्षांपूर्वी एका पालखीपदस्थ संन्याशाजवळ ही मूर्ति होती. त्यांचा वृद्धापकाल झाला असल्यामुळें व अंतसमयही जवळ आल्यामुळें आपल्या मागें ह्या मूर्तीची पूजा करण्यास योग्य गृहस्थ कोण मिळेल अशा काळजींत व शोधांत असतां ते फिरत फिरत शिरवळ मुक्कामीं आले. त्यांचें व अन्यांचें बोलणें झालें. तेव्हां या दत्तमूर्तीची यथा-शास्त्र व यथासांग जोपासना व पूजा करण्यास एक तुम्हीच मला लायक दिसतां असें म्हणून त्या (द्राविडी) स्वामींनीं ही मूर्ति अन्यांना दिली.

## माहिती व आख्यायिका यांचा निष्कर्ष

माझ्या बंधूंनीं माझ्या लहानपणीं सांगितलेली ही गोष्ट मीं अद्याप-

पावेतों बगोबास कधीही सांगितली नव्हती व बगोबांस परंपरागत चाल- लेली आख्यायिका माझ्या बंधूंना माहित नव्हती. परंतु या दोन हकीकती एकत्र केल्या तर अन्यांनीं ज्या संन्याशास स्वप्न सांगून फजित केलें, त्याच संन्याशांच्या पूजेची ही दत्तमूर्ति त्यांनी अन्या पूर्ण ज्ञानी आहेत असें ओळखून, आपण शिष्यभाव पत्करून गुरुरूप मानलेल्या गृहस्थाश्रमी वैराग्यशील अन्यांस दिली असली पाहिजे असें स्पष्ट दिसतें.

मूर्ति कशी आहे याबद्दल सविस्तर वर्णन प्रथमारंभींच संस्कृत पद्यांत दिलें आहे.

## श्रीमंत सरकार पंत सचीव व अन्यांचा संबंध सचीव सरकारांनीं शिरवळ-दत्तास पूर्वीं दिलेल्या नक्त नेमणुका

पंत सचीव यांचें मुळचें आडनांव गांडेकर. गांडेकरांचीं घराणीं तीन ठिकाणीं होतीं. नेरे, भोर व मांगदरी. मांगदरीचे रामजी आपा उर्फ आपा- साहेब (रामचंद्र काशी) यांचे चिरंजीव बळवंतराव यांना त्यांच्या वयाच्या पांचव्या वर्षी भोरच्या पंतसचीवसरकारच्या मांडीवर दत्तक दिलें. त्यांचें नांव इकडे चिमाजी ऊर्फ नानासाहेब असें ठेविलें हे नानासाहेब वयानें फार लहान असल्यामुळें त्यांचे वडील रामजीआपा यांस त्यांचे कारभारी नेमलें. या रामजीआपांची विशेष भक्ति मोरभट्ट अन्यांवर असून ते त्यांना गुरु म्हणून मानीत. म्हणून रामजीआपांनीं अन्यांचे दत्तास सर्व तालुके मिळून १५ रुपयांची नक्त नेमणूक व अंबवड्याच्या अनुष्ठानाची दरसाल १५ रुपयांची नेमणूक याप्रमाणें दोन नेमणुका करून दिल्या. हल्लींचे पंतसचीव श्रीमंत सरकार बाबासाहेब यांचे उपरिनिर्दिष्ट नानासाहेब हे आजे. हल्लींच्या परिस्थितिप्रमाणें वरील नक्त नेमणुका अत्यंत अपुर्‍या आहेत. वरील ३० रुपयांतून खर्च वजा जाऊन हातीं फक्त २४ रु. येतात.

शके १७८२ सालीं वाजारवाडीचे रहिवासी श्री. कृष्णाजी गंगाधर ऊर्फ कुशाबा नाना धबडगांव यांनी, अन्यांनीं त्यांच्यावर केलेले उपकार स्मरून अन्यांच्या सांगण्यावरून अन्यांचे दत्तास निरंतरच्या नैवेद्याकरितां "त्रिहिरीचें खाचर" या नांवाचें एक वाजारवाडी येथें भातशेत दिलें आहे. त्याचें वार्षिक उत्पन्न अजमासें ४-५ मण भात येतें मध्यंतरी शिरवळ व नेरें येथील मोने मंडळीच्या अपसांतील कलहामुळें कांहीं वर्षे हें उत्पन्न मिळत नसे. परंतु हल्लीं तें मिळूं लागलें आहे.

## अन्या व रघुनाथभट्ट यांच्या वांटण्या

अन्या व त्यांचे कनिष्ठ बंधु रघुनाथभट्ट हे एकत्र राहत असून त्या उभयतांमध्यें घराच्या, जमिनीच्या, अनुष्ठान व इतर नक्त नेमणुकीच्या व यजमानकृत्याच्या वांटण्या शिरवळ येथें होऊन त्यांच्या याद्या झाल्या. पहिली मार्गशीर्ष कृ. ४ शके १७७८, दुसरी पौष शु. ३ शके १७८१ व तिसरी फाल्गुन कृ. ८ शके १७८९. या तिन्ही याद्यांवर माझे वडील कै. विश्वनाथ सदाशिव देव ( ऊर्फ नाना ), कै. विष्णु बापूजी माणके व कै. वामन शिवराम जोशी यांच्या सह्या आहेत.

## विष्णुअण्णा माणके यांचा संबंध

विष्णु बापूजी माणके यांचें घर शिरवळास अन्यांच्या घराशेजारींच होतें. हे विष्णु बापूजी सुमारें ८-१० वर्षांच्या वयापासून आमच्या पौडचे घरीं राहावयास आले. माझे वडील त्यांना विष्णुअण्णा म्हणत व आम्ही सर्व त्यांना मामा म्हणूं. हे आमरण आमच्या घरींच होते. मरणसमयीं त्यांचें वय आजमासें ७५-८० वर्षांचें होतें. आम्हां सर्वांस त्यांचा फार दरारा असे. ते आमची शेतीची व्यवस्था पाहत. ते बालब्रह्मचारी होते. त्यांचें कुलदैवत श्रीनरसोबा (धातुमूर्ति) अद्याप पौड येथें आमच्या देवांतच आहे.

## मिळकती व दत्तमूर्तिसंबंधीं गृहकलह व कोर्टांत दावे

उपलब्ध असलेल्या शिरवळ येथील मोने घराण्याच्या वंशवेलावरून चरित्रनायक मोरभट्ट अन्या यांना तीन पुत्र व एक कन्या अशीं चार अपत्यें होतीं, असें दिसून येईल. थोरले चिरंजीव नारायणभट्ट, मधले केशवभट्ट व धाकटे महादेवभट्ट. महादेवभट्ट यांना अन्यांच्या विठ्ठलभट्ट नांवाच्या नेरे गांवीं राहणाऱ्या सख्ख्या चुलतबंधूंच्या मांडीवर दत्तक दिलें. महादेवभट्टांचे वडील बंधु नारायणभट्ट हेही महादेवभट्टांजवळ नेऱ्यांस राहावयास गेले. तिकडे जाते वेळीं नारायणभट्टांनीं इतर चीजवस्त व सामानाबरोबर शिरवळाहून हल्लींची दत्तमूर्तिही नेऱ्यास नेली व तिकडेच त्या मूर्तीचा ते उत्सव करूं लागले. नारायणभट्ट निपुत्रिक झाल्यामुळें व केशवभट्ट बेपत्ता झाल्यामुळें नारायणभट्टांनीं महादेवभट्टांचे कनिष्ट चिरंजीव व विष्णुभट्ट ऊर्फ रंगभट्ट यांच्या नांवें सर्व स्थावरजंगम मिळकतीचें मृत्युपत्र करून दिलें. त्यांत या दत्तमूर्तीचा उत्सव महादेवभट्टांनीं करावा असें लिहिल्याचें बगोबा मोने सांगतात. त्यावरून कलह उत्पन्न होऊन मिळकतीसंबंधानें व दत्तमूर्तिसंबंधानें भोर येथें पहिल्या कोर्टांत वादी पांडुरंगभट्ट रघुनाथभट्ट मोने, राहणार शिरवळ व प्रतिवादी नं. १ विष्णु-भट्ट ऊर्फ रंगभट्ट महादेवभट्ट मोने, राहणार नेरे व प्रतिवादी नं. २ रंगो-कृष्ण धबडगांव, राहणार भोर यांच्यामध्यें ता. १३ जुलई सन १९१३ रोजीं (ओ. मु. नंबर २०-१३२३ फसली) दिवाणी दावा सुरू झाला. त्याचा निकाल ता. ८ आगस्ट सन १९१४ रोजीं वादीतर्फे झाला. प्रतिवादींनीं या निकालावर दुसरे कोर्टांत अपील केलें. त्या अपिलाचा निकाल प्रतिवादीतर्फे ता. १७ सप्टेंबर सन १९१५ रोजीं झाला. वादींनीं या निकालावर तिसरे स्पेशल कोर्टांत अपील केलें. त्याचा निकाल वादीतर्फे ता. १३ जून सन १९१६ रोजीं झाला, व दत्तमूर्ति वादीस मिळाली.

कृष्णाजी गंगाधर ऊर्फ कुशाबानाना धबडगांव यांनी अन्यांच्या सांगण्यावरून या दत्तमूर्तिच्या नैवेद्याकरतां शके १७८२ साली एक भातखाचर दिलें म्हणून पूर्वीच सांगितलें आहे. त्याचें उत्पन्न त्यांचे चिरंजीव रंगो कृष्ण ऊर्फ कोंडोपंतआण्णा यांनीं कांहीं गैरसमजामुळें देण्याचें बंद केलें; त्यामुळें त्यांना वरील दाव्यांत प्रतिवादी नंबर २ करणें भाग पडलें. दाव्याचा शेवटचा निकाल लागल्यावर कोंडोपंतआण्णा हे त्या भातखाचराचें उत्पन्न दत्तास देऊं लागले आहेत. मागील ४ वर्षांचें उत्पन्न अद्याप येणें राहिलें आहे, असें बगोबा मांजे सांगतात.

## सर्व मिळकत दत्ताची म्हणजे सर्व मिळकतीचे मालक दत्त

वी. मु. नंबर २०–१३२३ फसली ( सन १९१३ ) यांतील फिर्याद अर्ज कलम नंबर २ वरून दाव्यांत दाखल केलेल्या कागदपत्रांवरून व अन्या व रघुनाथभट्ट यांनीं केलेल्या वांटणीपत्रांवरून व इतर लेखांवरून ( हे सर्व कागदपत्र मीं स्वतः वाचले आहेत ) असें स्पष्ट दिसतें कीं, वादीचे ( पांडुरंगभट्टाचे ) वडील रघुनाथभट्ट व चुलते मोरभट्ट अन्या या दोघांनीं त्यांच्या दुसऱ्या दोन भावांचे म्हणजे विश्वनाथभट्ट व नारायणभट्ट यांचे हिस्से विकत घेतले व नंतर उभय बंधूंनीं ( अन्यांनीं व रघुनाथभट्टांनीं ) त्यांच्याकडे आलेली व स्वतः उभयतांची मिळून सर्व च्यारी भावांची मिळकत व जमिनी, अनुष्ठानें, नक्त नेमणुकी वगैरे स्वसंपादित मिळकत एकमेकांच्या पूर्ण विचारें शके १७८१ पूर्वी श्रीदत्ताच्या नांवाची करून आपण व आपले वारस फक्त वहिवाटदार म्हणून राहिले. म्हणजे श्रीदत्तास दिलेल्या मिळकतीवर मोरभट्ट अन्यांचे व रघुनाथभट्ट यांचे वारस व इतर भाऊबंद यांचा कोणत्याही प्रकारें मालकी हक्क राहिला नाहीं. वहिवाटदार वारसास ही मिळकत कोणास गहाण, खरेदी, बक्षिस अगर दान करून देतां येणार नाहीं. तसेंच ही मिळकत सार्वजनिकही नाहीं.

## पांडुरंगभट्टांचे वारस बगोबा मोने फक्त दत्तांच्या मिळकतीचे वहिवाटदार

अन्यांच्या वारसांपैकीं नारायणभट्टाला मुलगा नाहीं. केशवभट्ट बेपत्ता असून त्यांनाही पुत्रसंतान नाहीं. महादेवभट्ट नेरे येथील विठ्ठलभट्टाच्या मांडीवर दत्तक गेले व विठ्ठलभट्टाचे वडील नारायणभट्ट व चुलते विश्वनाथभट्ट यांनीं आपले हिस्से द्रव्यावश्यकतेमुळें मोरभट्ट अन्या व रघुनाथभट्ट यांनाच विकत दिले. त्यामुळें महादेवभट्ट व त्यांचे वारस यांचा या मिळकतीशीं मालकी अगर वहिवाटदार या नात्यानें कांहींएक संबंध राहिला नाहीं. फक्त रघुनाथभट्ट यांचे चिरंजीव पांडुरंगभट्ट व पांडुरंगभट्टांचे वारस दत्तात्रय ऊर्फ बगोबा यांचा संबंध मिळकतीशीं वहिवाटदार या नात्यानें आहे. म्हणून दत्तमूर्ति वादीकडे म्हणजे पांडुरंगभट्टजीकडे व नंतर त्यांचे वारस बगोबाकडे राहिली पाहिजे, व तिची नित्य नैमित्तिक पूजाअर्चा, नैवेद्य व सांवत्सरिक उत्सव वगैरे पांडुरंगभट्टांनीं व पुढें त्यांच्या वारसवहिवाटदारांनीं करून मंदिराची व मिळकतींची योग्य जोपासना व व्यवस्था केली पाहिजे, असा लेख अन्यांनीं व रघुनाथभट्टांनीं करून ठेविला असल्यामुळें तिसऱ्या स्पेशल कोर्टातही तसाच ठराव झाला आहे व तदनुसार बगोबाकडून हल्लीं व्यवस्था चालू आहे. अंबवड्याचें अनुष्ठान त्यांच्याकडेच आहे व इतर नक्त नेमणुकीचे पैसेही त्यांनाच मिळतात. धवडगांव यांनीं दिलेल्या विहिरीच्या खाचराचें भातही त्यांच्याकडेच येतें.

## मिळकतीस सरकारकागदीं दत्ताचें नांव

अंबवड्याचे अनुष्ठानास नक्त नेमणुकीस, इतर मिळकतीस व विहिरीच्या खाचरास सरकार कागदीं "शिरवळ दत्त" म्हणून नांव चालू आहे व बगोबाचें नांव वहिवाटदार म्हणून चालू आहे.

मोने हे जसे शिरवळ भागांत पुष्कळ लोकांचे कुलोपाध्याय, तसेंच ते बिंगकर जोशांचेही कुलोपाध्याय. बिंगकर जोशांच्या घराण्यावर अन्यांचें विशेष प्रेम, हे पूर्वी लिहिलेंच आहे.

अति पुरातन आहे असें वाटतें. लोकमान्यकृत "ओरायन"चें ओगलेकृत रूपांतर "वेदकालनिर्णय" या पुस्तकांतील पान ४१-४२ पाहा. श्रीक्षेत्र काशी व पंढरपूर या ठिकाणीं दत्तमूर्ति एकमुखीच आहेत. शिरवळ-दत्त-मूर्ति द्रवीड शिल्पकाराच्या हातची असून तीही एकमुखीच आहे. वरील ग्रंथांत चवथ्या अवताराचें नांव कालाग्निशमन असें दिलें असून जयंति-तिथि मार्गशीर्ष शु. १४ प्रदोषकाल व जयंतिकालीं दान करण्याची वस्तु "पंचामृत" असें दिलें आहे. शिरवळ दत्ताचा जयंतिकाल प्रदोष-काल असून जयंतितिथि मार्गशीर्ष शु. १४ आहे व जयंतिकालीं पंचामृत वांटलें जातें. यावरून शिरवळ-दत्त हे चवथा अवतार असून त्यांचें नांव कालाग्निशमन आहे असें दिसतें.

उत्सवास सुरवात मार्गशीर्ष शु. १४ पासून होते. त्या दिवशीं दुपारीं सुमारें ३ वाजल्यापासून ब्राह्मणाकरवीं पवमान व रुद्राभिषेक दत्तमंदिरांत दत्तमूर्तिवर सुरू होतात. ४ वाजतां पुराण सुरू होतें व ५ वाजतां कीर्तन उभें राहतें. प्रदोषकालीं जन्म होऊन कीर्तन व पूजा आटोपून आरत्या म्हणण्यास सुरवात होते. गांवांतील व परगांवांतील बराच मोठा पुरुषवर्ग, स्त्रीवृंद व बाळगोपाळसमूह मंदिरांत जमा होतो. भिन्न भिन्न प्रकारच्या सुमारें १५-१६ आरत्या भिन्न भिन्न सुरांत अजमासें घंटा-सवा घंटा म्हणण्यांत येतात. नंतर वैदिक ऋचायुक्त मंत्र म्हणण्यांत येऊन पंचामृत, तीर्थ व प्रसाद वांटण्यांत येतो. रात्रीं फराळास सुमारें स्त्री-पुरुष-मुलें मिळून १००-१५० पान होतें. फराळास इतर जिन्नस खेरीज करून खोजी, भाजणीच्या दशम्या, आंवळ्याचें लोणचें व चवळ्याची उसळ आगर आमटी हीं अवश्य असावींच लागतात.

## उत्सवसमारंभ व त्यांतील कामगिऱ्या व मदत

दुसऱ्या दिवशीं ब्राह्मणभोजन व इतर जातींचींही कांहीं पानें जेवा-वयास असतात. भोजनांत मुख्यत्वेंकरून पांढरी पोळी व काकवी ही अवश्य

असावीं लागतात. दोन्ही वेळचीं मिळून २००–२५० पानें होतात. दुपारीं पुराण, सायंकाळीं आरति व रात्रौ कीर्तन असतें.

तिसऱ्या दिवशीं मोरनिवासी श्री. धवडगांव यांचें प्रयोजन असतें. भोजनास लाडू असतात. पान अजमासें १००-१५० होतें. दुपारीं पुराण, सायंकाळीं आरती व रात्रौ कीर्तन असतें.

चवथ्या दिवशीं खिचडी, पांढरी पोळी व काकवी हे पदार्थ नैवेद्यास असतात. दोन्ही वेळचें मिळून अजमासें १०० पान होतें. दुपारीं पुराण व सायंकाळीं आरति असते.

पहिल्या दोन दिवसांचा व चवथ्या दिवसाचा खर्च बगोवा मोने करतात. तिसऱ्या दिवसाचा फक्त एक वेळचा भोजनखर्च धवडगांव करतात. पूर्वीं पांचवें प्रयोजन रास्त्यांचें असे पण अलीकडे तें कित्येक वर्षें बंद आहे.

पुढच्या वर्षापासून विंगकर श्री. दिगंबरराव ऊर्फ भाऊसाहेब जोशी यांचें प्रयोजन सुरू होणार आहे.

पूर्वी या उत्सवास माझे परमपूज्य वडील, किंवा वडील बंधु गोविंद-रावदादा किंवा हरिपंतआबा यांपैकीं कोणी तरी एक पैसे व तांदूळ घेऊन पीडाहून मुद्दाम येत असत, असें वडिल मंडळींच्या तोंडून व घरच्या जमाखर्चाच्या कागदपत्रांवरून समजतें. परंतु अलीकडे या उत्सवास येण्याचें जवळ जवळ ५०-६० वर्षे म्हणजे अन्या समाधिस्त झाल्या-पासून बंदच आहे. अन्यांच्या उत्तरकार्याकरिता पीडाहून आमच्या घरच्या मंडळींनीं पाठविलेले रुपये १५ ही शेवटचीच रक्कम दिसते.

## माझ्या वडिलांची वृत्ति व स्वभाव

माझ्या घरांतील वडील मंडळींच्या सांगण्यावरून असें समजतें कीं, माझ्या वडिलांचा व श्री मोरभट्ट अन्यांचा पूर्वीचा परिचय अगर संबंध कांहीं नव्हता. इतकेंच नव्हे, पण एकमेकांनीं एकमेकास कधीं पाहिलेंही नव्हतें.

माझे वडील संसारी तर खरेच, पण वेदांताची त्यांना अत्यंत आवड असे. त्यांचा आचारविचार शुद्ध असून ते शांत व गंभीर वृत्तीचे असत. त्यांचा वेदांत नुसता बोलण्यांतच नव्हे, तर त्यांच्या आचरणांत पदोपदीं दिसे. ते फार परोपकारी असत. स्वतःच्या खर्चानें घरीं औषधें तयार करून तीं ते त्यांच्याकडे येणाऱ्या रोग्यांना फुकट देत असत. त्यांची नाडी-परीक्षा व औषधाचें ज्ञान उत्तम असे. चांगले वैद्य म्हणून सर्व पौड खोऱ्यांत त्यांची प्रसिद्धि असे. माझ्या पणज्याकडे पेशव्यांच्या वेळीं पौड खोऱ्यांतील फडनविसीचें काम असल्यामुळें आमचें उपनांव देव असूनही आम्हांस फडणीस म्हणूनच संबोधीत असत. अद्यापपर्यंतही आम्हांस पौड प्रांतांत देव म्हणून कोणी फारसे ओळखीत नाहींत. फडणीस म्हणूनच ओळखतात.

## माझ्या वडिलांस सद्गुरुबद्दल लागून राहिलेली तळमळ

माझ्या वडिलांचें नांव विश्वनाथपंत; पण त्यांना नाना फडणीस असें म्हणत. नानांची भक्ति स्वामीवर ( घरच्या देवांत एक शाळिग्राम आहे, ज्यास पूर्वापार आमच्या घरांत स्वामी म्हणण्याची वहिवाट आहे. ) अत्यंत असे. त्याचप्रमाणें स्वप्नावर त्यांचा पूर्ण भरंसा असे. त्यांना नेहमी स्वप्नें पडत व तीं खरीं होत. आपणास कोणीतरी सद्गुरु असावे, पण त्यांच्या शोधार्थ आपण केव्हांही घराबाहेर जाणार नाहीं, अशी त्यांची अट होती. सद्गुरुकरितां त्यांना रात्रंदिवस तळमळ लागून राहिली होती. त्यांच्या उत्कटेच्छेनुरूप व अटीप्रमाणें सुदैवानें सुमारें ८०-८२ वर्षांपूर्वी एके दिवशीं म्हणजे माघ शु. प्रतिपदेच्या दिवशीं पहाटे सुमारें ५ वाजतां त्यांना स्वप्न पडलें कीं, आमचे पौड येथील घराचे पुढील म्हणजे रस्त्याच्या बाजूकडील मोठ्या दरवाजाबाहेर ओट्यावर शुभ्र पंचा परिधान केलेले, अंगांत पांढरी बंडी व मस्तकावर पांढरें पागोटें घातलेले अजमासें ५०-६० वर्षांच्या उमरीचे, कृष्णवर्ण, उंच, धिप्पाड, भव्य सत्पुरुष त्यांना दिसले. ( कोणी घरांतील मंडळी सांगतात कीं, ते सत्पुरुष माझ्या वडिलांस स्वप्नां-

तच, पण आमच्या घराच्या मागील दाराच्या अंगणांत अवळीच्या झाडाजवळ वर वर्णन केल्याप्रमाणें दिसले, व तेच सत्पुरुष त्यांना दुसऱ्या दिवशीं त्याच ठिकाणीं माझे वडील स्नान करीत असतां ११-१२ च्या सुमारास प्रत्यक्ष दिसले.)

## माझे वडिलांस पडलेलें स्वप्न

ते म्हणाले कीं, मी तुमच्या घरीं उद्यां दुपारीं भोजनास येणार आहें. मला तुम्ही त्या वेळीं माझें नांवगांव, जातगोत कांहीं विचारूं नये. माझे वडील इतकें पाहून जागे झाले. व लागलीच त्यांनीं हें स्वप्न माझे सर्वांत वडील बंधु कै. ती. रा. गोविंदरावदादा यांना सांगितलें व उद्यां या मूर्तीचा गांवांत सर्व ठिकाणीं तपास करा असें म्हणाले. दुसऱ्या दिवशीं माघ शु. द्वितीयेचा आमच्या घरीं वार्षिक कुलधर्म होता, व गांवांतील सर्व निमंत्रित स्त्री-पुरुष मंडळी भोजनास आली होती. पानें वाढून नेहमीच्या रिवाजाप्रमाणें पहिलें पान सोडून (पहिलें पान माझ्या वडिलांकरतां नैवेद्याचें म्हणून राखून ठेविलेलें असे) सर्व मंडळी यथाक्रम आपापल्या पानावर बसली. पात्रप्रोक्षण झालें, तरी स्वप्नांत पाहिलेली मूर्ति प्रत्यक्ष दिसेना. स्वप्न खोटें होणार नाहीं म्हणून माझे वडील व वडील बंधु यांना फार चिंता लागून राहिली, व निरुपायानें "यंतु नद्यो वर्षंतु पर्जन्याः" हा मंत्र म्हणून "हरहर महादेव" असें म्हणावयाचें, इतक्यांत घराच्या मोठ्या दरवाजावर बाहेरून थाप बसली. ती ऐकतांच सर्व मंडळीस क्षणभर थांबण्याची विनंती करून माझ्या वडिलांनीं दार उघडलें व त्यांना स्वप्नांत पाहिलेली तीच मूर्ति दिसली.

## माझ्या वडिलांची व अन्यांची प्रथम भेट म्हणजेच सद्गुरु-दर्शन

ते म्हणाले "नाना, मला जेवावयाचें आहे. माझें स्नान झालें आहे." माझे वडिलांनीं त्यांना पाय धुण्यास पाणी व नेसावयास सोंवळें दिलें व

त्यांना कांहीएक न विचारतां पाहिल्या पानावर आणून बसविलें. जेवण झालें, सर्व मंडळी घरोघर गेली. नंतर त्या मूर्तीनीं आपली हकीकत सांगून "मज-जवळ जें कांहीं आहे तें तुमच्याजवळ ठेवावें" अशी मला श्रीदत्तगुरूंची आज्ञा झाली आहे. तरी आज तुम्ही मला येथें राहण्याचा आग्रह करूं नका. मी तुमच्याकडे चातुर्मास्यांत येईन. असें म्हणून ती मूर्ति निघून गेली. ती मूर्ति म्हणजेच हें संतरत्न श्रीसद्गुरु मोरभट्ट अन्या मोने शिरवळकर यांना आमच्या घरांतील सर्व मंडळी बुवासाहेब म्हणून म्हणत असत. बोलल्या-प्रमाणें बुवासाहेब आमच्या घरीं त्याच चतुर्मासांत आले व तीन महिने राहिले.

## चातुर्मास्य

ते श्रावण प्रारंभास येत व दिवाळी झाली म्हणजे परत शिरवळास जात. अठरा किंवा वीस वर्षे याप्रमाणें ते पौड येथें आमच्या घरीं येत. शेवटच्या चातुर्मास्याच्या शेवटीं " आतां पुढच्या चातुर्मास्यांत तुमच्या घरीं येणार नाहीं" असें सांगून ते शिरवळास परत गेले व पुढील वर्षाच्या म्हणजे शके १७९३ च्या आश्विन कृ. ३ रोजीं त्यांनीं आपला दिव्य देह नेरे गांवीं ठेविला.

## अन्यांची हतवटी

बुवासाहेब आमच्या घरीं येत, तेव्हां ते कधींही स्वतःच्या संसाराची गोष्ट चुकून सुद्धा काढीत नसत. त्यांची माझ्या वडिलांबरोबर रात्रंदिवस वेदांत-ग्रंथवाचन, ब्रह्मनिरूपण व आत्मचर्चा चालू असे. सदा आनंद-स्थितींत राहण्याची शिकवण देऊन आपण स्वतः आनंद व शांतवृत्तींतच असत. राग हा त्यांना कधीं येतच नसे ! उलट कोणी केव्हांही व कितीही रागावून अगर संतापून आला तर त्याला चार वेदांताच्या गोष्टी सांगून त्याचें समाधान करून त्याला अगदीं गार करून सोडण्याची त्यांच्या ठिकाणीं एक विलक्षण व अवर्णनीय हतोटी असे.

## माझ्या वडिलांस बुवासाहेबांनीं दाखविलेला सक्षात्कार

माझ्या वडिलांनीं मला कांहीं तरी साक्षात्कार दाखवा असा एके काळीं त्यांच्याजवळ आग्रह धरल्यावरून बुवासाहेबांनीं त्यांना बरेच चमत्कार दाखवले असें माझ्या मातुःश्री व वडील भगिनी नेहमी सांगत. त्यांपैकीं एक चमत्कार खालीं देतों.

एके दिवशीं बुवासाहेबांनीं माझ्या मातुःश्रींकडून नाना प्रकारचे फराळाचे पदार्थ तयार करून घेतले व पुण्याहून नाना प्रकारची फळ-फळावळ आणविण्यास वडिलांस सांगितलें. ही सर्व तयारी आदल्या दिवशा-रात्रीं झाल्यानंतर फराळाच्या पदार्थांची व फळफळावळीचीं चारपांच ताटें भरून ठेविलीं, व माझ्या वडिलांस दुसऱ्या दिवशीं पहाटे स्नान करून देवा घरांत देवाजवळ बसावयास सांगून तीं ताटें देवाजवळ ठेवण्यास सांगितलें. बुवासाहेबही स्नान करून नेहमींप्रमाणें माझ्या वडिलांचेजवळ पाटावर बसले. आमचें देवघर आमच्या स्वयंपाकघरांतच आहे. स्वयंपाकघराचीं सर्व द्वारें लावून घेतलीं; बाकीची सर्व मंडळी आतां काय चमत्कार होतो हें पाहण्याकरितां मोठ्या उत्सुकतेनें स्वयंपाकघरास जोडलेल्या बाळंतीण-खोलींत व माजघरांत उभी राहून, दाराच्या फटींतून स्वयंपाकघरांत पाहत होती. त्या वेळीं अंधारच होता. इतक्यांत विद्युल्लतेप्रमाणें चमकणारा लखख असा एक प्रकाश पडून तीं फराळाचीं व फळफळावळीचीं ताटें विस्कटून त्यांतील पदार्थ व फळें इतस्तत: जमिनीवर पाडून तो प्रकाश नाहींसा झाला. ही गोष्ट माझ्या मातुःश्री व वडील वहिनी मला आजपर्यंत सांगत असत, व तीच गोष्ट हल्लींही माझ्या दोघी वडील भगिनी मला सांगतात. या सर्वांनीं वरील प्रकार प्रत्यक्ष पाहिला आहे.

## अन्यांचे इतर चमत्कार

श्री दत्तात्रय पांडुरंग ऊर्फ बगोबा सोने, हल्लीं ह्यात वय वर्षें ५९ यांनीं सांगितलेले अन्यांचे चमत्कार खालीं लिहिल्याप्रमाणें !

## चमत्कार पहिला, (कुचेष्टा-परिणाम) (अन्यांचा अधिकार)

उत्सव-दिवसांत पडदा पाडून श्रीदत्तास नैवेद्य दाखविण्याची अन्यांची वहिवाट फार दिवसांची असे एके वेळीं कुत्सित व कुटाळ लोकांनीं असा संशय प्रदर्शित केला कीं, नैवेद्याच्या वेळीं ज्या अर्थी अन्या पडदा पाडतात, त्या अर्थी ते दत्तास अपेयाचा नैवेद्य दाखवीत असले पाहिजेत. कुचेष्टा करणाऱ्या मंडळींत मुख्यत्वें करून श्री. सखाराम गोपाळ वाघ व दादा उद्धव देशपांडे हे होते. अन्यांस ही कुचेष्टा समजली व त्यांनी दत्तास प्रार्थना केली कीं या कुचेष्टाखोर मंडळीस श्रींनीं कांहीं तरी चमत्कार दाखवावा. दत्त अन्यांसी बोलत हें सुप्रसिद्धच होतें. प्रार्थना करतां क्षणीं दत्तमूर्तीचा प्रकाश इतका प्रखरतर झाला कीं, तो वाघ व दादा यांना मुळींच सहन होईना. दत्ताच्या गळ्यांतील हार व दत्तापुढें ठेविलेले नाना प्रकारचे नैवेद्य एकदम नाहींसे झाले. वाघास दिसेनासें झालें, व दादांचें अस्वस्थ पोट दुखूं लागलें. असें होतांच वाघ व दादा अन्यांना शरण आले. अन्यांनीं त्यांना दत्ताची माफी मागण्यास सांगितलें. त्याप्रमाणें उभयतांनीं माफी मागतांच दत्तप्रकाश मंद झाला, नाहींसे झालेले हार दत्ताच्या गळ्यांत दिसूं लागले व नाहींसे झालेले नैवेद्य दत्तापुढें दिसूं लागले. वाघास दृष्टि आली व दादांचें पोट-दुखणें बंद झालें.

## चमत्कार दुसरा (अन्यांचा अधिकार-वाचासिद्धि)

नंतर श्री. बाबुराव वाघ व बिंगकर जोशी यांच्या दरम्यान जमीनीसंबंधानें वाद सुरू झाला, तो मुंबई-हायकोर्टापर्यंत गेला, तेव्हां गंगाधरपंतांचे वडील वामनतात्या जोशी हे अन्याकडे आले, व आतां या वादाचें काय होणार म्हणून अन्यांस विचारूं लागले. अन्यांनी त्यांना दत्ताजवळ येण्यास सांगितलें. ते उभयतां दत्ताजवळ जाऊन बसले, व अन्यांनीं दत्तास विनंती केली. इतक्यांत दत्ताच्या गळयातील हार तुटून तो अन्यांच्या हातांत पडला. तो अन्यांनीं वामनतात्यांच्या हातांत दिला, व तुझें काम झालें, तूं काळजी

करूं नकोस असें सांगितलें. त्यानंतर सर्व निकाल जोशी यांच्या बाजूचाच झाला.

## चमत्कार-तिसरा ( अन्यांचे अधिकार व वाचासिद्धि )

अन्यांचे कनिष्ट बंधु रघुनाथभट्ट हे अन्यांच्या पूर्वी वारले. मरणसमयीं रघुनाथभट्टांनीं पांडुरंगभट्टास अन्यांच्या स्वाधीन करून आतां ह्याचें पालनपोषण तुम्ही करा असें सांगितलें. पुढें पांडुरंगभट्टांचें लग्न करावें असें अन्यांच्या मनांत आलें. मुलगी कोणाची मिळणार, हें अन्या त्रिकालज्ञ असल्यामुळें अन्यांस पूर्वीच माहित होतें. एके दिवशीं ते सकाळीं उठून शिरवळाहून नाजारवाडीच्या कुशाबानाना भवडगांव यांच्या घरीं गेले, व पांडूचें लग्न करावयाचें आहे, तुमच्या गांवच्या गोविंदभट्ट म्हसवडे यांची मुलगी मागण्याकरतां मी आलों आहें, असें अन्या कुशाबानानास म्हणाले. मोने यांची गृहस्थिति चांगली नसल्यामुळें मुलगी अन्यांच्या घरीं देऊं नये असें कुशाबानाना व म्हसवडे यांच्या विचारें ठरलें, व त्याप्रमाणें त्यांनी अन्यांस अप्रत्यक्षरीतीनें सुचविलें. ठीक आहे, मी जातों, असें म्हणून अन्या तेथून निघाले व दोन मैलांवर असलेल्या भागोडी गांवच्या वाटेंन सडकेनजीक एका दगडावर बसले. इकडे गोविंदभट्ट म्हसवडे यांच्या कन्येचें ( म्हणजे जिला मागणी घालण्याकरतां अन्या आले होते तिचें ) पोट अत्यवस्थ दुखूं लागलें. प्राणांत होण्याचा समय आला. हें काय मध्येंच एकाएकीं विघ्न उद्भवलें, आतांपर्यंत मुलगी चांगली खडखडीत होती व इतक्यांत तिचें पोट कां दुखूं लागावें, याबद्दल कोणासच कांहीं तर्क करतां येईना. कुशाबानाना व गोविंदभट्ट या दोघांचीही अन्यावर पूर्ण श्रद्धा असल्यामुळें अन्यांस विचारल्यावांचून हें संकट टळणार नाहीं असें त्यांना वाटलें व ते तसेंच अन्यांचा शोध करीत करीत अन्या जेथें बसले होते तेथें आले. त्यांनीं मुलीच्या पोटदुखण्याची हकीकत अन्यास सांगितली व आतां हें विघ्न कसें टळेल म्हणून पृच्छा केली. मुलगी पांडूस देतों असें म्हणा, म्हणजे

तिचें पोट राहील, असें अन्या म्हणाले. त्यांनी अन्यास बाजारवाडीस परत नेलें, व सर्वांचा विचार घेऊन मुलगी पांडुरंगभट्टास देतों असें गोविंदभट्टांनीं अन्यास तेथेंच सांगितलें. इतकें म्हटल्याबरोबर मुलीचें पोट राहिलें. अन्या शिरवळास परत गेले, व नंतर त्याच मुलीचें लग्न पांडुरंगभट्टजींबरोबर झालें.

## चमत्कार चवथा ( कोल्हें )

कै. चिंतामणभट्ट बाळंभट्ट मोने हे मोने घराण्यांतील सर्व इनाम-जमिनीची वहिवाट करीत असून प्रत्येक हिस्सेदारास त्याच्या हिश्शाच्या वांटणीप्रमाणें त्याचा हिसा त्याला धान्यरूपानें देत असत; पण कागवड करणाऱ्या सर्व कुळांकडून सर्व जमिनीच्या मक्त्याबद्दल स्वतःच्या नांवचा खंडकरार लिहून घेत असत. असें बरीच वर्षें चाललें होतें; ही गोष्ट अन्यांच्या लक्षांत आली व त्यांनीं चिंतामणभट्टाजवळ आपल्या हिश्शापुरता खंड-करार मागितला. आज देतों, उद्यां देतों, असें म्हणून चिंतामणभट्टांनीं बरेच दिवस चालवाचालव चालविली. चिंतामणभट्ट सुध्या रीतीनें खंड--करार लिहून देत नाहीत, उडवाउडवी करीत आहेत, असें पाहून एके दिवशीं चिंतामणभट्ट किल्ल्याच्या कोटांत परसाकडे गेले असतां अन्याही तिकडेच शौचास गेले व चिंतामणभट्टास पाहून तेथेंच एक कोल्हें उत्पन्न केलें व चिंतामणभट्टांच्या मागें लावलें.

तें कोल्हें सतत तीन दिवस व तीन रात्र चिंतामणभट्टांच्या मागें घरींदारीं व चिंतामणद्दभट्ट जिकडे जातील तिकडे सारखें लागलें होतें. व चिंतामणभट्टांना खाणेंपिणें किंवा कोणतेंही काम करणें सुचूं देईना. सर्व घरांतील मंडळी बेजार झाली. चिंतामणभट्ट त्रासले. कोल्ह्यास मारण्याचाही इलाज चालेना. कोणी मारण्यास आले, तर हातीं सांपडावयाचें नाहीं, अदृश्य व्हावयाचें, व नंतर पुन्हा दृश्य होऊन पूर्ववत् पाठीस लागावयाचें. अन्यांची कर्तबगारी सर्वांस विश्रुत होती. पण हें कोल्हें अन्यांनी चिंतामण भट्टास त्रास देण्याकरितां निर्माण केलें होतें, ही कल्पना कोणासच नव्हती.

चिंतामणभट्टांच्या घरची मंडळी अत्यंत त्रस्त झाल्यामुळ त्यांनीं ही गोष्ट अन्यांच्या कानावर घालून या कोल्हाःचा आपण कांहीं तरी बंदोबस्त करून आम्हांस त्रासापासून मुक्त करा, अशी अन्यांस विनंती केली. अन्या म्हणाले, चिंतामणभट्टांनी खंड-करार लिहून दिला म्हणजे कोल्हें नाहींसें होईल. चिंतामणभट्टांनीं लागलीच खंड-करार लिहून दिला व कोल्हें अदृश्य झालें.

## चमत्का पांचवा ( वाचासिद्धि )

श्रीमती सरदार माईसाहेब रास्ते, राहणार श्रीक्षेत्र वाई, यांची पूर्वापार चालत आलेली जहागीर माईसाहेबांना पुत्रसंतान नसल्यामुळें ब्रिटिश सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली. कै. वामनतात्या जोशी विंगकर (श्री. गंगाधरपंत यांचे वडील) हे नेहमीं वाईस श्री.हरिपंत एरंडे यांच्याकडे जात असत. हरिपंत एरंडे हे वकील होते. वामनतात्यांच्या भगिनी सौ. राधाबाई ऊर्फ (बजूबाई) ह्या हरिपंत एरंडयांच्या पत्नी. त्यांच्यावर अन्यांचें अप्रतिम प्रेम. हरिपंत वकील असल्यामुळें ते नेहमीं माईसाहेबांकडे जात. एकदा हरिपंतांबरोबर सहज वामनतात्या माईसाहेबांकडे गेले व बोलतां बोलतां वामनतात्यांनीं अन्यांची हकीकत माईसाहेबांस सांगितली व आपण शिरचवळास आल्यास अन्यांच्याजवळ आपल्या जहागिरीच्या प्रश्नाचा निर्णय लागेल असें सुचविलें. त्याप्रमाणें माईसाहेब शिरचळास येऊन अन्यांस भेटल्या, व जहांगिरीची सर्व हकीकत त्यांनीं अन्यांस सांगितली. अन्या म्हणाले, 'दत्तकाची परवागी तुम्हास मिळेल व दत्तक घेतल्यावर तुमची जहागीर तुम्हास परत देण्यांत येईल. याप्रमाणें झाल्यावर तुम्ही येथील दत्तजयंतीच्या उत्सवांत १०० पानांचें प्रयोजन दरसाल घालीत जावें व बैठकीकरतां व कथाकीर्तनाकरतां, गाद्या, तक्के, बिछाइत व प्रयोजनाकरितां भांडीं द्यावीं. पुढें अन्यांच्या सांगण्याप्रमाणें माईसाहेबांस दत्तकाची परवानगी मिळून जहागीर परत मिळाली. माईसाहेबांनीं अन्यांच्या आज्ञेप्रमाणें दत्तास ५०० पानांचीं भांडीं, बिछाइत, गाद्या, गिरद्या, लोड, तक्के, हांडया,

झुंबरें, वगैरे सामान दिलें. सुमारें १८-२० वर्षांपूर्वी मोने यांच्या घरांतील अंतःकलहांत या सामानाची वाताहत झाली ! ( वडील पांडुरंगभट्ट यांच्या मुखांतून ऐकलेले हे चमत्कार बगोबांनीं सांगितले.)

श्री त्रिंबकभट्ट वामनभट्ट माणके राहणार शिरवळ, हल्लीं हयात वय वर्षे ७६-७७, यांनीं प्रत्यक्ष पाहिलेले अन्यांचे चमत्कार, खालीं लिहिल्या-प्रमाणें:—

## चमत्कार सहावा; टरलेली मूठ रस्त्यांत अटकवून ठेवली.

त्रिंबकभट्ट म्हणाले, 'माझें वय सुमारें १६-१७ वर्षांचें असतां मी, माझे वडील वामनभट्ट व अन्या असे तिघेजण रामनवमीच्या उत्सवाकरितां रामनवमीच्या आदल्या दिवशीं पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास शिरवळहून भोरास जाण्याकरितां पायीं निघालों. माझ्या वडिलांस व अन्यास याज्ञिकीचे परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याबद्दल सचीव सरकारकडून दरसाल अनुक्रमें रु. ५ व ४ नेमणूक व शिधा मिळत असे. आम्ही सडकेनें निघून भोरच्या अली-कडे एक कोसावर सडकेच्या बाजूस एक मोठें वडाचें झाड आहे, तेथें विसाव्याकरतां ६-६॥ वाजण्याच्या सुमारास आलों, व झाडाखालीं बसलों. शिरवळापासून हें झाड सुमारें ९ कोस होईल. आम्ही त्या झाडाखालीं बसलों. इतक्यांत आकाशांतून गुंग असा आवाज अन्यांच्या कांनीं आला. तेव्हां अन्या म्हणाले, 'अरे वामनआबा वरून मूठ चालली आहे, तिचा आवाज ऐकूं येत आहे.' आबा म्हणाले, 'हें काय अन्या सांगतां ? आम्हांस आवाज ऐकूं येत नाहीं व मूठही दिसत नाहीं.' 'अन्या म्हणाले, 'आबा, मूठ खालीं उतरवून तुला दाखवूं का ?' आबा म्हणाले, 'दाखवा.' नंतर अन्या डोळे झांकून क्षणभर बसले. इतक्यांत एक मोठी कोरी झाल ( लग्नांत वरात आल्यावर वधुवरांच्या व इतरांच्या डोक्यावर ठेवतात तशी ) वरून अंतराळांतून खालीं आली व आम्ही बसलों होतों त्या ठिकाणापासून सुमारें

१० हातांवर उतरली. त्या झाळींत बकऱ्याचीं दोन मुंडकीं, नारळांचीं चार शकलें, शेंदुर लावून सुया टोंचलेल्या लिंबाच्या १०-१२ फोडी, व कांहीं तळलेल्या पोळ्या व इतर दुसरे पदार्थ होते. हें सर्व आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलें. अन्यांनीं ती झाल पुढें जाऊं दिली नाहीं, व परतही फिरविली नाहीं. तेथें तशीच पडूं दिली. कारण पुढें जाऊं दिली असती, तर ज्याला मूठ मारली तो इसम दगावला असता. किंवा परत फिरविली असतां तर ज्यानें मूठ मारली तो दगावला असता. नंतर आम्ही तिघेजण भोरास गेलों."

## चमत्कार सातवा ( वेड गेलें )

त्रिंबकभट्टांनी दुसरा चमत्कार सांगितला. ते म्हणाले, माझे वडील वामनआबा बावडेकरांच्या शतचंडीचें अनुष्ठान करीत असत. १२१ सप्तशतीचे पाठ म्हणजे एक शतचंडी. या अनुष्ठानाबद्दल आबांस बावडेकरांकडून ६० रुपये मिळत. बावडेकर हे खंडाळेबावडे येथील सावकार. ते भोर, नसरापूर कोळवण येथें मामलतदार होते. हें अनुष्ठान बावडेकर जेथें असतील तेथें करावयाचें, व नंतर आबांनीं शिरवळास परत यावयाचें अशी वहिवाट असे. आबा अनुष्ठान करून शिरवळास परत आले, कीं त्यांना वेड लागे. या वेडांत आबा घरांतल्या माणसांस शिव्या देत व मारीतही. हें वेड महिना-पंधरा दिवस राही व नंतर कमी होई. याप्रमाणें हें वेड सुमारें ५–६ वर्षे होतें. माझी आई कंटाळली. तिनें ही गोष्ट अन्यांच्या कानावर घातली व म्हणाली, 'आतां माझ्याच्यानें शिव्याही ऐकवत नाहींत व मारही खावत नाही. तर याचा कांहीं तरी बंदोबस्त करा.' अन्या म्हणाले 'हें वेड अमंगलपणाच्या आचरणामुळें व शतचंडीच्या पाठांत संचार ( अक्षरें खाणें, अशुद्ध म्हणणें, एकाक्षराचे ठिकाणीं दुसरेंच अक्षर म्हणणें वगैरे वगैरे ) होत असल्यामुळें लागलें आहे. नंतर अन्यांना

भारण्या घालून ( म्हणजे मंत्र म्हणून अंगावर पाणी व विभूति फेकून ) आबांचें वेड घालविलें. त्यानंतर आबा शतचंडीचा पाठ करून घरीं शिरव-ळास येत. पण त्यांना कधींही वेड लागलें नाहीं व माझ्या आईचा त्रास कायमचा चुकला.

श्री. शंकरराव एरंडे, वाईकर यांनीं अन्यासंबंधानें सांगितलेला चमत्कार खालीं लिहिल्याप्रमाणें.

ता. ७-५-३३ रोजीं मी व श्री बगोबा मोने असे दोघेजण कांहीं कामाकरितां वाईस गेलों. विंगकर श्री. दिगंबर वामन ऊर्फ भाऊसाहेब जोशी पेन्शनर पोलिस-प्रॉसिक्युटर, वय अजमासें वर्षे ६०, ह्यांनीं मला गेले श्री-दत्तजयंतीच्या उत्सवांत शिरवळ येथें वाईचे एरंडे यांच्यासंबंधानें अन्यांनीं केलेला चमत्कार सांगितला व म्हणाले कीं, तुम्ही स्वत: वाईस जाऊन ही माहिती शंकरराव एरंडे यांच्याकडून घ्या; त्याप्रमाणें वरील तारखेस वाईस जाऊन ता. ८-५-३३ रोजीं सकाळीं मी व बगोबा शंकररावांकडे गेलों.

शंकरराव म्हणाले, 'विंगकर रंगनाथ जोशी हे माझ्या मातु:श्रींचे वडील. माझ्या मातु:श्रींचें सासरचें नांव सौ. राधाबाई व माहेरचें नांव सौ. बजूबाई. विंगकर जोशांच्या घराण्यावर अन्यांचें फार प्रेम; पण त्यांतल्या त्यांत माझ्या आईवर अन्यांचें अप्रतिम प्रेम. अन्या माझ्या मातु:श्रीस आपल्या स्वत:च्या कन्येपेक्षांही जास्त मानीत.

## चमत्कार आठवा ( अन्यांचा अधिकार )

सुमारें ८५-९० वर्षांपूर्वीं माझे वडील हरिपंत एरंडे वाई येथें आसन्नमरण पडले होते. त्या वेळीं श्री मोरभट्ट अन्या हे भोर येथील श्रीमती ताईसाहेब पंतसचीव यांचे श्रीमंत पंतसचीव यांनीं बांधिलेल्या श्रीविठ्ठलमंदिरांत अनुष्ठान करण्याकरितां आले होते. एके दिवशीं प्रात:-काळीं अन्या श्रीकृष्णाबाईचें स्नान करून घाटावरून विठ्ठलमंदिराकडे चालले असतां घाटावर माझ्या मातु:श्रींची व त्यांची गांठ पडली. मातु:श्रींनी

त्यांना नमस्कार केला. अशा प्रसंगीं आपल्यास आपले वडीलच भेटले असें त्यांना वाटून त्यांना अतिशय गहिंवर आला. अन्यांनीं त्यांच्या पाठीवर हात फिरवून त्यांना शुभाशीर्वाद दिला व विचारलें कीं, इतकें वाईट वाटण्याचें कारण काय ? त्यांनीं यजमानांची (हरिपंताची) अत्यवस्थ आजारीपणाची हकीकत अन्यांस सांगितली. अन्यांनीं त्यांना धीर दिला व म्हणाले, 'बजूबाई भिऊं नको, मी स्वतः तात्यासाहेबांच्या (हरिपंत यांस तात्यासाहेब असें म्हणत. हरिपंतांच्या वडिलांचें नांव सदाशिव ) जवळ बसून त्यांच्याकडून गुरुचरित्राचें पारायण करून घेईन; म्हणजे त्यांना आराम वाटेल.' बजूबाई म्हणाल्या हें होणारच कसें ? मानेखालीं हात घातल्यावांचून तर त्यांना या कुशीचें त्या कुशीवर होतां येत नाहीं.' अन्या म्हणाले, 'तें असूं दे; मी त्यांच्याकडून पारायण करून घेणार.' नंतर त्याच दिवशीं अन्या दुपारीं आमच्या घरीं आले. त्यांनीं वडिलांची प्रकृति पाहिली व त्यांच्याकडून गुरुचरित्राची पहिली एक ओवी वाचून घेतली व माझ्या वडिलांसमोर पोथीचें पान धरलें व त्यांनीं प्रारंभाची पहिली ओवी मोठ्या कष्टानें कशीवशी खोल आवाजांत वाचली. त्याच दिवसापासून त्यांच्या प्रकृतीस आराम पडत चालला व अन्यांनीं त्यांच्याजवळ बसून सात दिवसांत पारायण करून घेतलें. माझे वडील खडखडीत बरे झाले. हें पारायण त्यांनीं अन्यांच्याजवळ माझ्या घरामागें औदुंबराचा लहानसा वृक्ष होता, त्याच्या खालीं बसून केलें. नंतर माझ्या वडिलांनीं त्या झाडाखालीं श्रीदत्ताच्या पत्थरपादुकांची स्थापना करून त्या पादुकांस दररोज सहस्र तुळशी दत्तसहस्रनाम म्हणून केव्हांही खंड न होतां माझे वडील आमरण वाहत असत. ते शके १८१७ सालीं भाद्रपद शु. ८ मीस वारले. म्हणजे अन्यांनीं त्यांना बरें केल्यापासून पुढें ते ४९–५० वर्षे वांचले.

## चमत्कार नववा अन्यांची (वाचासिद्धी)

कै. माधव आपाजी साठे व कै. जनार्दन आपाजी ऊर्फ दादा एरंडे राहाणार वाई यांचेमध्यें जमीनीसंबंधानें वाद सुरू झाला तो हाय-

कोर्टपर्यंत चालला. त्यांत यश यावें म्हणून दादा एरंडे यांनी शिरवळ-दत्तास नवस केला. दादा हे गोपाळ हरि एरंडे यांचे स्नेही. ते गोपाळरावांबरोबर शिरवळास श्रीदत्तजयंतीच्या उत्सवास जात. नवस करणें म्हणजे ती गोष्ट अन्यांच्या कानावर घालावयाची व यांत कसें होईल म्हणून अन्यांसच विचारावयाचें. अन्या दत्तांची आज्ञा घेऊन त्याप्रमाणें निकाल देत. माझ्यासारखा निकाल झाल्यास मी उत्सवांत एक दत्ताचें प्रयोजन घालीन व मंडप बांधीन असें दादा अन्यांस म्हणाले. तुमच्यासारखा निकाल होईल असें अन्यांनीं दादांस सांगितलें व त्याप्रमाणें दादांच्यातर्फे निकाल झाला. दादांनीं प्रयोजन सुरू केलें. एकदोन वर्षें प्रयोजनें झालीं. पुढें प्रयोजन बंद पडलें. मंडप मुळींच बांधला गेला नाहीं. पुढें दादा एरंड्यांची वाताहातच झाली.

## चमत्कार दहावा

अन्यांच्या घरीं एका दत्तउत्सवांत तुपाची तूट आली. त्यांच्या चिरंजीवांनीं ही गोष्ट अन्यांच्या कानांत सांगितली. विहिरीची घागर काढ व दत्ताजवळ आणून ठेव असें अन्यांनीं चिरंजीवास सांगितलें. चिरंजीवांनीं त्याप्रमाणें केलें. पडदे पडले. नंतर जेवणाच्या वेळीं त्या घागरींतून अगदीं लोणकढया तुपाच्या ऊन ऊन वाफा येऊं लागल्या, व त्यांतून लोणकढे तूप निघालें, तें सर्व पंक्तीस वाढलें.

## चमत्कार अकरावा

अन्या वाईस आले, म्हणजे आमचे (हरिपंततात्या एरंडे यांच्या) घरीं उतरत, व पूजा करून देवघराबाहेर आले म्हणजे जिकडेतिकडे शेवंती वगैरे सुवासिक पुष्पांचे ताजे हारच हार देवघरांत देवावर नजरेस पडत.

## अन्यांस वाचासिद्धि कशी आली ?

अन्या हे २०-२२ वर्षांच्या वयापर्यंत अगदीं कांहींच करीत नसत. नुसते उनाडत असत. त्यांचे वडील त्यांना फार बोलत. एकदा त्यांच्या वडिलांनी

अन्यांना सांगितलें कीं, 'तूं आपलें काळें कर; मला तोंड दाखवूं नकोस.' अन्यांस तें बोलणें फार झोंबलें व अत्यंत वाईट वाटलें. त्यांनीं आत्महत्या करण्याचा निश्चय करून नर्मदातटाकीं प्राण देण्याकरितां प्रयाण केलें. ते आता नर्मदामाईंत उडी घालणार, इतक्यांत पलीकडच्या तीरावर त्यांना एक संन्यासी दिसले. त्या संन्याशांनीं त्यांना हाक मारली, व प्राण देऊं नका, इकडे या, असें ओरडून सांगितलें. अन्यांनीं हाक ऐकिली व म्हणाले, "नर्मदामाई दुथडी भरली आहे. मी तिकडे कसा येऊं?" संन्यासी म्हणाले, 'तसेच या.' संन्याशाच्या वचनावर भरवसा ठेवून अन्या निघाले. तों चमत्कार हा कीं, पलीकडच्या तीराजवळ जाईपर्यंत अन्यांस गुडघाभरच पाणी लागलें. नंतर त्या संन्याशांनीं अन्यांच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून त्यांना आशीर्वाद दिला. तोच प्रसाद मानून अन्या ४-५ वर्षांनीं परत घरीं आले. तेव्हांपासून त्यांची वाचासिद्धि झाली. ते जें बोलतील, तें सत्य होई.

ही सर्व हकीकत व हे सर्व चमत्कार जाड्या परमपूज्य मातुःश्री सौ. बजूबाई मला नेहमी सांगत, असें श्री. शंकरराव ??? यांनीं मला श्री. बगोवा मोने यांच्यासमक्ष श्रीक्षेत्र वाई येथें वरील तारखेस त्यांच्याच घरीं सकाळीं सांगितलें.

श्री. आपाजी गोविंद ऊर्फ आपासाहेब देशपांडे शिरवळकर वय वर्षें ७७-७८ हल्लीं हयात, हे सांगतात कीं, अन्या हे आजानुबाहु होते, योगी होते. ते तीन-तीन दिवस समाधि लावून देवखोलींत बसत. संतती मागण्याकरतां सर्व जातींच्या लोकांची गर्दी अन्यांच्याकडे नेहमी होत असे. "तुला मूल होईल" असें अन्यांच्या मुखातून एकदा आलें, कीं त्याला अगर तिला मूल व्हायचेंच ! त्यांची वाणी कधींही असत्य होत नसे.

## चमत्कार बारावा ( अन्यांची वाचासिद्धी )

काळदरीचे कै. श्री. रघुनाथ आबाजी ऊर्फ रावोपंत देव (श्री बगोवा यांचे चुलतसासरे ) यांना संतति नव्हती, ती अन्यांच्या सांगण्यावरून झाली.

## चमत्कार तेरावा ( अन्यांची वाचासिद्धी )

भोरजवळील राजेवाडीचे रहिवासी श्रीमंत धाकटोजीराव मोहिते यांचें कुटुंब एके दिवशीं अन्याकडे आलें व सांगूं लागलें, "आम्ही तर भिकारी आहों, पण आमची मुलगी ( सासरचें नांव म्हाळसाबाईसाहेब ) अति रूपवान आहे. तरी ही चांगल्या ठिकाणीं पडावी एवढी इच्छा आहे.' मोहित्यांचें घर म्हणजे अन्याचें यजमानकृत्यांचेंच घर. अन्या म्हणाले, 'बाई तूं काळजी करूं नकोस. ही मुलगी राजाच्या घरीं पडेल व तुझें दरिद्र विच्छिन्न होईल. पुढे कांहीं दिवसांनीं अन्याच्या सांगण्याप्रमाणें ती मुलगी श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांची भार्या झाली, व श्रीमंतांनीं त्या मुलीच्या आईबापांस राजेवाडी येथें मोठा वाडा बांधून देऊन जहागीरही दिली आहे. हल्लीं मोहित्यांची स्थिति चांगली आहे. धाकटोजीराव यांचे चिरंजीव बापूसाहेब मोहिते हल्लीं हयात आहेत.

## सन १९१३ सालीं कोर्टांतील कामास व उत्सवकार्यास मदत मागण्यास मोने-घराण्यांतील मंडळींचें पौडास आगमान

माझ्या घरची सर्व मंडळी मोरभट्ट अन्यांना बुवासाहेब म्हणून संबोधीत, हें वर लिहिलें आहेच. मला ते मुळींच आठवत नाहींत. वडील मंडळीच्या सांगण्यावरून ते आमच्या घरीं शके १७७३ अगर १७७५ पासून येऊं लागले असें दिसतें. त्यांच्या पूर्ण वैराग्यशीलत्वाच्या, वेदांताच्या व शुद्धाचरणाच्या गोष्टी बालपणापासूनच माझ्या कानावर पडत असत व मला समजूं लागल्या पासून अशा सत्पुरुषांच्या सेवेस मीच मात्र अंतरलों असें माझ्या मनांत वारंवार येऊन मला अत्यंत वाईट वाटे. मन उद्विग्न होई. निदान बुवासाहेबांनीं चालू केलेल्या श्रीदत्त पादुका व श्रीदत्तमूर्तींच्या सांवत्सरिक उत्सव-कार्यासाठीं आपल्या घरून पूर्वीपासून धान्य-द्रव्यरूपानें जें तुळसीपत्र जात असे, त्याचा अत्यल्पांश तरी आपल्याकडून जावा व

त्या निमित्तानें तरी आपल्या परमपूज्य पितुःश्री, मातुःश्री, भ्रातुःश्री आदि-करून वडील मंडळीच्या जगद्वंद्य सद्गुरूंनी व श्रीदत्तांची आपल्या हातून सेवा घडावी व त्यांचें नित्य स्मरण राहावें असें वाटे. परंतु शिरवळची किंवा बुवासाहेबांच्या कुटुंबातील माणसांची मुळींच माहिती व ओळख नसल्या-मुळें वरील विचार मनांतल्या मनांत राहून त्यांना मूर्तस्वरूप देण्याची संधि येईना. नंतर माझें थोडेंसें शिक्षण होऊन मला नोकरीही लागली. त्या वेळीं माझ्या मातुःश्री व बंधु तीः रा. गोविंदराव दादा हे ह्यात होते. परंतु या उत्सवासंबंधीं कांहीं गोष्टी निघाल्या नाहींत. पुढें कांही वर्षांनीं म्हणजे दादा वारल्यावर शिरवळची अगर नेऱ्याची कांहीं अपरिचित मोने मंडळी दादांच्या पाठचे बंधु कै. ती. रा. हरिपंतआबा यांची सही ओळखण्या-करितां व उत्सवास पूर्वीप्रमाणें मदत करीत चला, असें आग्रहानें सांगण्या-करितां माझे धाकटे बंधू चि. रा. सदाशिवरांव ऊर्फ सदूकाका याच्याकडे पौड मुकामीं आली होती. परंतु त्यांचें बोलणें आपल्यास पटेना म्हणून मी त्यांना कोणत्याही प्रकारें मदत केली नाहीं; मदत करण्याचें आश्वासन दिलें नाहीं व मोरास गेलों नाहीं, अशा अर्थाचें पत्र सदूकाकाकडून उन्हा-ळ्यास मजकडे आलें. सदूकाकासच त्यांचें म्हणणें पटेना; म्हणून मीही त्या पत्रांतील मजकुराकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. परंतु इतकें मात्र वाटलें कीं बुवासाहेबांच्या कुटुंबातील कोणी तरी माणसें ह्यात असून श्रीदत्ताचा उत्सव अद्याप चालू आहे.

## शिरवळ–दत्ताची व बुवासाहेबांच्या सेवेची लागलेली तळमळ

तथापि थोडीशी रजा काढून शिरवळास जाऊन स्वतः चौकशी करण्याची अंतःकरणांत स्फूर्ति होईना, व स्फूर्ति न होण्याचें कारण स्पष्ट आहे कीं, त्या वेळीं शिरवळ व नेरें येथील बुवासाहेबांच्या वारसांत मिळकती व श्रीदत्तमूर्तीसंबंधीं कलह माजून राहिला होता. त्याचा निकाल लागण्या-

सही बराच काळ लागला. असो. पुढें माझें नोकरीच्या शेवटीं-शेवटीं म्हणजे सन १९२७ च्या आकटोबर–नवंबर महिन्यांत कुर्ल्यास फर्स्ट क्लास रेसिडेंट व रेल्वे–मॅजिस्ट्रेट असतांना मला त्या वेळीं नुक्ताच चार्ज घेतलेले बोरीबंदर स्टेशनचे फौजदार श्रीयुत सदाशिवराव वामन जोशी गिंगकर हे सायंकाळीं कुर्ल्याच्या स्टेशनवर भेटले. हे फौजदार म्हणजे श्रीयुत बाळासाहेब खाडे मामलतदार जेजुरीकर यांचे व्याही. बाळासाहेब खाडे हे माझे बालपणापासूनचे स्नेही. बाळासाहेबांनीं माझी मुद्दाम भेट घेण्यास सांगितल्यावरून व सदाशिवराव फौजदार यांचा रेल्वेचा एक खटलाहि मजकडे असल्यावरून फौजदार हे मला वर लिहिलेल्या वेळीं व ठिकाणीं भेटले. चौकशी करितां शिरवळजवळ असलेल्या विंग गांवचे ते राहणारे व मोरभट्ट मोन्यांचें घर तें त्यांचें गुरुघर असें कळलें. दुसरे दिवशीं ते कुर्ल्यास आले व बुवासाहेबांसंबंधीं सर्व खुलासेवार हकीकत त्यांनीं मला सांगितली. आपसांतील, कलहासंबंधीं व उत्सवासंबंधीं त्रोटक माहिती सांगून उत्सव भिक्षा मागून बुवासाहेबांच्या बंधूंचे नातू श्रीदत्तात्रय पांडुरंग ऊर्फ बगोबा मोने हे दरसाल पूर्वीप्रमाणें करतात; परंतु बुवासाहेबांचें घर लहान असून पडकें व नादुरस्त असल्यामुळें व दुसरी प्रशस्त जागा आसपास नसल्यामुळें उत्सवकार्यास फार अडचण येते, असें ते म्हणाले. मला तेथें काय सेवा करता येईल असें विचारल्यावरून ते म्हणाले कीं, तेथें दुजोडी बांधल्यास उत्सवकार्याची अडचण अंशतः तरी दूर होईल. मी त्यांना श्रीबगोबा मोने यांना बोलावून घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ३-४ दिवसांत बगोबा मला कुर्ल्यास भेटले. मी त्यांना ठाण्यास घेऊन गेलों, व त्या वेळीं हयात असलेल्या परमपूज्य माझ्या वृद्ध भावजई ती. गंगाभागीरथी राधावहिनी ( कै. हरिपंतआबा यांचें कुटुंब ) ज्यांना बुवासाहेबांची व शिरवळ येथील त्यांच्या घराची व उत्सवाची चांगली माहिती होती, व ज्यांनीं बुवासाहेबांना पाहिलें होतें, व त्यांचें शिरवळचें घरही पाहिलें होतें, त्यांना बगोबास शिरवळची व बुवासाहेबांची माहिती विचारण्यास मीं सांगितलें.

## सेवेची दिशा

त्यांनी त्यांना सर्व खुणाखाणा विचारून बगोबा सांगतात तेंच घर बुवासाहेबांचें, इतर मोन्यांचें नव्हे, असें मला सांगितलें. तेथें मला काय सेवा करतां येईल, असें विचारतां बगोबांनीही सदाशिवराव फौजदाराप्रमाणें उत्तर दिलें. बगोबांनीं सांगतात ती हकीकत बरोबर आहे, असें आढळून आल्यावर मीं ता. ६ एप्रिल १९२८ रोजीं शिरवळास जाऊन तें पडित पण पुण्यस्थान पाहून त्याचें दर्शन घेतलें, व आपल्या हातून तेथें काय सेवा करतां येईल याचें सूक्ष्म निरीक्षण करून ठाण्यास परत गेलों.

## कागद-पत्रावलोकन

नंतर दोन महिन्यांनीं म्हणजे ता. ६ जून १९२८ रोजीं माझे स्नेही श्रीयुत रा. रामचंद्र हरि ऊर्फ भाऊसाहेब जोशी पेन्शनर ओव्हरसिअर यांना बरोबर घेऊन पुन्हा शिरवळास गेलों. जागेसंबंधीं बगोबा मोने यांच्याजवळ असलेले मोरभट्ट अन्यांच्या वेळचे व भोर कोर्टांतील वादविवादी दाव्याचे सर्व कागदपत्र वाचून पाहिले. त्यावरून असें दिसून आलें कीं, दत्तपादुका व दत्तमूर्ति बुवासाहेबांची, त्याचप्रमाणें त्यांच्या राहत्या घराच्या ज्या देवखोलींत व घरामागील परसांत ज्या औदुंबरतरुतलीं अनुक्रमें दत्तमूर्ति व दत्तपादुका ठेऊन ज्यांची बुवासाहेबांनीं अनुक्रमें ५०–६० वर्षें सतत रोज स्वतः पूजा करून त्यांचे दरसाल उत्सव केले, तें घर व त्या जागा बुवासाहेबांच्या व रघुनाथभट्टांच्या. घर, विहीर, परसु, व परसाच्या सीमेच्या भिंती व त्याखालीं असलेली सर्व जागा, तसेंच त्यांची इतर सर्व स्थावरजंगम मिळकत. अनुष्ठानें, नक्त व स्थावर नेमणुका वगैरे जें जें म्हणून त्यांचें होतें, तें तें सर्व त्या उभयतां बंधूंनीं श्रीदत्ताच्या नांवचें करून ते फक्त वहिवाटदार या नात्यानें राहिले.

तें घर, ती देवखोली, ती विहीर, तें परसु, वगैरे सर्वच मोडकळीस येऊन त्यापैकीं कांहीं भाग पडलाही होता, असें आमच्या नजरेस आलें व क्षणभर मन खिन्नही झालें.

## बाबा व बुवासाहेब दोघेही दत्तावतार व दत्तगुरु, अतएव अभिन्न

श्रीसमर्थ सद्गुरु शिरडीचे साईबाबा हे दत्तावतार व श्रीसमर्थ सद्गुरु बुवासाहेब हेही दत्तावतार. बाबा दत्तास नेहमीं "सरकार" म्हणत. दत्ताची अवमर्यादा कोणीं केली, तर बाबांना बिलकुल खपत नसे. भक्तवर्य कै. श्री. नानासाहेब चांदोरकर यांनीं एकदा कोपरगांवीं श्रीगोदामाईच्या तटावर असलेल्या दत्तमंदिरांतील दत्तमूर्तीचें दर्शन कांहीं कारणाकरतां घेण्याचें मुद्दाम टाळलें, व तसें करण्यास त्यांच्या स्नेह्यांनीं संमति दिली. त्यामुळें त्या उभयतांना बाबांनीं कशी शिक्षा दिली याचें वर्णन श्रीसाई-लीलेच्या पांचव्या वर्षाच्या ११-१२ महिन्याच्या जोड अंकांत ६५१—६५३ पानावर दिलें आहे.

बुवासाहेब हेही दत्तास आपले मालक धनी (म्हणजे सरकार) समजत व त्यांनाही कोणी दत्तनिंदा किंवा दत्ताची कुचेष्टा केल्यास खपत नसे, हें बगोबा मोने यांनीं सांगितलेल्या पहिल्याच चमत्कारावरून कळून येईल.

बाबा व नानासाहेब चांदोरकर प्रथम माझ्या स्वप्नांत आल्यावेळीं बाबा हे "दत्तगुरु" आहेत असें नानासाहेबांनीं आपण होऊन मला बाबांच्या समक्ष सांगितलें, ही हृदयंगम स्वप्नांतील हकीकत मी श्रीसाई-लीलेच्या तिसऱ्या वर्षाच्या भाद्रपद महिन्याच्या अंकांत २५३ पानावर दिली आहे. माझे वडील व ज्येष्ठ बंधुद्वय बुवासाहेबांस दत्तगुरुच समजत व मानीत.

## दत्तमंदीर बांधण्याचा प्रेरणा, निश्चय व तयारी बाबा व बुवासाहेब यांचें अभिन्नत्व

बाबांचें सरकार व बाबा सर्व ठिकाणीं आहेत. पण माझ्याच घरची पूर्वपीठिका लक्षांत घेतां बाबा व बाबांचे सरकार माझ्या घरीं माझ्या वडिलांच्या व ज्येष्ठबंधुद्वयांच्या हयातींत बुवासाहेब व बुवासाहेबांची दत्तमूर्ति

या स्वरूपांत १८-२० वर्षें म्हणजे बुवासाहेबांच्या निधनकालापर्यंत होते व त्यांनीं त्यांची त्या स्वरूपांत सेवा केली. माझा जन्म त्या वेळीं नुकताच झाला असल्यामुळें मला त्या वेळीं त्या सेवेचा लाभ मिळाला नाहीं, व त्या सेवेंत मध्यंतरीं सुमारें ६० वर्षें खंड पडला. म्हणून हल्लींच्या स्वरूपांत पुन्हा त्यांचीच सेवा शिरवळास करण्याचा हा कपिला षष्ठीचा योग बाबांनींच जुळवून आणिला व बाबा व बुवासाहेब अभिन्न आहेत असें समजून त्याच पुरातन, लहान पण पुण्य जागेवर एक लहानसें दत्तमंदीर व जेवणाखाणाच्या सोईसाठीं चिमुकलें स्वयंपाकघर बांधावें अशी प्रेरणा बाबांनीं केली, व तसें करण्याचा माझाही निश्चय ठरला. त्याप्रमाणें भाऊसाहेब जोशी यांच्याकडून मंदिराच्या खर्चाचें अंदाजपत्रक व नकाशा तयार करवून घेऊन आम्ही दोघे ता. ९-६-२८ रोजीं ठाण्यास परत आलों, व मीं पैशाची जुळवाजुळव करूं लागलों.

नंतर ता. ५-९-२८ पासून दगड, विटा, डबर, तोडी वगैरे सामान खरेदी करून ठेवण्यास वगोबा गोने यांजकडे पैसे पाठविण्यास सुरवात केली. लांकडांचा तपास करतां मुंबई, वांद्रें, कुर्लें, ठाणें, वगैरे ठिकाणीं गावठी सागाचीं मजबूत मनाजोगीं लांकडें मिळेनात. कुर्ल्याच्या एका लांकडाच्या व्यापारी मियानें उत्तम लाकडें देतों असें कबूल करून ४०० रुपये बयाणा घेऊन शेवटीं आम्हांस फसविलें. त्यामुळें लांकडेंही मिळालीं नाहींत व बयाणाही बुडाला ! शेवटीं त्या मियाकडून त्याच्याजवळ असलेलीं अजमासें तीनचारशें रुपये किंमतीचीं जंगली लांकडें घेतलीं; परंतु त्यांस कोणी गिऱ्हाइक नसल्यामुळें व तीं ठेवण्यास आम्हांजवळ चांगली आच्छादनाची भरपूर जागा नसल्यामुळें तीं पावसानें कुजून गेलीं. त्यापैकीं फक्त ९०-९२ रुपये हातीं लागले !

## उत्तम लांकडांचा तपास

नंतर उत्तम लांकडें मिळाल्याशिवाय मी मंदिर बांधण्यास येणार नाहीं, व लोखंडी खांब, किंवा बहालें देवळाच्या कामीं घालणें मला पसंत

नाहीं असें भाऊसाहेब ओव्हरसिअर यांचें आग्रहाचें सांगणें पडल्यामुळें मी श्रीयुत मगनलाल नथुराम ऊर्फ मगनतात्या दवे यांना घेऊन डहाणूस गेलों. या मगनतात्यांनीं मला प्रथमपासून प्रत्येक कामांत मनापासून अत्यंत मदत केली. त्यांची सदिच्छा, चिकाटी व उत्साह अनुपमेय आहे. असो. डहाणूस गेल्यावर माझे परम स्नेही कै. श्री. आण्णासाहेब करंदीकर, त्यांचे चिरंजीव रामकृष्णपंततात्या, माझे पूर्वींचे व्यापारी स्नेही रावसाहेब शेट नरोत्तम गिरधर व मगनतात्या वगैरे मंडळींसह मी सावटें बंदरावर लांकडें पाहण्याकरितां गेलों. बंदरांतील जुन्यानव्या व्यापारी लोकांच्या, माझ्या-बरोबर असलेल्या स्नेही मंडळीच्या व श्रीयुत आण्णासाहेब अभ्यंकरांच्या कृपेनें आम्हांस ओसरविरा गांवचा उत्तम लांकडांचा गट ता. १८-३-३० रोजीं लिलावांत मिळाला.

## उत्तम लांकडांची प्राप्ति

त्यामुळें आमचें उत्कृष्ट काम झालें.तेथून तो गट डहाणूस स्टेशनवर आणून (मल्याण येथें) कै. रा. आण्णासाहेब करंदीकर यांच्या घरामागील विस्तीर्ण जागेंत ठेवून तो त्यांचे चिरंजीव रामकृष्णपंततात्या करंदीकर यांच्या देखरेखीखालीं काकड्या कोल्हा वारली कराई सावटेकर व त्याचा जोडी-दार सुकऱ्या वारली मल्याणकर यांच्याकडून एक वर्षांत मापाप्रमाणें काप-वून घेऊन ता. ३०-६-३१ रोजीं डबा भरून तीं लांकडें पुण्यास पाठविलीं.

## शिरवळास लांकडांची पोंच

तीं पुणें स्टेशनवर ता. २-७-३१ रोजीं ताब्यांत घेऊन तेथून श्री. रा. रामभाऊ बाबाजी अंबवळे पुणें यांच्यामार्फत ता. ९-७-३१ पावतों पाऊस अतिशय असल्यामुळें थोडथोडया गाडयांत भरून शिरवळास पोंचविलीं.

## सुतार मिस्त्री

नंतर ता. १-१०-३१ रोजीं मी, भाऊसाहेब ओव्हरसियर, श्री. गोपाळ भगवान मिस्त्री सुतार सावटेकर, त्याचा जोडीदार श्री. जगन्नाथ

नथोबा सुतार डहाणूकर यांना घेऊन शिरवळास गेलों, व त्याच दिवशीं म्हणजे गुरुवारीं सायंकाळीं श्रीदत्तास पवमान व रुद्राभिषेक करून सुमुहूर्तावर जुनें घर पाडण्यास सुरवात केली.

## कामास सुरवात

नंतर ता. २९-१०-३१ रोजीं गुरुवारीं सुमुहूर्तावर मंदिराची कोनशीला बसविली.

ता. २–११–३१ रोजीं मंदिरास लागणारी पूर्वीं मोफत दिलेल्या जागेपेक्षां जास्त जागा श्री. वे. मू. रा. नरहरभट्ट वाळिंबे व श्री. वे. मू. रा. भिकाजी विष्णु उर्फ काका मोने यांजकडून विकत घेऊन त्याचे कागदपत्र भोर रजिस्टर कचेरींत रजिस्टर केले.

ता. १०–११–३१ रोजीं श्री. सुकऱ्या श्रावण दमणकर मांगेला तारापूरकर गवंडी व त्याचा जोडीदार लक्ष्मण विठ्ठल वझे मांगेला चिंचणकर गवंडी हे शिरवळास येऊन दाखल झाले. सुतार व गंवडी हे श्रीरामकृष्णपंततात्या करंदीकर यांनीं पाठविले.

ता. १२–११–३१ रविवार रोजीं सुमुहूर्तावर मंदिराचा खांब बसविण्यांत आला.

त्याच दिवशीं भोरपासून २ कोसांवर असलेल्या भागोडी गांवांतून सुमारें १०० वर्षांपूर्वीं श्रीमंत सरकार पंतसचीव यांच्या वाड्याकरितां तयार करून ठेविलेल्या उत्तम भाठीव घडणीच्या दगडाच्या उथळ्यापैकीं शिल्लक राहिलेल्या मंदिराच्या कामीं जरूर तितक्याच खांबांच्या बेताच्या व त्यांना शोभतील अशा ११ उथळ्या श्री. बगोबा मोने यांचे शालक श्रीदत्तोपंत देव, खासगी कारभारी, राजेसाहेब भोर यांच्यामार्फत भागोडीच्या पाटलाकडून विकत घेतल्या.

ता. ६–१२–३१ रविवार रोजीं सुमुहूर्तावर मंदिराचा पुढचा मुख्य दरवाजा बसविला.

## मंदिराच्या कामाची समाप्ति

नंतर आढे बसवून ता. २३-१२-३१ च्या पूर्वी मंदिराच्या इमारतीवर पत्रे ठोकून त्याच इमारतींत ता. २३-१२-३१ पासून ४ दिवस श्रीदत्तजयंतीचा सांवत्सरिक उत्सव करण्यांत आला.

नंतर स्वयंपाकघरासुद्धा बाकीचें राहिलेलें सर्व चालचलाऊ काम मे १९३२ अखेर पुरें केलें.

## मंदिराची वास्तुशांती

ता. २५-५-३२ रोजीं मंदिराची वास्तुशांती केली. गांवांतील व बाहेरची मिळून अजमासें २०० पानें झालीं. नारळीभाताचें पक्वान्न केलें होतें. आमच्या कुटुंबांतील जवळची व दूरची बहुतेक सर्व मंडळी आली होती. याप्रमाणें बाबांच्या कृपेनें आरंभिलेलें कार्य येथपर्यंत तडीस गेलें.

## मंदिराचें त्रोटक वर्णन

मंदिर भर दुमजली असून रस्त्यास लागून पण रस्त्यापासून जोत्याचें काम ३ फूट उंच आहे. मंदिरास पुढें ४ फुटांची मंचा ( गॅलरी ) काढली आहे. मंदिराची लांबी पूर्वपश्चिम ५२ फूट व रुंदी दक्षिणोत्तर २७ फूट आहे.रस्त्यापासून आढ्यापर्यंत इमारतीची उंची सुमारें २२-२३ फूट आहे दुसऱ्या मजल्यावर गाभाऱ्यावरील घुमटाजवळ दक्षिण बाजूस १४ फूट लांब व ७ फूट रुंद अशी एक खोली मंदिराचें सामानसुमान ठेवण्याकरितां केली आहे. मुख्य दरवाजाच्याभोंवतीं दगडी चौकट व दरवाजावर दगडी कमान दिली आहे. मंदिरांत पश्चिम बाजूस ३ फूट उंचीच्या जोत्यावर गाभारा बांधला आहे. गाभाऱ्याची लांबी, रुंदी व उंची अनुक्रमें ११×११×९ फूट आहे. गाभाऱ्याच्या मध्यभागीं ३ फूट उंचीची सीमेंट कॉंक्रिटाची बैठक तयार करून त्यावर सीमेंट कॉंक्रिटचा ४॥ फूट उंचीचा देव्हारा तयार करून त्यांत पूर्वीपासून पूजा होत आलेली दत्तमूर्ति व दत्तपादुका व इतर देवही ठेविले आहेत. मंदिराच्या मागच्या म्हणजे पश्चिम बाजूच्या भिंतीस लागून २५-१४ फूट लांबीरुंदीचें स्वयंपाकघर बांधिलें

आहे. त्यांत बाळंतिणीची किंवा सामान ठेवण्याची खोली, स्वयंपाकखोली, व पडवीवजा एक स्नानखोली अशा तीन खोल्या काढिल्या आहेत. स्नानखोलीपासून सुमारें १०-१२ फुटांवर पश्चिमेकडे परसांत एक उत्तम गोड पाण्याची अजमासें ३-४ फूट व्यासाची रहाटाची खोल विहीर आहे. तिचें पाणी कधींही आटत नाहीं. मंदिराच्या दक्षिण बाजूस पूर्वपश्चिम सुमारें ८७-८८ फूट लांब व ७-८ फूट रुंद अशी जनावरें बांधण्यास व फुलझाडें लावण्यास खुली जागा सोडली आहे. या खुल्या जागेस व विहिरी-जवळील खुल्या जागेस हद्दीच्या भिंती घातलेल्या आहेत. या सर्व इमारतींत १२ दरवाजे, १५ खिडक्या व २ जाळ्या आहेत. शिवाय फडताळें, कोनाडे, खुंट्या व फळ्या विपुल आहेत.

## मंदिरांत भासणाऱ्या गैरसोई

पण ह्या भिंती व विहीर अगदी नादुरुस्त आहेत. दक्षिणेच्या भिंतींत व स्वयंपाकखोलीच्या समोर एक नूतन अतिलघु पण प्रासादिक दोनच पानें आलेला अती कोमल औदुंबरवृक्ष नुक्ताच उगवलेला आहे. त्याची हकीकत फारच हृदयंगम आहे. कै. चि. सुंदराताई किराणे, सातारा, माझ्या कनिष्ठ भगिनी ह्या शिरवळास असतां त्यांना ता. १५-१२-३२ शुक्रवार उजा-डतां पहाटेस स्वप्न पडलें व त्यांत हा नवपल्लव बालतरु खुणेनें श्रीसद्गुरु मोरभट्ट अन्यांनीं दाखविला. व त्याची पूजा करण्यास सांगितलें. ती हकी-कत मी यथावकाश पुढें देईन. त्यास पार वगैरे बांधून जशी दत्तप्रभूची म्हणजे बाबांची आज्ञा होइल, त्याप्रमाणें पुढें व्यवस्था करावयाची आहे. तेही खर्चाचेंच काम आहे.

मंदिरास फुलझाडें लावण्यास प्रशस्त ऐसपैस जागा नाहीं. तसेंच शौचकूप बांधण्यास जागा नाहीं. रात्रीं-बेरात्रीं किंवा ऐन उन्हाच्या दोन प्रहरीं, पर्जन्यकाळीं किंवा ज्यांना उघड्या जागीं शौचास बसण्याची जन्मतः कधींही संवय नाहीं, अशा स्थितींत, किंवा बाळंतिणीस शौचकूपा-वांचून फार अडचण भासते.

## मंदिरांत अवश्य असावयास पाहिजेत त्या वस्तु

मंदिरांत बैठकीकरितां गालिचे, गाद्या, तक्के, लोड, सतरंज्या, जाजमें,

तसेंच हांडया, झुंबरें, उत्सवकार्यासाठीं भांडीं वगैरे सामान पाहिजे. मंदिरांत लावण्याकरितां, देवांचीं देवतांचीं व संतांचीं चित्रें पाहिजेत. पूर्वी ह्यांपैकीं पुष्कळसें सामान बुवासाहेबांच्या सांगण्यावरून श्रीमती माईसाहेब रास्ते यांनी श्रीदत्तास दिलें होतें. पण बुवासाहेबांच्याच कुटुंबांतील (तिसरें) हल्लीं हयात असलेल्या पिढींतील वारसांच्या आपसांतील कलहांत त्या सर्व सामानाची वाताहत झाली; ह्याबद्दलची हकीकत पूर्वी लिहिलेंच आहे.

## मंदिरांत अवश्य असावयास पाहिजे ती व्यवस्था

प्रतिसांवत्सरिक उत्सवखर्चाची, नित्य नैवेद्याकरितां थोडयाशा पक्वान्नांची व नंदादीपाची व्यवस्था नाहीं. त्याचप्रमाणें बसावयास पाट नाहींत. निदान १०० तरी पाट पाहिजेत.

## मंदिरांत अवश्य व्हावयास पाहिजेत अशीं कामें

मंदिरास पक्का रंग, गाभाऱ्यांत व बाहेर तबकडींतसंगमरवरी दगडांची व भोवतालीं शहाबादी दगडाची फरशी, त्याचप्रमाणें दुसऱ्या मजल्यावर पेंड व पत्र्याखालीं वितान म्हणजे शिलिंग करावयाचें राहिलें आहे.

स्वयंपाकघरास लागून पूर्वपश्चिम एक लहानशी पडवी पाहिजे; म्हणजे उन्हाळ्यांत उन्हापासून व पावसाळ्यांत पावसापासून होणारा त्रास दूर होईल.

स्वयंपाकघरांत माळ्यावर जाण्याकरितां एक दादर व माळ्याला तक्तपोशी पाहिजे. म्हणजे बारिकसारीक सामान माळ्यावर ठेवतां येईल.

उत्सवाचा स्वयंपाक करण्यास एक स्वतंत्र जागा किंवा प्रशस्त स्वयंपाकघर पाहिजे.

बैठकीचें सामान ठेवण्यास एक मोठा पेटारा पाहिजे व हांडयाझुंबरें लावण्यास एक चालती शिडी पाहिजे.

श्रीदत्तसेवा कांहीं काळ करावयाची इच्छा असणाऱ्या भक्तांकरितां राहण्याची, जेवणाखाण्याची, मंदिरानजीक धर्मशाळेसारखी स्वतंत्र सोय पाहिजे.

नगारखान्याची व्यवस्था व सोय पाहिजे. गायनाची, पुराणाची व भजनाची व्यवस्था पाहिजे.

## प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साहाय्य करणाऱ्या कांहीं मंडळींचा नामनिर्देश

या इमारतीस निरनिराळ्या स्वरूपानें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साहाय्य करणाऱ्या गृहस्थांची नांवें

१ श्रीयुत रा. रामचंद्र हरि ऊर्फ भाऊसाहेब जोशी, पेन्शनर ओव्हरसियर यांनीं प्लानएस्टिमेट तयार करून देऊन तयार झालेल्या लांकडांचीं मापें घेऊन प्रारंभापासून काम समाप्तिपर्यंत देखरेख केली.

२ ,, ,, कै. जनार्दन धोंडदेव ऊर्फ आण्णासाहेब करंदीकर, डहाणू, यांनीं लांकडें ठेवण्यास जागा दिली.

३ ,, ,, रामकृष्ण जनार्दन ऊर्फ रामताच्या करंदीकर यांनीं सर्व लांकडें स्वतःच्या देखरेखीखालीं वेहरून दिलीं. डबा भरून दिला. वेहरण्यास व डबा भरण्यास व इतर कामास मजूर माणसांची भरपूर मदत केली. त्याप्रमाणें पैसा-अडक्याचीही मदत केली.

४ ,, ,, आण्णासाहेब अभ्यंकर यांनीं लांकडासंबंधानें अप्रतिम मदत केली.

५ ,, ,, रावसाहेब नरोत्तम गिरधर शेट तना व गोवर्धनशेट तना व इतर सर्व साधटे बंदरावरील लहानमोठे सर्व जातीचे व्यापारी यांनीं लांकडासंबंधानेंच चांगली मदत केली.

६ ,, ,, मगनलाल नथुराम दवे, माधवजी झीणा वगैरे स्नेही मंडळींनीं हरएक प्रकारें कसून अंतःकरणपूर्वक व निरपेक्षबुद्धीनें मदत केली.

७ श्री. रा. सखाराम शिवराम ऊर्फ दादा ओर्पे, पुणें यांनी सामानसुमान खरेदी करण्याचें काम केलें.

८ ,, ,, कल्याणजी स्टेशनमास्तर, डहाणूरोड, यांनी ताबडतोब डबा देण्याची मदत केली.

९ ,, ,, रामभाऊ बाबाजी अंबवळे, पुणें, यांनी लांकडें, बैलगाड्यांत भरून पुणें स्टेशनवरून शिरवळास पोंचतीं केलीं.

१० ,, ,, गोपाळ भगवान सुतार मिस्त्री सावटेकर यांनीं मंदिराचें, स्वयंपाकघराचें व गाभाऱ्यांतील सीमेंट-कॉंक्रिटच्या बैठकीचें व त्यावरील सीमेंट कांक्रि-टच्या देव्हाऱ्याचें रात्रंदिवस अत्यंत मेहनत घेऊन मनापासून, निरसलपणानें, कुशलतेनें, उत्तम, मज-बूत व सुंदर काम केलें.

११ ,, ,, जगन्नाथ नथोबा सुतार, डहाणूकर यानें गोपाळ मिस्त्री यांच्या हाताखालीं मेहनत घेऊन काम केलें.

१२ ,, ,, सुकर श्रावण मांगेला, गवंडी, तारपूरकर, यांनीं सर्व गवंडीकाम मुख्य दरवाजाच्या दगडी खांबाचें, कमानीचें व गाभाऱ्यांवरील घुमटाचें काम गोपाळ मिस्त्री यांच्या सहाय्यानें रात्रंदिवस मेहनत घेऊन उत्तम प्रकारें केलें.

१३ ,, ,, लक्ष्मण विठ्ठल मांगेला चिंचणकर यानें सुकर श्रावणच्या हाताखालीं गवंड्याचें काम केलें.

१४ ,, ,, काकड्या कोल्हा वारली सावटेकर यानें सर्व लांकडें वेहरण्याचें काम फार कुशलतेनें केलें.

१५ ,, ,, सुकऱ्या वारली मल्याणकर यानें काकड्या कराडे यांच्या हाताखालीं काम केलें.

१६ श्री. रा. गेनू विठोबा दुधुसकर, पाथरवट शिरवळ यांनीं दगड व तोडी घडविण्याचें पाथरवटी काम केलें.

१७ ,, ,, विठोबा गवंडी, पाथरवट यानें गेनू दुधुसकर-बरोबर पाथरवटी काम केलें.

१८ ,, ,, चोखू महादु महार यानें गेनू दुधुसकरांबरोबर पाथरवटी काम केलें.

१९ ,, ,, सीताराम शेटे, वडार, रा. शिंदेवाडी, यांनीं दगड, डबर व तोडी दिल्या.

२० ,, ,, श्रीपती नारायण सोनवणें, रा. शिंदेवाडी यांनीं चुना, रेती आणली व मळून दिली. गोटे दिले.

२१ ,, ,, नामदेव बयाजी सोनवणें, रा. शिंदेवाडी यांनीं श्रीपतीच्या भागींत काम केलें.

२२ ,, ,, बाळा केदारी गुंजवटा, रा. शिरवळ यानें सर्व कच्च्या विटा पाडून दिल्या.

२३ ,, ,, वजीर इब्राहिम कुंभार, रा. शिरवळ व जानु माया कुंभार, रा. भारे या उभयतांनीं पक्क्या विटा तयार करून दिल्या.

२४ ,, ,, सौ. पार्वतीकाकू देशपांडे यांनीं मंदिराचीं मोठ-मोठालीं लाकडें ठेवण्याकरतां, सुतारांना काम करण्याकरतां, आपल्या मोठ्या आवारांत जागा दिली. तसेंच मला व भाऊसाहेब ओव्हरसिअर यांना निजण्याबसण्यास आपली ओसरी दिली, कच्च्या विटा पाडण्यास आपल्या परसांतील माती व अंगणांतील व परसांतील विहिरीचें पाणी दिलें. व कांहीं पक्क्या विटा व जुने डबर दिले.

२५ ,, ,, चुनीलाल त्रिभुवनदास मारवाडी, रा. शिरवळ यांनीं उधारीवर सुतार-गवंड्यांना खाण्याचें सामान दिलें.

२६ ,, ,, नरहरभट्ट वाळिंबे, भिकंभटकाका मोने व सावळारामभट्ट मोने यांनीं मंदिराळगत असलेल्या त्यांच्या जागेचा आपसांत मोबदला करून मंदिरास जरूर असलेल्या थोड्या जागेपैकीं कांहीं मोफत व कांहीं विकत जागा दिली.

## आभार

वरील सर्व मंडळी, माझ्या बंधुभगिनी, आप्तेष्ट, स्नेही, मित्र, व दुसरे इतर सद्गृहस्थ ज्यांनीं या मंदिराच्या कामीं कायिक, वाचिक, मानसिक, व वैत्तिक मदत केली, त्या सर्वांचा मी अंतःकरणपूर्वक अत्यंत आभारी आहें.

शिरवळ हें गांव माझ्या वडिलांच्या ज्येष्ठ बंधुद्वयांच्या मातुश्रींच्या जेष्ठ भगिनी व भ्रातृजायादि मंडळीच्या सद्गुरूंचें निवासस्थान व गाणगापूर, वाडी, औदुंबर वगैरे प्रख्यात दत्तस्थानासारखें दत्तस्थान असल्यामुळें मला मोनें घराण्यांतीलच काय, पण शिरवळ गांवांतील सर्व स्त्री--पुरुष-मुलें यच्यावत् अणुरेणूपासून सर्व सजीवनिर्जीव वस्तु श्रीसमर्थ सद्गुरुसाईबाबांच्या शिरडींतील वस्तुतुल्य असल्यामुळें वंद्य आहेत.

## हल्लींच्या श्रीमंत भोर सरकारच्या राज्यवैभव-वृद्धिंगततेबद्दल व चिरायुत्वाबद्दल ईशप्रार्थना

ज्या भोर-सरकारच्या राज्यांत मीं हें मंदीर बांधिलें आहे, त्या हल्ली गादीवर असलेल्या श्रीमंत राजमान्य राजश्री बाबासाहेब पंतसचीव सरकारास प्रथम साष्टांग प्रणिपात करून त्यांचें राज्यवैभव उत्तरोत्तर वृद्धिंगत करून त्यांना त्यांच्या पुत्रपौत्रादि राजघराण्यांतील सर्व मंडळींना परमात्मा चिरायु करो,अशी त्या दत्तप्रभूची मी अंतःकरणपूर्वक सविनय प्रार्थना करतों.

## मंदिरास भेट

या मंदिरास भोरचे नगरशेट श्री. रा. रामदास यांनी चार वेळ व भोर संस्थानचे हल्लींचे कारभारीसाहेब रावबहादुर हुल्याळ यांनीं एक वेळ भेट दिली.

## श्रीमंत युवराजसरकार यांचें मंदिरावरील अलोट प्रेम

श्री दत्तप्रभूंच्या अगम्य, साश्चर्य व कौतुकास्पद लीलेची विशेष गोष्ट ही कीं, या दत्तमंदिरास स्वयंस्फूर्तीनें श्रीमंत राजमान्य राजश्री रघुनाथराव भाऊसाहेब पंतसचीव युवराजसरकार यांनीं दिवसा-रात्रीं स्वतः श्रीमती सौ. राणीसाहेबांसह व श्रीमती सौ. भावशीबाईसाहेबांसह अल्प कालांत अनेक वेळां भेट देऊन श्रींची व नूतन औदुंबरवृक्षाची स्वतः पूजा करून श्रींचा फोटो घेऊन मंदिरावरील आपलें प्रेम व्यक्त केलें आहे. तरी मंदिराच्या कामीं अजमासापेक्षां पुष्कळच जास्त झालेल्या खर्चाचा, अद्याप अपुऱ्या राहिलेल्या कामांचा, पूर्वी दिलेल्या पण हल्लीं भासत असलेल्या अपुऱ्या नेमणुकीचा सहानुभूतिपूर्वक पूर्ण विचार करून मंदिरास खुद्द श्रीमंत सरकार पंतसचीवसाहेब व श्रीमंत युवराजसरकार-साहेब योग्य मदत करतील. पूर्वापार चालत आलेल्या मोने घराण्याचा व मोन्यांच्या श्री शिरवळ-दत्तप्रभूंचा संबंध निरंतर कायम ठेवून पूर्वी संपादन केलेल्या संत व दत्तकृपेंत नवीन संत व दत्तकृपेची भर घालून आपलें वैभव अधिक वाढवून कपिलाषष्ठीपेक्षांही जास्त म्हणजे जवळ जवळ शतसांव-त्सरिक कालानंतर आलेल्या सुयोगाचा फायदा घेऊन आपल्या वैभवास कायमची बळकटी आणतील, अशी या उभय सरकारांजवळ नम्रतापूर्वक माझी प्रार्थना आहे.

श्री मोरभट्ट अन्यांचा, श्रीशिरवळदत्तप्रभूंचा व भोर संस्थानचा पूर्वापार कसा निकट व जिव्हाळ्याचा संबंध आहे, हें मीं पूर्वीच त्रोटक रीतीनें २९ पृष्ठावर दाखविलें आहे. तरी पण हें नूतन मंदीर बांधते वेळीं ह्या पूर्वापार नैसर्गिक संबंधाचें स्वप्नांतसुद्धा कधींही अपेक्षा न केलेलें पण सहजगत्या पुनः प्रकटीकरण झाल्याचें पाहून खरोखरच श्रीबाबांच्या अगम्य लीलेचें अत्यंत आश्चर्य व अतिशय कौतुक वाटलें व परमानंद आला.

## क्षुल्लक बाबतीवरूनसुद्धा दिसून येणारा भोर संस्थानचा व मोन्यांच्या श्रीशिरवळदत्तमंदिराचा पूर्वापार संबंध

मंदिरांत मुख्य जाड खांब अकरा आहेत. त्यांना दगडी उथळ्या देण्याची प्रथमची योजना नव्हती. मंदिराच्या कामास सुतार, गवंडी, मिस्त्री डहाणूकडून आणिले होते. तसेंच लांकूडकामही पूर्वयोजनेप्रमाणें डहाणूहूनच कापून तयार करून आणिलें होतें. मिस्त्रीनें लांकडांस रंधा, गोलची मारण्यास सुरवात केली. इतक्यांत त्यांच्या मनांत आलें कीं, निदान दर्शनी खांबास तरी दगडी उथळ्या असाव्या. मी ठाण्यास होतों. शिरवळास उथळ्या तयार करून घ्याव्या तर दगड चांगला नाहीं; बाहेरून दगड आणावा, तर खर्च फार व वेळ नाहीं. शिरवळास आयत्या तयार उथळ्या मुळींच मिळण्यासारख्या नाहींत. मिस्त्री सहज दुसऱ्या कामाकरतां भोरास गेले. गांवांत फिरतांना त्यांना एके ठिकाणीं ४-५ उथळ्या दिसल्या. त्या मंदिरांतील खांबांना बरोबर बसतील व शोभतील असें त्यांना वाटलें. त्यांनीं त्या उथळ्यांचा तपास केला; त्या फुटक्या होत्या असें कळून आलें. पण याच धटाच्या व इतक्याच मोठ्या अशा कांहीं उथळ्या भोराजवळ भागोडी म्हणून गांव आहे तेथें कदाचित् मिळूं शक-

तील असें मित्रींना समजलें. ते तसेच श्री. बगोबा मोने यांना घेऊन भागोडीस गेले. तेथें त्यांना मातींत पुरलेल्या व मंदिरास उपयोगी पडणाऱ्या अशा बरोबर अकराच उथळ्या मिळाल्या. एक कमी नाहीं किंवा एक जास्त नाहीं. सुमारें शंभर वर्षांपूर्वी श्रीमंत सचीव सरकारचे वाड्याकरितां ह्या उथळ्या तयार करण्यांत आल्या होत्या. परंतु कांहीं कारणानें ती योजना रद्द होऊन त्या सामानाचा लिलाव झाला. तो लिलाव एका पाटलानें घेतला. त्यांपैकीं कांहीं सामान व उथळ्या पाटलानें लोकांस विकल्या व त्यांपैकीं या अकराच उथळ्या गिऱ्हाइक नसल्यामुळें मातीच्या ढिगांत आजपर्यंत पडून राहिल्या होत्या. त्या आमच्या मित्रीस माफक किंमतीस मंदिराच्या कामाकरितां मिळाल्या. त्यानें त्या तेथून आणून मंदिरांत बसविल्या. त्या इतक्या ठीक बसल्या कीं,जणूं काय त्या वाड्याकरतां नव्हे, तर शंभर वर्षांनंतर शिरवळ येथें होणाऱ्या श्री. मोन्यांच्या दत्तप्रभूंच्या मंदिरांतील दर्शनी अकरा खांबांकरितांच तयार केल्या होत्या !!! काय हा चमत्कार! व काय हा संबंध! दिसण्यांत बाह्य क्षुल्लक पण गूढार्थपूर्ण आहे असें कोणाही विचारी मनुष्यास निःसंदेह व निःसंशय वाटेल.

## मंदिरखर्च

मंदिरास खर्च दहा हजार रुपयांवर झाला आहे.

## आनंद

ज्याप्रमाणें एखादा पुरातन, तेजस्वी जोमदार व कमनीय अमृत-फलदायी वृक्ष विद्युदाघातानें एकदम सुकून वठून जावा, पण त्यावर अज्ञातत: निरंतर नैसर्गिक व स्वल्प जलसिंचन होत असल्या-मुळें कालांतरानें त्याच्या बुंधांतून कोमल पण जोमदार नवांकुर बाहेर येऊन त्या वृक्षास पुनः सुंदर नूतन पालवी फुटावी, किंवा

त्याप्रमाणें एखादा सुंदर, स्वच्छ मधुर व विपुल पाण्याचा झरा भूगर्भांत धरणींकंपासारख्या आपत्तिमुळें एकदम परावर्तन झाल्यामुळें तो एकाकी अटून जावा, पण त्याच ठिकाणीं निसर्गतः अल्पाल्प जलांचे लहान लहान ओघ एकत्र होत होत कालगतीनें लघुजलप्रवाह पुन्हा दृग्गोचर व्हावा, त्याप्रमाणें बुवासाहेबांनीं आमच्या घरीं लावलेला ज्ञानप्रधान परमार्थ मधुर-फलदायी संत व दत्तभक्तीरूप पुरातन वृक्ष किंवा खणलेला परमामृताचा मधुर जलाचा झरा, त्यांच्या निधनाबरोबर वठून किंवा सुकून जाऊन बाबांच्या कृपाप्रेरणामृतसिंचनानें आज ६० वर्षांनीं कपिलाषष्ठीच्या सुयोगावर बुवा-साहेबांच्या, दत्तप्रभूंच्या व दत्तगुरु बाबांच्या या सेवेंत पुन्हा अंकुरित व जिवंत व्हावा, व माझ्या मनांतील शिरवळ सेवेची फार वर्षांची तीव्र मनीषा अत्यल्पांशानें पुरी व्हावी, हें पाहून अत्यानंद वाटतो.

## प्रार्थना

आतां यापुढेंही निरंतर अशीच सेवा घेत जावी, अशी त्यांच्याच पुण्य-चरणपंकजीं अत्यादरपूर्वक प्रार्थना आहे.

## अर्पण

शेवटीं ज्या श्रीदत्तप्रभूंनीं व श्रीसमर्थ सद्गुरु बुवासाहेबांनीं ही वेडीवांकडी अत्यल्प सेवा मजकडून निर्विघ्नपणें करून घेतली व ती करण्यास ज्या श्रीसमर्थ सद्गुरु साईपरमात्मांनीं प्रेरणा केली, त्या सर्वांच्या दिव्य पादपद्मीं विनम्र भावानें शरण जाऊन त्यांना अनंत साष्टांग प्रणिपात करून हें एकोनपंचाशब्ददलरूपि वाक्-शतपत्र त्यांच्याच आंघ्रियुगुलावर प्रेमभक्तिपुरःसर व अढळ श्रद्धापूर्वक शुद्ध चित्तानें अर्पण करून अत्यल्प पण पुण्य व अघविनाशी गुरुसंतसच्चरित्र संपवितों.

# नम्र प्रणति

## अनुष्टुभ् वृत्तम्

श्री " आन्या " भगवान्वेधा । श्रीदत्तो भगवाञ्शिवः ।
श्रीसाई भगवान्शौरिः । वंदेऽहं भगवत्त्रयम् ॥

मंदिर-कामास प्रारंभ शके १८५० विभवनाम संवत्सरे. मंदिर-काम समाप्त शके १८५४ अंगिरानाम संवत्सरे.

शिरवळ-ठाणें-सातारा,
गुरुवासरे वैशाख कृ. ५
शके १८५६ भावनाम संवत्सरे;
ता. ३-५-३४

संतचरणरज
दासानुदास,
बाळकृष्ण विश्वनाथ
देव पौंडकर.

## परिशिष्ट

### नूतन श्रीदत्त मंदिरासंबंधीं पाळावयाचे नियम

१. हें मंदीर श्रीसमर्थ सद्गुरु गोरभट्ट अन्या बुवासाहेब मोने यांच्या शिरवळ श्रीदत्तप्रभूंना अर्पण केले आहे. मंदिराचर मालकी दत्तप्रभूंची आहे.

२. भोर कोर्टांतील दाव्याच्या अखेरच्या निकालांत ठरल्याप्रमाणें व बुवासाहेब व त्यांचे बंधु रघुनाथभट्टजी यांनीं लिहून ठेविल्याप्रमाणें या मंदिराची वहिवाट त्यांच्या वारसांनीं म्हणजे श्रीदत्तात्रय पांडुरंग ऊर्फ बगोबा मोने यांनीं व त्यांच्या वारसांनीं पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीस अनुसरून करावी. त्यांना हें मंदिर कोणासही गहाण, खरेदी, दान, अगर बक्षिस देतां येणार नाहीं.

३. वहिवाटीसंबंधानें अगर मंदिरासंबंधानें कोणत्याही बाबीबद्दल मतभेद झाल्यास अगर अडचण उत्पन्न झाल्यास त्याचा निकाल श्री. बाळकृष्ण विश्वनाथ देव, बी. ए., पेनशनर, फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट. ठाणें, त्यांचे चिरंजीव द्वय श्री. श्रीपाद बाळकृष्ण, देव, बी. ए., एल्‌एल्. बी. वकील, श्री. श्रीनिवास बाळकृष्ण देव, एम्. बी. बी. एस. क्लास ठाणें व त्यांचे भाचे श्री. महादेव पुरुषोत्तम किराणे, बी. ए. एल्‌एल्. बी. वकील, सातारा, यांनीं करावा.

४. नूतन श्रीदत्त मंदिरावर देखरेख वरील चार गृहस्थांची राहील.

५. नूतन श्रीदत्तमंदिरांत केव्हांही स्वयंपाक करावयाचा नाहीं व जनावरें बांधावयाची नाहींत किंवा कोणत्याही प्रकारें घाण करावयाची नाहीं, किंवा घाण ठेवावयाची नाहीं.

६. हें मंदीर कोणत्याही सार्वजनिक किंवा राजकीय कारणासाठीं केव्हांही उपयोगार्थ घ्यावयाचें नाहीं.

७. ज्यांत सार्वजनिकत्व किंवा राजकारण (उघड किंवा गुप्त) नाहीं अशा केवळ धार्मिक कीर्तन, पुराण, प्रवचन अशा अथवा अशाच प्रकारच्या इतर स्वरूपाच्या कामास वहिवाटदारांच्या किंवा वरील चार गृहस्थांपैकीं एका अगर जास्त गृहस्थांच्या परवानगीनें या मंदिराचा उपयोग करण्यास हरकत नाहीं.

८. अस्पृश्यांना या मंदिरांत येण्याची सक्त मनाई आहे.

९. वहिवाटदारांनीं आतांपर्यंत चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें या मंदिराची झाडसारव, श्रीची नित्यनैमित्तिक पूजा-अर्चा-आरती-धुपारती व इतर गोष्टी वेळच्या वेळीं नित्य नियमानें करून सांवत्सरिक उत्सव करावे व मंदिराची जोपासना काळजीपूर्वक उत्तम प्रकारें करावी.

१०. नूतन मंदिराच्या मागील बाजूस आवारांत उगवलेल्या नूत
प्रासादिक बाळ औदुंबर वृक्षाकडे विशेष लक्ष पुरवून त्याची उत्तम जोप
सना करावी.

११. वरील नियमात कांहीं कमीजास्त किंवा फेरफार करणें योग
वाटल्यास वहिवाटदारांनी वरील देखरेख करणाऱ्या चार मंडळीच्या विचा
करावा.

ठाणें–शिरवळ,
गुरुवार वैशाख कृ. ५
शके १८५६ भावनाम
संवत्सरे

बाळकृष्ण विश्वनाथ देव
श्रीपाद बाळकृष्ण देव
श्रीनिवास बाळकृष्ण देव
महादेव पुरुषोत्तम किराणे
दत्तात्रय पांडुरंग मोने, वहिवाटदार
लक्ष्मण दत्तात्रय मोने

साक्षिदार

सदाशिव विश्वनाथ देव
मोरेश्वर वामन पंडित
सखाराम शिवराम ओर्पे
विष्णु गोविंद देव

# अनुभव

रा. रा. संपादक श्रीसाईलीला ह्यांसी सा. न. वि. वि.

आपल्या श्रीसाईलीलेंत श्री. बाबांचे अनुभव येत असतात. त्या सद-रांत-बरोबर पाठविलेले कांहीं अनुभव आपणाकडे पाठवीत आहें, ते सवडी-प्रमाणें छापण्याची कृपा व्हावी. तूर्त एवढे अनुभव पाठवीत आहें; आणखी अनुभव सवडीप्रमाणें लिहून पाठवीन. कळावें लोभ असावा हे विज्ञापना.

श्री. काशीबाई कानिटकर ह्यांच्या सांगण्यावरून

त्यांची सून,

सौ. **रमाबाई कानिटकर**

\+ + +

संपादक श्रीसाईलीला ह्यांस सा. न. वि. वि.

श्रीसाईबाबांचे अनुभव ह्यासोबत पाठवीत आहें, ते आपण सवडी-प्रमाणें श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध करावेत. हे अनुभव १९०९ सालच्या एप्रिल पासून १९१३ सालच्या मार्चपर्यंतचे आहेत. तारखा वगैरे ध्यानांत नाहींत.

## अनुभव १

१९०९ सालीं आम्हीं येवल्यास असतांना, आम्हांस शिरडीस साधुदर्शनाचें बोलावणें जुन्या ओळखीच्या मंडळींनीं केलें. थोड्या दिव-सांनीं एक कार्ड-साईझचा बाबांचा फोटो टेबलावर होता; कोणी आणून दिला तें ठाऊक नाहीं; अजूनपर्यंत तो माझ्याजवळ आहे. बोलावणें केलें, तेव्हां आम्हीं फारसें लक्ष दिलेंच नव्हतें. परंतु जानेवारीअखेर, नगर, सोलापूर व धुळें ह्या तीन जिल्ह्यांच्या शेतकरी कायद्यान्वयें स्पेशल फर्स्ट-क्लास सब-जज्ज ह्या जागेवर ॲक्टिंग नेमणूक झाली. त्या कामानिमित्त पहिल्यांदा नगर जिल्ह्यांत फिरण्याचें ठरवलें. त्याअन्वयें नगर, कडे,

कर्जत वगैरे ठिकाणची दप्तरें तपासून मुक्काम कोपरगांवावर गेला. कोपरगांवाहून शिरडी जवळ आहे. कोपरगांवचा मुक्काम हालून रहात्याला जावयाचा होता; तेव्हां मी म्हटलें, "तुम्ही दप्तर तपासावयास रहात्यास जावें, व आम्ही आपला मुक्काम शिरडीस ठेवावा." त्याप्रमाणें आम्ही शिरडीस गेलों. जातांना वाटेंत माझ्या मनांत असें आलें कीं, मीं लहानपणीं श्रीअक्कलकोट स्वामीमहाराजांना पाहिलें होतें; त्यांच्यासारखे बाबा दिसले, तर माझी त्यांच्या पदीं भक्ति बसेल. आम्हीं शिरडीस जाऊन पोहोंचलों; स्वैपाक,जेवणखाणाचें सामान चावडींत ठेवलें व दफिसाचें व निजण्याबसण्याचें सामान मुलांच्या शाळेंत वेशीबाहेर ठेविलें. नंतर मशिदींत जाऊन बाबांचें दर्शन घेतलें, आणि त्यांच्या हातावर आम्ही सर्वांनीं अर्धा अर्धा आणा ठेविला. त्या वेळेला ते अर्ध्या आण्याच्यावर दक्षिणा घेत नसत. नंतर आम्ही परत आलों व चावडीवर चहा वगैरे घेत असतां बाबा भिक्षेहून परत येत होते; येते वेळीं आम्हीं पुन्हा पायां पडलों व माझ्या धाकट्या मुलानें त्यांना चहा घालावयास नेला. त्यांनीं विचारलें "काय आहे?" चहा आहे म्हटल्यावर नको म्हणाले. मग आम्हीं सर्वांनीं चहा वगैरे घेतल्यावर मग माझा मोठा मुलगा चि. माधवराव व मोठे जांवई चि. गंगाधरपंत हे दोघेजण पुन्हा दर्शनास गेले. त्या वेळीं बाबा एकटेच मशिदींत न्याहारी करीत बसले होते, माधव व गंगाधरपंत मशिदीच्या दारापासून मशिदीच्या पायरीपर्यंत बाबांच्याकडे पाहत पाहत गेले. मशिदीच्या दारापासून पाहतां बाबा न दिसतां स्वामीमहाराज दिसूं लागले. पायरीवर पाय ठेवीपर्यंत तसे दिसत होते. वर जाण्याकरितां पायरीवर पाय ठेवितांच, स्वामीमहाराज नाहींसे होऊन बाबा दिसूं लागले. मला मात्र स्वामीमहाराज दिसले नाहींत.

## अनुभव २ रा

आमचा मुक्काम तेथें असतांना, एक दिवसाआड बाबा म्हाळसापतीसह चावडींत निजावयास येत असत; त्याप्रमाणें एक रात्रीं ते आले.

पहिल्यांदा चावडींत बसून म्हाळसापतीशीं चांगलें बोलत होते; चिलीम भरण्याच्या वेळेस त्यांच्या चिलमीचा खडा खालीं पडला, तें निमित्त होऊन ते अतोनात शिव्या देऊं लागले. त्या शिव्या बायकामाणसांनीं ऐकूं नयेत अशा देखील होत्या. आम्ही उभयतां व आमच्या मुलीबाळी तेथेंच होतों. ह्या शिव्या ऐकून आम्हां सर्वांना तेथून जाण्यास सांगितलें. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं, शाळेच्या मागल्या बाजूला रात्रीं गोष्टी सांगत असले असतां, स्वत: म्हणाले, " एवढे मोठे साधु म्हणवतात, आणि घाणेरड्या शिव्या काय बोवा देतात ?" तेव्हां शिरस्तेदार व इतर मंडळी म्हणाली, "साधूंना शिव्या व इतर बोलणीं सारखींच ! त्यांना त्याचें काय !" स्वत: म्हणाले, " आपल्याला नाहीं बोवा तें कळत; त्यांनीं जर आम्हीं आल्यापासून दिलेले पैसे आपणहून परत दिले, तर आपण त्यांना साधु म्हणूं. " दुसऱ्या दिवशीं आम्हीं सर्व कोपरगांवास जावयास निघालों. कारकून, शिपाई, बेलीफ वगैरे पैसे देऊन जाण्यास निघाले; ते सर्व पैसे घेऊन बाबांनीं बसावयाच्या तरटाखालीं ठेवले. नंतर स्वत: दर्शनाला गेले, त्या वेळीं त्यांनीं ते सर्व पैसे गोळा करून दिले व म्हणाले कीं, "हे घे आपले सर्व पैसे." नंतर आम्हीं सर्व पांचसातजणी बायका, विचारण्यास जावयास निघालों; माझ्याजवळ त्या वेळेस सर्वांना अर्धा अर्धा आणा देण्यास सुटे पैसे नव्हते, म्हणून कुणाला आणा, कुणाला अर्धा आणा, कुणाला दोन आणे, असे दिले. तेव्हां माझी मुलगी म्हणाली, "असे काय देतेस, सर्वांना सारखे दे; कुणाला कमी कुणाला जास्ती असे कां देतेस ?" तेव्हां मीं म्हटलें, "अग, आपण आज चार दिवस नाहीं का दिलं; आतां माझ्याजवळ सुटे नाहीत; जें हाताला लागेल तें द्या आणि चला. " बाबांनीं स्वत:च्या हातावर पैसे ठेविले तेव्हां त्यांनीं मला बोलावणें पाठविलें व मला सांगितलें, " बाबा पैसे घेत नाहींत, हे बघ सर्व त्यांनीं परत दिले. " मीं गेल्यावर बाबांना म्हटलें, " धुनीच्या लांकडांला पैसे नकोत का ? परत कां देतां ? " तेव्हां

बाबा मला म्हणाले, "अग, आज चार दिवस नाहीं का दिले ? जसे असतील तसे द्यावे." हे शब्द मी मुलीला म्हटले होते, ते माझे मला परत केले व पैसेही परत केले. आमची व मुलीची भाषा झाली, ती चावडींत झाली, व त्यांची शाळेंत झालेली बोलणीं, अन्तरसाक्षी बाबांनी मशिदींत बसून त्यांचीं उत्तरें दिलीं.

## अनुभव ३ रा

एकदा आम्हीं येवल्याहून सकाळच्या गाडीनें, शिरडीस जाण्याकरितां कोपरगांवीं घाटावरील दत्तमंदिरांत थोडा वेळ थांबलों होतों. आमच्याबरोबर पुरुषमाणूस, एका नोकराशिवाय कोणी नव्हतें. ब्रह्मचारीबोवांच्या तिथें सामानसुमान ठेवून, श्रीगोदावरीच्या स्नानास मुलांबाळांसह गेलों. स्नान करून आल्यावर देवदर्शन, मुलांचे फराळ, आमचा चहा वगैरे आटोपून शिरडीस जाण्यास निघालों. शिर्डीच्या अर्ध्या वाटेंत टांगे गेले, तोंच शिरडीहून एक टांगा आला; तो टांगा थांबवून व आमच्या टांग्याला थांबवून ते दोन गृहस्थ खालीं उतरून म्हणाले, " तुम्हीं लवकर जा, तुमच्यासाठीं बाबांनीं आम्हांला तेथें बसूं-बोलूं दिलं नाहीं. त्यांनीं आम्हांस सांगितलें, " उठा इथून ! मशीद रिकामी करा. आई येती आहे, तिच्या लेकरांबाळांना आणि माणसांना बसावयास जागा पाहिजे आहे." आम्हीं शिरडीस जाण्यापूर्वी कोणासही कळविलें नव्हतें, आणि ते गृहस्थही आमच्या ओळखीचे नव्हते. पण आम्हीं व ते एकाच गाडीनें कोपरगांवच्या स्टेशनवर उतरलों होतों; ते थेट गेले व आम्हीं स्नानाला थांबलों. त्यांच्याच सांगण्यावरून ते फौजदार होते व मनमाडहून आले होते.

## अनुभव ४ था

१९०६ सालीं आमच्याबरोबर गोदूबाई गोखले नांवाच्या आमच्या आप्तसंबंधी बाई आल्या होत्या. आम्हीं शिर्डीत उतरल्यावर दर्शनास गेलों. आम्हां सर्वांस मशिदींत येऊं दिलें, पण गोदूबाई गोखले ह्यांना बाबा मशिदीची पायरी चढूं देईनात. ते त्या बाईला म्हणत; "माझ्या मशिदीला शिवूं

नकोस, विटाळ होईल." त्या बाई एवढेंसें तोंड करून परत गेल्या ! त्या विहिरीवर जाऊन लुगडें धुवून, स्नान करून लुगडें वाळवून नेसून परत आल्या, व पुन्हा मशिदींत गेल्या, तरी बाबा त्यांना पायरी चढूं देईनात. पहिल्यान्दा त्यांना वाटलें,वाटेच्या गाडीच्या विटाळाची,म्हणून बाबांनीं मशिदींत येऊं दिली नसेल, म्हणून त्या स्नान करून आल्या; तरी पुन्हा तेंच ! शेवटीं त्या परत जाण्यास निघाल्या; म्हणून शेवटीं तरी बाबा दर्शन देतील म्हणून त्या मशिदींत गेल्या. तरी बाबांनीं त्यांना येऊं दिल्या नाहींत; शेवटीं निराश होऊन त्या येवल्यास परत गेल्या. घरीं गेल्यावर त्यांचा चुलत दीर किंवा जाऊ वारल्याचें पत्र आलेलें होतें, तें कळलें- ह्याचसाठीं बाबांनीं आपणास मशिदीस शिवूं दिलें नाहीं, हें समजून बाबांच्या अन्तर्साक्षत्वाची खूण पटली.

## अनुभव ५ वा

एकदां नाशिककडून चांगलीं उत्तम द्राक्षें आणविलीं होतीं; तीं घेऊन मी शिर्डीस गेलें; बरोबर दोघी मुली, दोघी नाती व धाकटा मुलगा होता. आम्हीं जाऊन पोहोंचलों, तेव्हां बारा-एकाचा सुमार होता. मशिदींत गेलों, तेव्हां बाबा धुनीशेजारील खांबास टेकून बसले होते; आम्हीं वर जाऊन बाबांच्या पायावर डोकें ठेऊन, दक्षिणा देऊन, बाबांच्याभोंवतीं बसलों; द्राक्षांची करंडी बाबांच्या पुढें मीं केली; बाबांनीं झांकण उघडून बघितलें व काय, "काय अंगुर आणलेस हां !" असें ते म्हणाले. मीं म्हटलें, "तुमच्याकरितां नाशिकहून आणलीं." त्यांनीं द्राक्षाचें घड उलथेंपालथें करून, सगळी करंडी माझ्याकडें लोटली व म्हणाले, "जा, घे आपलीं !" तें ऐकून मला फार वाईट वाटलें. नंतर बाबांना काय वाटलें कुणास ठाऊक, त्यांनीं पुन्हा ती करंडी आपल्याजवळ घेऊन त्यांतील सुकलेलीं, वाळलेलीं, अशीं चारपांच द्राक्षें आपल्या पितळींत घेऊन, "जा आतां, तुझीं लेकरंबाळं खावूं देत." दर्शन, उदी, प्रसाद घेऊन आम्ही मशिदीबाहेर

आल्यावर, वनूताई (माझी मुलगी) म्हणाली, "कुठून बाई माझ्या मनांत आलें कोण जाणें!" मी विचारलें, "काय तुझ्या मनांत आलें?" ती म्हणाली, "तूं जेव्हां सबंध करंडी त्यांच्यापुढें ठेविलीस, तेव्हां माझ्या मनांत आलें, हीं सबंध द्राक्षें उगीच हिनें ह्यांना दिलीं! हे आतां सगळीं द्राक्षें उधळून देतील; आपल्या मुलाबाळांना नाहीं व त्यांनाही नाहीं असें होईल." म्हणून त्यांनीं करंडी परत केली; माझ्या मनाला फार वाईट वाटलें म्हणून त्यांतील चार कसलींबसलीं द्राक्षें काढून घेतलीं. कोणतीही गोष्ट, मनांत आणली तरी बाबांना तात्काळ कळत असे.

## अनुभव ६ वा

१९०९ सालीं शिरडीला गेलें होतें; तिथें दोनतीन दिवस मुक्काम होता. त्या तीन दिवसांत एकदा तिसऱ्या प्रहरच्या वेळीं, बाबांनीं आपल्या पायापाशीं मला बसवून घेतली; तेही धुनीच्या समोरच्या खणांत जोत्यावर बसले होते. बाबाजी गणेश देशपांडे ह्यांची मथुनाई पाय चेपीत होती, आजूबाजूला आणखी कांहीं बाया बसलेल्या होत्या, मी पायांपाशीं बसलें, तेव्हां मला बाबांनी विचारलें, "तुला कोपरगांवच्या दत्तानें कांहीं दिलें का ग?" मला तो प्रश्न कांहींच समजेना! मी त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागलें, तेव्हां ते मला म्हणाले, "तुला अनगांवकराइचा सखाराम माहित आहे का?" तेव्हां मीं उत्तर केलें, "ऐकून माहित आहे." तेव्हां बाबा म्हणाले, "सखाराम व मी गुरुबंधु होतों; आम्हीं एकाच गुरुपाशीं पढत होतों. गुरूच्या मठांत आम्हीं दोघांनीं आपल्या हातांनीं आंब्याचीं झाडें लाविलीं, त्या आंब्याचीं दोन फळें, काल तुला कोपरगांवा पाठविलीं." त्यानंतर मी कोपरगांवला परत आलें, तेव्हां कोपरगांवच्या ब्रह्मचारीबोवांनीं, मला दोन कलमी आंबे देऊन सांगितलें कीं, हे दोन आंबे बाबांनीं तुम्हांकरितां पाठविले आहेत. त्यावरून बाबांचे गुरुबंधु सखारामबुवा कवाडकर होते, हें कळून आलें.

## अनुभव ७ वा

एकदा रा. धुंडिराज विठ्ठल गुर्जर ऊर्फ बापूसाहेब गुर्जर शिरडीस जाण्यास निघाले, तेव्हां मीं एक रुपाया बाबांना देण्यास दिला. बापूसाहेब फिरत फिरत महिन्यानें शिरडीस गेले; दोनतीन दिवस राहिले; बाबांनीं मागितलेली वेळोवेळीं दक्षणा दिली; शेवटच्या दिवशीं येण्याच्या वेळीं जाण्याची आज्ञा घ्यावयास बापूसाहेब गेले. त्यांनीं पायांवर डोकें ठेवून विचारून दक्षिणा दिली व जाण्यास निघणार तोंच बाबा म्हणाले, "आज तीन दिवस मी तुझी गमत पाहातों आहें; आपली दक्षणा देतोस, आणि आईनें दिलेला रुपाया खिशांत दडवून ठेवतोस, तो आईचा रुपया दे कीं !" असें म्हणून त्यांनीं तो मागून घेतला. बापूसाहेबांना रुपायाची आठवण नव्हती. हा अनुभव बापूसाहेबांनीं पुण्यास आल्यावर सांगितला.

## अनुभव ८ वा

थिऑसोफिस्ट मंडळी, थिऑसोफिकल पुस्तकें वाचून साधुसंतांबद्दल संशय घेतात, त्यांना शुभ्र मार्ग व कृष्णमार्ग ( black & white ) ह्या दोन्हीं मार्गांचें नीटसें ज्ञान होत नाहीं. साधुसंतांचे चमत्कार वगैरे ऐकिले म्हणजे त्यांना तो कृष्णमार्गच वाटत असे. साईबाबांचे चमत्कार ऐकून व अनुभवून, आम्हींसुद्धा साईबाबा कृष्णमार्गांतले कीं शुभ्रमार्गांतले ह्याबद्दल चर्चा करीत असूं. एकदा मी शिरडीस गेलें असतां, माझ्या मनामध्यें ती गोष्ट घोळत होती. मी मशिदींत गेलें, मशिदीच्या पायरीपाशीं मी जों गेलें, तों बाबा पायरीच्यावर जोत्याच्या कांठावर उभे राहून, माझ्याकडे तोंड करून छातीला हात लावून, रागाच्या आवेशांत म्हणाले, " हा ब्राह्मण आहे. शुभ्र ब्राह्मण आहे, काळया वस्तूचा ह्याला संबंध नाहीं, हा शुद्ध ब्राह्मण, मुसलमान येथें पाऊल काय ठेवील ? त्याची बिशाद काय येथें येण्याची, हा ब्राह्मण ( छातीला हात लाऊन ) लाखों जणांना शुभ्र मार्गावर

लावून, पोहोंचविणारा आहे; शेवटपर्यंत पोहोंचविणारा आहे; ही ब्राह्मणाची मशीद आहे, ह्या मशिदीवर काळ्या मुसलमानाची सावलीसुद्धा पडूं देणार नाहीं. " हें बोलणें ऐकून मी थक्कच होऊन गेलें. थिऑसफीचीं कांहीं तरी पुस्तकें वाचून, कुणाला तरी कृष्ण ( black ) म्हणावें,कुणाला तरी शुभ्र ( white ) म्हणावें, स्नानसंध्या, गायत्री जप, देवतार्चन, अग्निपूजा इत्यादि करणाराला कृष्ण ( black )म्हणावयाचें,नुसतीं थिऑसोफीचीं पुस्तकें वाचून त्याप्रमाणें बोलावयाचें, Master चें ध्यान केलें म्हणजे शुभ्र ( white ) म्हणावयाचें, देवतेचें केलें की कृष्ण ( black ) म्हणावयाचें, अशांसारख्या चर्चा आमच्या बोलण्यांत चालत, व बाबा शुभ्र कीं कृष्ण हाही संशय व्यक्त केला जाई. त्या सर्वांचें उत्तर त्यांनीं ह्या वेळेला दिलें व ते शुभ्रमार्गी कीं कृष्णमार्गी तें त्यांनीं पर्यायानें सुचविलें.

# श्रीशिर्डी संस्थान नोकर व इतर मंडळीबद्दल माहिती

## श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

श्रीसाईलीला संपादकमहाशय यांस सप्रेम कृ. शि. सा. न. विज्ञापना विशेष,

श्रीसाईलीलेच्या ९ व्या वर्षाच्या प्रथमांकात श्रीशैलधी (शिरडी) क्षेत्रवर्णन, तेथील नैत्तिक व नैमित्तिक कार्यक्रम, सांवत्सरिक उत्सव, सण, जयंत्या, सार्वत्रिक व्रतवैकल्यें यांबद्दल त्रोटक माहिती दिली. आतां या लेखांत शिरडी संस्थानची नोकर व इतर मंडळी व त्यांची कामें याबद्दलची थोडीशी माहिती देण्याचें योजिलें आहे.

हल्लीं संस्थानांत कायम व अल्पकालिक मिळून आठ नोकर आहेत. त्यांचीं नांवें, कर्तव्यें व पहारे खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१. श्री. गणेश गोपाळ देशपांडे, शिरवळकर. हे वयोवृद्ध भगवद्भक्त असून गवयाचें काम करतात. यांचा वारकरी पंथ आहे. ते दरवर्षी पंढरीची व आळंदीची वारी करतात. वारकरी संप्रदायाप्रमाणें कीर्तन व भजन करतात. यांची ज्ञानेश्वरी बहुतेक पाठ आहे. हे सतार, तबला व पखवाज चांगला वाजवितात. बाबांच्या ठिकाणीं यांचें अतुल प्रेम आहे.

यांचीं नित्याचीं कामें:—

१ सकाळीं ८ ते ९ श्रींच्या समाधीपुढें गायन करणें.
दुपारीं ४ ते ५ श्रींच्या समाधीपुढें श्रीज्ञानेश्वरी, श्रीनाथ भागवत, श्रीअध्यात्मरामायण व श्रीसाईसच्चरित या विश्ववंद्य ग्रंथांचें पुराण.
सायंकाळीं ५ ते ६ श्रींच्या समाधीपुढें सतारवादन.
रात्रीं ८ ते ९ ,, ,, भजन.

२ भजनाच्या ऐवजीं प्रत्येक गुरुवारीं प्रत्येक एकादशीस प्रत्येक सणाचे दिवशीं व विशिष्ट प्रसंगीं, उत्सवकार्यांत कीर्तन.

३ दर गुरुवारीं रात्रीं कीर्तन आटोपल्यावर श्रींच्या चावडी समारंभास हजर असणें.

याच्या नेमणुकीस नुकतेंच एक वर्ष झालें आहे.

२. श्री. बाळा पिलाजी गुरव. हे तरुण, व्यवहारज्ञ, चौकस, निरलस, तरतरीत व मेहेनती गृहस्थ आहेत. हे सनई, तबला व पेटी वाजवितात. गाण्याची व भजनाची साथ करतात. संस्थानचे हिशेब ठेवून सेक्रेटरी, खजिनदार व विश्वस्त यांच्याबरोबर पत्रव्यवहार करतात. संस्थानची चीजवस्त, भांडीकुंडीं, कपडेलत्ते, सामानसुमान व इतर सर्व जिन्नस यांच्या ताब्यांत असतात. ते बाबांच्या प्रत्येक भक्तास हरएकप्रकारें मदत करितात, मदत करण्यास नेहमीं तयार असतात, व पडेल तें काम आनंदानें करतात. कधींही टाळाटाळ करीत नाहीत. यांचीं नैत्तिक मुख्य कामें:—

१ काकड आरती, दुपारची आरती, सायंकाळची आरती व शेजारती व सकाळीं श्रींच्या स्नानाच्या वेळीं चौघडा व सनई वाजविणें.

२ गवईबुवांस, तसेंच इतर कीर्तनकार, गवई व भजनी मंडळी मंदिरांत आल्यास त्यांना जरूर तर, पेटी, तबला, व गाण्याची साथ करणें.

३ शिरडी येथील संस्थानपैशाचा हिशोब ठेऊन तो दरमहा खजिनदार यांजकडे पाठविणें, संस्थानसंबंधीं हरएक बाबीचा पत्रव्यवहार करणें, नोकर लोकांस पगार देणें, सर्वांवर देखरेख करणें, संस्थानचें नफानुकसान पाहणें, संस्थानच्या घरांचें भाडें वसूल करणें, भाडेचिठ्या घेणें, बागेच्या उत्पन्नावर, मोडतोडीवर व कामावर लक्ष ठेवणें. प्रयोगादाखल ठेवलेल्या अन्नछत्राची व्यवस्था पाहणें. सारांश शिरडी येथील

बाबांच्या संस्थानच्या सर्व स्थावर व जंगम मिळ-
कतीची काळजीपूर्वक जोपासना करणें.

४ बाबांच्या समाधिदर्शनाकरितां येणाऱ्या प्रत्येक भक्तास शक्य ती मदत करून त्याची गैरसोय दूर करणें.

५ प्रत्येक दिवशीं भजनास हजर राहून संस्थाननोकरां-पैकीं जे गैरहजर असतील, त्यांचीं नांवें सेक्रेटरीस कळविणें. प्रत्येक नोकरानें भजनास हजर राहून दररोज एक तरी अभंग म्हटलाच पाहिजे. चावडीस व कीर्तनास हजर असलेंच पाहिजे. ह्यांची नोकरी २२ वर्षें झाली आहे.

३. श्री. रंगनाथ बाळा गुरव यांचीं मुख्य कामें:—

१ सनई वाजविण्याच्या वेळीं सूर धरणें. मंदिर व मंदिरा-बाहेरील जागा झाडणें, त्यावर सडा घालणें, बागेंतून फुलें, तुळसी, दूर्वा, बेल आणणें, हार करणें, गॅसच्या बत्त्या व कंदील साफ करणें व लावणें, बाबांचे कपडे धुणें, स्नानास पाणी तापविणें, उपकरणीं घासणें ( चांदीचीं ), पुराणास, कीर्तनास, भजनास, व जरूर त्या इतर वेळीं बिछाइत व बैठक टाकणें. इतर किरकोळ कामें करणें, भजनास हजर राहणें, व अभंग म्हणणें, चावडीस व कीर्तनास हजर असलेंच पाहिजे. त्यांची नोकरी १५-१६ वर्षें झाली आहे.

४. श्री. माधव कान्हु फसल्या ह्यांची मुख्य कामें :—

१ श्री द्वारकामाईंत व शामसुंदर घोड्याच्या घरांत झाडणें, धुणें, बाबांच्या फोटोस कपडे घालणें, घोड्याची सर्व व्यवस्था करणें, श्रीधुनीमाईंत लाकडें घालणें, मंदिर-

तील, द्वारकामाईतील व बागेतील नंदादीप लावणें, समया साफ करून भरून ठेवणें, गुरुवारीं चावडी धुणें, साफ करणें, बिछाइत टाकणें, व इतर किरकोळ कामें करणें. मिरवणुकीस हजर राहणें व चावडीस घोडयासह हजर असणें. पालखी, रथ, पालखीचें व रथाचें सामान, घोडयाचें सामान, बाबांच्या फोटोचे कपडे संभाळून ठेवणें, द्वारकामाईंत कोणत्याही प्रकारचा अनाचार करूं न देणें; तसेंच धुनीमाईंत विडी पेटविणें किंवा अशाच प्रकारच्या अपवित्र गोष्टी करूं न देणें वगैरे वगैरे. श्रीद्वारकामाईपासून मंदिरापर्यंत लावलेल्या फुलझाडांस पाणी घालणें. ह्यांची नोकरी ३०-३२ वर्षे झाली आहे.

५. श्री. लक्ष्मण कचेश्वर ऊर्फ नाना जाखडी पूजारी. यांचीं मुख्य कामें:—

१ पहाटे ५ ते ६ श्रींच्या समाधीची काकडआरती करणें. सकाळीं ६ ते ८ श्रींच्या समाधीस स्नान घालणें. समाधीस व श्रींच्या छबीस कपडे घालणें, समाधीची छबीची, श्रीद्वारकामाईतील मोठया छबीची, श्री. नवलकर यांच्या वाड्यांतील निंबवृक्षाखालील बाबांच्या पादुकांची व जवळील बाबांच्या श्रीसद्गुरुरायांच्या समाधीची व त्यासमोरील सोप्यांत असलेल्या बाबांच्या छबीची व श्रीशिवनंदिकेश्वराची पूजा करणें.
सकाळीं ११ ते १२ श्रींच्या समाधीस दुपारचा नैवेद्य दाखवून आरती करणें.

सायंकाळीं ६ ते ७ श्रींच्या समाधीची सायंकाळची आरती करणें व सायंकाळचा नैवेद्य दाखविणें.

रात्रीं ९ ते १०॥ श्रींच्या समाधीची शेजारती व समाधीस मच्छरदाणी लावणें.

सकाळीं स्नानाच्या वेळीं रामु शिंदा, रंगनाथ विश्वनाथ, मल्हाद फसले व बाळा शिंपी वगैरे नोकर मंडळींनीं नेहमीप्रमाणें नानु पूजारी यास मदत करणें. तशीच मदत रात्रीं मच्छरदाणीच्या वेळींही करणें.

२ श्रींच्या समाधीच्या पूजेअर्चेची स्नानाची व इतर प्रसंगाचीं सोन्याचीं, चांदीचीं व इतर धातूंचीं भांडीं, उपकरणीं, कपडे व इतर चीजवस्तु त्यांच्या ताब्यांत असलेली काळजीपूर्वक जपून ठेवणें.

३ रात्रीं भजनास हजर असणें.

४ ज्याची सोय नसेल व ज्यास जरूर असेल अशा प्रत्येक भक्ताची त्याच्या खर्चानें नेहमीप्रमाणें चहापाण्याची व खाण्यापिण्याची सोय करणें.

५ दर गुरवारीं व शुक्रवारीं बाबांच्या गुरुरायाच्या समाधीजवळ रात्रीं धूप जाळणें.

६. श्री. बाळा काशीराम शिंपी हे श्रींचे चोपदार आहेत; यांचीं मुख्य कामें:—

१ श्रींच्या समाधीच्या चारी आरत्यांच्या वेळीं चोपदार पेहरावांत हजर राहून आरत्या संपतांच श्रींच्या नांवानें ललकारणें व बंदोबस्त ठेवणें. श्रींच्या स्नानाच्या वेळींही हजर राहणें व नानु पुजारी यास हरएक प्रकारें मदत करणें.

२ दुपारीं ३ ते ४ चक्रीभजन करणें.

३ श्रींच्या समाधीच्या दर्शनास येणाऱ्या प्रत्येक भक्ताची नोंद नोंदबुकांत ठेवून त्यांची व्यवस्था ठेवणें, त्यांची

कोणत्याही प्रकारें गैरसोय न होऊं देणें. त्यांना शिरडींतील प्रत्येक प्रेक्षणीय स्थळ दाखविणें.

४ श्रीशिरडीवृत्ताकरितां श्री. सेक्रेटरी यांना सर्व माहिती प्रत्येक महिनाअखेर कळविणें.

५ भजनास व पुराणास हजर राहणें; अभंग म्हणणें. ह्यांच्या नेमणुकीस २ वर्षे झाली आहेत.

७. श्री. रावजी याळा तेली यांचें मुख्य काम:—बाबांच्या लेंडीबागेंतील श्री. सगुण मेरु नाईक यांच्या देखरेखीखालीं, माळ्याचें काम करणें. तसेंच बागेसंबंधीं इतर सर्व कामें करणें. ह्यांची नोकरी २ वर्षे झाली आहे.

८. श्री. रामु रघू शिंदे, हे होतकरू तरुण अल्लड गृहस्थ आहेत.

१ श्रींच्या चारी आरत्यांच्या वेळीं व स्नानाच्या वेळीं चौघडा व सनई चालली असतां संबळ वाजविणें, तसेंच गवईबुवांच्या हाताखालीं गायन, वादन, कीर्तन व भजन या वेळीं तबला व पखवाज यांची साथ करणें. भजनकीर्तनाच्या वेळीं अभंग म्हणून साथ करणें; हीं यांचीं मुख्य कामें आहेत.

२ पडेल तें काम केलेंच पाहिजे. तक्रार करतां कामा नये.

३ यांची नेमणूक तूर्त चैत्रापासून (शके १८५६) सहाच महिनें तबला शिकाऊ म्हणून केली आहे. गवयांच्या हाताखालीं यांनीं जर या सहामाहीत तबल्याच्या गतींत जास्त प्रगति करून दाखविली नाहीं, तर ह्यांची नेमणूक रद्द करण्यांत येईल.

९. श्री. सगुण मेरु नाईक हे संस्थानचे नोकर नाहीत. पण इतर कमिटीच्या सभासदांसारखे सन्माननीय गोंव्याच्या बाजूकडील मराठी जातीचे गृहस्थ असून बाबांचे फार प्रेमळ भक्त आहेत.

१ बाबांच्या बागेकरितां श्री.मोरेश्वरराव प्रधान यांनी जमीन घेऊन दिल्यास बरींच वर्षे झालीं होतीं. परंतु श्रीसगुण-रावांनी त्या जमीनीस बागेचें पूर्ण स्वरूप देऊन राव-बहादुर प्रधान यांच्या देणगीचें चीज करून दाखविलें आहे. सगुणरावांना बागेची चांगली माहिती आहे. ते बागेवर नुसती देखरेखच करितात, किंवा माळ्याकडून बागेची कामें करवून घेतात इतकेंच नाहीं, पण पुष्कळ वेळ स्वतः खपून बागेंतील कामें करतात. बाबांच्या बागेची भरभराट व्हावी, अशी यांना अत्यंत आवड आहे. यांनी बाग चांगली रंगारूपास आणिली आहे व याहीपेक्षां बागेस उत्तम स्वरूप यावें म्हणून त्यांची नेहमीं खटपट चालू असते. हे निरलस असून उद्योग-प्रिय व खटपटी आहेत.

२ आल्यागेल्या भक्तांचा, त्यांच्या खर्चानें वहागाण्याचा व खाण्यापिण्याचा हेही परमार्श घेतात.

३ बाबांचे फोटो लहानमोठे यांच्याजवळ विक्रीस तयार असतात.

१० श्री अबदुलभाई छोटूभाई, हे बाबांचे फार पुराणे, गरीब, अनाथ भक्त आहेत. हे नोकर नाहीत. हे वृद्ध आहेत. बाबांचा दोन वेळचा नैवेद्य यांना देण्यांत येतो. यांना संस्थानांतून कपडे व किरकोळ खर्चाकरितां कांहीं पैसे धर्मादाय म्हणून देण्यांत येतात. यांचा संस्थानांत कोणत्याही

प्रकारें हक्क म्हणून नाही. हे संस्थानच्या जागेंत भाडयानें राहतात व दरसाल भाडेचिठी करून देतात.

११. श्री.विश्वनाथ व श्रीनिवृत्ति हीं दोन तरुण मुलें श्री. बाळा पिलाजी गुरव यांच्या आश्रयानें मंदिरांत असतात. तीं संस्थानचीं नोकर नाहींत. पण संस्थानचें पडेल तें काम करतात. हीं शिकाऊ मुलें दिसतात.

१२ श्रीद्वारकामाईत श्रींचे सेवेकरी श्री. अण्णा वडोदकर म्हणून एक मराठा जातीचे गृहस्थ आहेत.हे १०-१२ वर्षे येथें आहेत. हे वयोवृद्ध आहेत.श्रींच्या मंदिरांतील व गांवांतील मधुकरीवर यांचा उदरनिर्वाह चालतो.

## घंटा, घडयाळ व तास यांचा योग्य उपयोग

श्रींच्या समाधिमंदिरांत लहानशी घंटा, मोठें घडयाळ व तास आहे. श्रीद्वारकामाईत मोठी घंटा आहे.

मंदिरांतील प्रत्येक नोकरास (कांहीं विवक्षित नोकर खेरीज करून) पहारे दिले आहेत. त्यांनीं आपापल्या पाहाऱ्यांत घंटा व तास वाजविलेच पाहिजेत. घंटा व तास वाजविण्यानें प्रत्येक नोकरास आपल्या पहाऱ्याची वेळ कळते व तो आपापलें कर्तव्य करण्यास सज्ज होतो. आळस, निद्रा, विस्मृति व दुर्लक्ष दूर होतें. गांवांतील व परगांवांतील लोकांस व भक्तास प्रत्येक कार्यक्रमाची वेळ व महत्त्व कळतें. नैतिक किंवा नैमित्तिक कार्यक्रमांपैकीं एक किंवा अधिक कार्यक्रमास हजर राहाण्याची एखाद्या भक्ताची इच्छा असल्यास त्यास हजर राहतां येतें. अदूरदृष्टि, मंददृष्टि, अज्ञान, वृद्धापकाळ यांमुळें घडयाळ्याचे कांटे दिसत नाहीत व ठोके ऐकूं येत नाहींत; अशा वेळीं घंटेचा व तासाचा चांगलाच उपयोग होतो. शिवाय प्रत्येक नोकराजवळ घडयाळ असणें शक्य नाहीं. त्याला आपल्या कार्यक्रमाच्या सुरवातीच्या व समाप्तीच्या वेळेकरितां श्रीद्वारकामाईतील घंटेवर व मंदिरांतील तासावरच अवलंबून राहणें भाग पडतें. कथा, पुराण, चावडी, रथ,

पालखी, आरती, भजन, अभिषेक, स्नान व अशाच प्रकारच्या इतर महत्वाच्या कार्यास घंटानादाचा व तासाच्या ठोक्यांचा मोठाच उपयोग होतो. सर्व नोकरलोक मंदिरांत किंवा द्वारकामाईंत राहत नाहींत. आपापल्या घिव्हाडीं किंवा घरीं, मंदिरापासून जवळ किंवा अधिक अंतरावर राहतात व आपापल्या सांसारिक कामांत गुंतलेले असतात. कित्येक रिकाम्या गप्पा मारण्यांत व चकाट्या पिटविण्यांत रंगलेले असतात, त्यामुळें त्यांना स्वकर्तव्याची विस्मृति पडते व कधीं कधीं ते कर्तव्यपराङ्मुखही होतात. अशा वेळीं घंटांचे गंभीर, उच्च व गाढ नाद व कानठळ्या बसविणारे तासांचे ठोके, त्यांना स्वकार्यक्रमाची स्मृति देऊन, शुद्धीवर आणतात, जागृत करतात व स्वकर्तव्यरूपि बाबांची सेवा करण्यास प्रवृत्त करतात.

पहारे खालीं लिहिल्याप्रमाणें:—

पहाटे ४॥ श्री. बाळा पिलाजी गुरव यांनीं श्रीद्वारकामाईंतील मोठी घंटा वाजवून काकडआरतीच्या लोकांना जागें करणें.

पहाटे ५ ते सकाळीं ८ पर्यंत } श्री. नानु पुजारी यांचा पहारा. या पहाऱ्यांत श्रींच्या स्नानाची घंटा दिली पाहिजे.

सकाळीं ८ ते १० श्री. बाळा काशीराम शिंपी यांचा पहारा.

,, १० ते १२ श्री. रंगनाथ बाळा गुरव यांचा पहारा. या पहाऱ्यांत दुपारच्या आरतीची श्रीद्वारकामाईंतील मोठी घंटा वाजविणें.

दुपारीं १२ ते २ श्री. महादु कान्हु फसले यांचा पहारा.

,, २ ते ५ श्री. रामू रघू शिंदे यांचा पहारा. या पहाऱ्यांत चक्रीभजनाची व पुराणाची अशा दोन घंटा देणें.

सायंकाळीं ५ ते ७ श्री. अण्णा बडोदकर सेवेकरी यांच

पहारा; यांत सतारवादनाची व सायंकाळच्या आरतीची अशा दोन घंटा देणें.

रात्रीं ७ ते आठ श्री. रंगनाथ बाळा गुरव यांचा पहारा.

,, ८ ते १०॥. श्री. बाळ काशीराम शिंपी यांचा पहारा. या पहाऱ्यांत भजनाची व शेजारतीची अशा दोन घंटा देणें.

याप्रमाणें प्रत्येक नोकरानें व सेवेकऱ्यानें आपापल्या पहाऱ्यावर हजर राहून घंटा व तासांचे ठोके वाजविले पाहिजेत, व त्याचप्रमाणें प्रत्येक नोकरानें व सेवेकऱ्यानें रात्रीं भजनास आलेंच पाहिजे, व अभंग म्हटलेच पाहिजेत. अभंग पाठ येत नसल्यास किंवा पाठ येत असून म्हणतां येत नसल्यास, पाठ करून किंवा गाथ्यावरून पाहून व पाठ करून गवईबुवांजवळ म्हणण्यास शिकावें. जो कोणी पहाऱ्यावर, कामगिरीवर व भजनास हजर नसेल, त्याचें नांव बाळा पिलाजी गुरव व गवईबुवा यांनीं श्री. तात्या पाटील कोते यांस किंवा जाग्यावर दुसरे कोणी विश्वस्त हजर असल्यास त्यांस किंवा संस्थानसेक्रेटरीस तावडतोब कळवावें; परवानगीवांचून किंवा रंजेवांचून कोणत्याही नोकरानें किंवा सेवेकऱ्यानें गैरहजर राहतां काम नये. जरुरीप्रमाणें किंवा सोइप्रमाणें पहाऱ्यांत फेरफार करण्यांत येतील.

बरीच लांबलेली माहिती पुरी करून आपली रजा घेतों.

ठाणें,
गुरुवार मिति वैशाख
शु. ५ शके १८५६.
ता. १९-४-३४

बाबांचें बाळ

## श्रीसाईबाबा

# मे महिन्याचें शिर्डीवृत्त

मे महिन्यांत शिर्डी येथें ७७ भक्तजन श्रीसाईदर्शनाकरितां व अधिक-मासानिमित्य धर्मकृत्य करण्याकरितां मुंबई, सान्ताक्रुझ, अंधेरी, अहमद-नगर, राहूरी, कोपरगांव व इगोळी, येवलें, नेवाशें, नाशिक, मालेगांव, संबराळें, धुळे, अकोला, खामगांव, हार्डा, शिरपूर, पुणें, खडकी, मेमदाबाद कटणी वगैरे ठिकाणांहून आले होते. त्या मंडळींत दक्षणी मंडळींशिवाय गुजराथी, पार्शी व बंगाली भक्त होते.

## भक्तांचीं धर्मकृत्यें–

१ मेमदाबाद येथील डॉ. छोटालाल मुलाभाई यांनीं श्रीस नैवेद्य केला.

२ शिरपूर येथील यशवंत गोपाळ जास्री यांनीं भारोभार मुलाची गुळाची तुळा करून तो वांटला.

३ रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान, त्यांचें कुटुंब सौ. छोटूबाई व मुलें व सौ. छोटुबाईंच्या दोन बहिणी व त्यांचीं मुलें व जांवई व नातू मिळून १५ जण अधिकमासानिमित्य श्रीसाईदर्शनास आले होते. सौ. छोटुबाई प्रधान यांनीं अधिकमासानिमित्य श्रींस वायन दिलें. त्यांत १ नागपुरी तांबडें रेशिमकांठी धोतर, १ जर्मन सिल्व्हरचा थाळा व वाटी, १ लहान फॅन्सी पंखा, १ गंधाची साण व सफेत चंदनाचें खोड, ३३ बताशे व १ रुपया दक्षिणा अशा जिनसा होत्या.

४ सौ. छोटूबाई यांची मोठी बहीण श्रीमती यमुनाबाई गजानन कोठारे यांची मोठी मुलगी सौ. लीलावतीबाई हिचा जोडा भेटविण्याकरितां जांवई श्रीयुत विनायकराव रामराव कीर्तिकर व नातु चि. सुधीरचंद्र व दोन मुलींसह आल्या होत्या. ह्या दोन मुलींनीं श्रींस पिस्ताशी रंगाचा नकशिचा गलेफ चढविला.

५ सौ. छोटूबाई प्रधान यांची दुसरी बहीण श्रीमती द्वारकाबाई तळपदे हिनें त्यांच्या मोठ्या चिरंजीवाच्या नवसाप्रीत्यर्थ श्री. सत्यसाई-नाथांची पूजा श्रीयुत बापाजींच्या हस्तें करविली.

६ सौ. छोटूबाई प्रधान हिनें श्रीसत्यनाथाची पूजा केली व तांबड्या रेशिमकापडाचीं २ निशाणें—एक श्रीसमाधिमंदिरावर व दुसरें द्वारकामाईवर चढविलीं. चि. साईप्रभा रावबहादुर प्रधान यांची कन्या हिनें अधिक-मासाच्या शेवटच्या ७ दिवसांत मुंबई येथें आरंभिलेला श्रीसाईसच्चरिताचा सप्ताह शिरडी येथें पुरा केला.

श्रीसाईबाबा

# मे महिन्याचें शिर्डीवृत्त

मे महिन्यांत शिर्डी येथें ७७ भक्तजन श्रीसाईदर्शनाकरितां व अधिकमासानिमित्य धर्मकृत्य करण्याकरितां मुंबई, सान्ताक्रुझ, अंधेरी, अहमदनगर, राहुरी, कोपरगांव व इंगोळी, येवलें, नेवासें, नाशिक, मालेगांव, चंदराळें, धुळे, अकोला, खामगांव, हार्डा, शिरपूर, पुणें, खडकी, मेमदाबाद कटणी वगैरे ठिकाणांहून आले होते. त्या मंडळींत दक्षणी मंडळींशिवाय गुजराथी, पार्शी व बंगाली भक्त होते.

## भक्तांचीं धर्मकृत्यें—

१ मेमदाबाद येथील डॉ.छोटालाल भुलाभाई यांनीं श्रीस नैवेद्य केला.

२ शिरपूर येथील यशवंत गोपाळ जासी यांनीं भारोभार मुलाची गुळाची तुळा करून तो वांटला.

३ रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान, त्यांचें कुटुंब सौ. छोटूबाई व मुलें व सौ. छोटुबाईंच्या दोन बहिणी व त्यांचीं मुलें व जांवई व नातू मिळून १५ जण अधिकमासानिमित्य श्रीसाईदर्शनास आले होते. सौ. छोटुबाई प्रधान यांनीं अधिकमासानिमित्य श्रींस वायन दिलें. त्यांत १ नागपुरी तांबडें रेशिमकांठी धोतर, १ जर्मन सिल्व्हरचा थाळा व वाटी, १ लहान फॅन्सी पंखा, १ गंधाची साण व सफेत चंदनाचें खोड, ३३ बत्तासे व १ रुपया दक्षिणा अशा जिनसा होत्या.

४ सौ. छोटूबाई यांची मोठी बहीण श्रीमती यमुनाबाई गजानन कोठारे यांची मोठी मुलगी सौ. लीलावतीबाई हिचा जोडा भेटविण्याकरितां जांवई श्रीयुत विनायकराव रामराव कीर्तिकर व नातु चि.सुधीरचंद्र व दोन मुलींसह आल्या होत्या. ह्या दोन मुलींनीं श्रींस पिस्ताशी रंगाचा नकशिचा गलेफ चढविला.

५ सौ. छोटूबाई प्रधान यांची दुसरी बहीण श्रीमती तारकाबाई तळपदे हिनें त्यांच्या मोठ्या चिरंजीवाच्या नवसाप्रीत्यर्थ श्री. सत्यसाईनाथांची पूजा श्रीयुत बापाजीच्या हस्तें करविली.

६ सौ. छोटूबाई प्रधान हिनें श्रीसत्यनाथाची पूजा केली व तांबड्या रेशिमकापडाचीं २ निशाणें—एक श्रीसमाधिमंदिरावर व दुसरें द्वारकामाईवर चढविलीं. चि. साईप्रभा रावबहादुर प्रधान यांची कन्या हिनें अधिकमासाच्या शेवटच्या ७ दिवसांत मुंबई येथें आरंभिलेला श्रीसाईसच्चरिताचा सप्ताह शिरडी येथें पुरा केला.

७ सोमवार ता. १४।५।३४ रोजीं सकाळीं रावबहादुर प्रधान यांनीं त्यांचा जेष्ठ चिरंजीव साईप्रसाद ऊर्फ सुमन यास श्रीसाईबाबा यांनी मोठया काळजीदायक दुखण्यांतून बरा केला, त्याबद्दल त्याची बाबांजवळ गुळाची तुळा दिली.

८ श्रीयुत नागेश आत्माराम सावंत, मुंबई, यांच्याकडून पत्र आल्यावरून श्रींस त्यांच्या नांवानें ११ दिवस अभिषेक केला.

९ श्रीयुत सालसकर, मुंबई, यांच्याकडून पत्र आल्यावरून श्रींस अभिषेक व नवैद्य केला व गोरगरिबांस जेवण घातलें.

१० श्रीयुत विष्णु नागदेव गुरव. मोहितेवाडी, ता.खेड, जि. पुणें, यांनीं श्रींस गोडया भाताचा नैवेद्य केला व दरबाज्यास पांच रुपये ठोकले.

११ श्रीयुत सुंदरराव दि. नवलकर यांचें पत्र आल्यावरून श्रींस अधिकमासानिमित्त अभिषेक केला.

संस्थानचे गवई श्रीयुत शिरवळकर हे एकाएकीं आजारी झाल्यामुळें श्रीयुत बा. वि. देव हे ठाण्याहून त्यांना बोलावणें आल्यावरून औषध घेऊन शिर्डीस गेले होते. औषध सुरवात करितांच त्यांस तावडतोब गुण श्रीकृपेंकरून येऊं लागला. त्यांची प्रकृति आतां बरी आहे. बाळासाहेब देव शिर्डीस असतांना त्यांनीं नेहमींप्रमाणें श्रीज्ञानेश्वरीवर प्रवचन केलें.

## जिनसा वगैरे आल्या त्या:

१ श्रीमती जनाबाई कदम—एक जुनी साईभक्त, राहणार धुळें यांनीं दोन नवीन धर्तीच्या पितळी समया, वजन १५ शेर, किंमत रु. १५, त्यांचा नातु ( मुलीचा मुलगा ) चि. विश्वनाथ कृष्णाजी भोंसले याच्या नांवानें अक्षय्यतृतीयेच्या दिवशीं श्रींस अर्पण केल्या आहेत.

मे महिन्यांत शिर्डीसंस्थान कमिटीची त्रैवार्षिक निवडणूक, शिर्डीसंस्थानचे भक्तमंडळाचे आश्रयदाते व सभासदांकडून झाली. त्यांत पुढील चार सभासद निवडून आले (१) श्रीयुत रा. ब. तर्खड, (२) श्री. सुंदरराव दि. नवलकर, (३) श्री. यशवंतराव गाळवणकर व (४) श्रीयुत वसंतराव ना. गोरक्षकर.

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई
ता. १३ जून १९३४

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस,
शिर्डी—संस्थानकमिटी

# जून महिन्याचें शिर्डीवृत्त

शिर्डी येथें जून महिन्यांत अहमदनगर, बेलापूर, औरंगाबाद, गंगापूर, बिलासपूर–गांजगांव, पुणें, नाशिक, इंदोर, भुसावळ, नागपूर, नाथडोंगरी, अलवण, ठाणें;–मिरारोड, वसई, बडोदे, गौतमपुरा, मुंबई–माटुंगा, दादर; मुंबई सबर्बन–मुलुंद या ठिकाणाहून श्रींच्या समाधि-दर्शनाकरितां ५० भक्तमंडळी व संतप्रेमी बांधव आले होते.

शिर्डी येथील मोजणीदार रा. रा. महिपतराव यशवंत यांनीं श्रींच्या समाधीपुढें एक महिना तेलाचा नंदादीप लाविला. सौ. सोनाबाई विठ्ठल नाडकर–माहिम बाजार रोड–मुंबई व रा. रा. गोविंद अमृतराव मुळे-मोरी रोड–माहिम, मुंबई, यांनीं कळविल्यावरून श्रींस अभिषेक व नैवेद्य केले.

रा. रा. वासुदेव अनंत बांबर्डेकर, २ री खत्तर आळी, मुंबई यांनीं कळविल्यावरून श्रींस १२ अभिषेक दर गुरुवारीं व सोमवारीं करण्यास सुरू केले आहेत.

रा. रा. शंकर विष्णु कुऱ्हेकर–गौतमपुरा यांनीं श्रींस स्वतः रुद्राभिषेक केला व नैवेद्यही केला.

रा. रा. श्रीकृष्ण गोपाळ साठे, दादर, मुंबई यानीं नैवेद्य केला.

रा. रा. लक्ष्मण महादेव भिडे--मुलुंद हे ता. १२।६।३४ रोजीं बरोबर मातुःश्री, भावजई, कुटुंब, मुलें, मुली, पुतणे, पुतण्या यांसह शिर्डीस आले. त्या दिवसापासून श्रींस फळांचा व साखरभाताचा नैवेद्य दाखविला. त्यांचा ज्येष्ठ चि. काशीनाथ याची प्रकृति आगगाडींतून पडल्यामुळें ६५ दिवस अत्यवस्थ होती. त्यांतून श्रींच्या कृपेनें बरा झाल्यामुळें त्यांची खडी-साखरेची तुला श्रीसाईमंदिरांत केली, व त्याप्रीत्यर्थ श्रींच्या पादुकांवर

रुद्राभिषेक केला. चि. येसूबाई हिचें नाक टोचलें होते तें बरें होत नव्हतें, म्हणून बरें झाल्यावर नवसाप्रीत्यर्थ श्रीपुढें १। रु. ठेविला.

## जिनसा देणगी वगैरे आल्या त्यांचा तपशील.

१ रा. रा. परशुराम रामचंद्र पाटील--नायडोंगरी यांनीं कायम फंडास रु. ५ दिले.

२ रा. रा. विठ्ठल बाळाजी कुंभकर्ण, अहमदनगर--पांढरें सुती उपरणें.

३ रा. रा. गोविंद रंभाजी मिसळ, गंगापूर—औरंगाबाद—एक गलफ व दरवाजावर रु. १। ठोकला.

४ रा. रा. नारायण बळवंत राणे, मिरारोड—ठाणे, गलफास तांबडें इमिटेशन रेशमी कापड व नंदादीपाकरितां आठ आण्यांचें तेल दिलें.

जून महिन्यांत शिर्डी येथें पाऊस चांगला पडला नाहीं. पावसाची जरुरी फार भासते.

संस्थानचे गवई रा. रा. शिरवळकर यांची प्रकृति पुन्हा अस्वस्थ झाली आहे. श्रींच्या कृपेनें त्यांस मागीलप्रमाणें लवकरच आराम पडून त्यांची श्रींच्या सेवेचीं कामें पूर्ववत लवकर चालू होतील अशी श्रींस प्रार्थना आहे.

जून महिन्यांत शिर्डीसंस्थान—पोटकमिटीच्या दोन सभा सान्ताक्रुझ येथें भरल्या होत्या.

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २;
ता. ६ जुलई १९३४

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस,
शिर्डी-संस्थानकमिटी

# श्रीसाईबाबा

## शिर्डी-संस्थान-समाचार

श्रीसाईबाबा-शिर्डी-संस्थानच्या भक्तमंडळाच्या तहाहयात व सामान्य सभासदांकडून शिर्डी-संस्थान-कमिटीच्या अनुक्रमें ता. १० जून व २४ जून १९३४ रोजीं झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकींत खालील तीन-तीन सभासद निवडून आले.

१ रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे
२ श्रीमंत केशवराव गोपाळ बुटी
३ रा. रा. बापूराव राघोजी बोरावके
१ ह. भ. प. दास गणू महाराज
२ रा. रा. माधवराव ध. देशपांडे
३ ,, ,, गोविंद काशीनाथ गाडगीळ

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस,
शिर्डी-संस्थान-कमिटी

मोरेश्वर विश्वनाथ प्रधान
तात्याजी गणपत पाटील कोते
बाळकृष्ण विश्वनाथ देव
सखाराम बळवंत धुमाळ
वासुदेव नारायण चांदोरकर
श्रीसाईबाबा-शिर्डी-संस्थानचे विश्वस्त ( ट्रस्टीज )

# श्रीसद्गुरु साईबाबा

सप्रेम सा. न. वि. वि. सालाबादप्रमाणें श्रीगुरुपौर्णिमेचा उत्सव मि॰ आषाढ शुद्ध पौर्णिमा शके १८५६, गुरुवार ता. २६ जुलई १९३४ रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें श्रीसाईबाबा समाधि-मंदिरांत होणार आहे. तरी आपण सदर प्रसंगीं मित्रमंडळ सह अवश्य येण्याची कृपा करावी, अशी विनंती आहे.

## उत्सवाचा कार्यक्रम

**बुधवार**—आषाढ शु. १४, ता. २५ जुलई १९३४

सकाळीं–रोजचा कार्यक्रम. दोनप्रहरीं आरती; नंतर भोजन, चक्रीभजन. रोजचा कार्यक्रम;-रात्रौ-भजन व रथाची मिरवणूक.

**गुरुवार**—आषाढ शु० पौर्णिमा, ता. २६ जुलई १९३४

सकाळीं-श्रीच्या समाधीस अभिषेक, श्रीची पूजा, दोन प्रहरीं आरती व नंतर प्रसाद. ३ वाजतां शिर्डी संस्थान-कमिटीची सभा; ५ वाजतां शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाची शके १८५५ चें १३ वी वार्षिक सभा; रात्रौ–चावडी.

**शुक्रवार**—आषाढ व० १, ता. २७ जुलई १९३४

सकाळीं–श्रीची पूजा. दोनप्रहरीं–आरती. नंतर–भंडारा. रात्रौ पालखीची मिरवणूक व गारुड.

**शनिवार**—आषाढ व० २ ता २८ जुलई १९३४

सकाळीं–काला, तीर्थप्रसाद; रात्रौ भजन.

**रविवार**—आषाढ व० ३, ता. २९ जुलई १९३४

सकाळीं रोजचा कार्यक्रम, दोनप्रहरीं–आरती; नंतर फराळ व भोजन.

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस.
रा. आ. तर्खड, ऑ. खजिनदार.
बापुराव रा. बोरावके,
ऑ. दुय्यम चिटणीस.
रघुवीर भा. पुरंदरे,
ऑ. दु. खजिनदार,
शिर्डी-संस्थान-कमिटी.

मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.
तात्याजी गणपत पाटील कोते.
बाळकृष्ण विश्वनाथ देव.
सखाराम बळवंत धुमाळ.
वासुदेव नारायण चांदोरकर.
श्रीसाईबाबा शिर्डी-संस्थानचे
विश्वस्त ( ट्रस्टीज )

जेष्ठ शु॥ १२ शके १८५६
शिर्डी, ता. २४ जून १९३४

सेवेशीं साईदास,
केशव गोपाळ बुटी

---

टीप:—वरील कार्यक्रमामध्यें जरूरीप्रमाणें फेरफार केला जाईल.

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, पुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्ही घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक **श्रीसाईलीला**

दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणू महाराज यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. गो. नाफेकर, M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो, दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ८।४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसानंतर ८।४; बाळकडू:--मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ८८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ८।२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १८।० ) **द्राक्षासव** ( अर्धी रत्तल ८।४
दीड रत्तल २८४ ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" ही सात आण्यांची तिकिटें आली असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २

पुणें:--श्री साईनाथ आणि कंपनी.



हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, २६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें रामचंद्र काशीनाथ तटणीस यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन रोड, बांद्रें येथें प्रसिद्ध केलें.